इ. सन १९२२

म. ग्रं. सं. ठाणें

विषय काव्य

सं. क्र. ५६०

भजन तरंगिणी

ले. नागवेकर, एल. पी

प्र तत्वविवेचक सन १८९९

REFBK-0002155

REFBK-0002155

REFBK-0002155
REFBK-0002155

आ. क्रं. १ सन १८८५
३३२ ३३२
२१५५ ५६०
३१०५

# भजनतरंगिणी.

## गणपतीचीं पदें.

पद—( राग, कल्याण—ताल त्रिवट. )

॥ १ ॥ गजवदन सखा म्यां नमिला हो ॥ ध्रु० ॥ प्रथमा- रंभीं मूळारंभीं ॥ नाचत रंगणीं आला हो ॥ गज० ॥ नंदें शेषफणीवर मेरू उभारी ॥ वाल्मिकें कीर्तनिं आणिल ॥ गज० ॥ २ ॥ तुका ह्मणे ध्यातों त्याला ॥ वाल्मिक... फिटला हो ॥ गजवदन० ॥ ३ ॥

पद—(राग, भूपकल्याण—चाल व ताल सदर.)

॥ २ ॥ वक्रतुंड गणराज गजानन ॥ शंकरतनया भवह- रणा ॥ कार्यारंभीं स्तवितों तुजला ॥ नमुनी आधीं प्रभुच- रणा ॥ ध्रु० ॥ पाशांकुशधर सिंदुरभूषित ॥ मूषकवहना सुख- सदना ॥ भक्तमनोरथ पूर्ण कराया ॥ अवतरलासी गजवदना ॥ वक्र० ॥ १ ॥ विघ्नेशा मम विघ्न हराया ॥ लौकर येईं अघ- शमना ॥ मत्कवनीं ह्या रंग भरोनी ॥ सुमती देईं ह्या दीना ॥ वक्रतुंड० ॥ २ ॥

पद—( राग, कालंगडा—ताल त्रिवट. )

॥ ३ ॥ गणराज गजानन गावा हो ॥ गणराज० ॥ ध्रु० ॥

सिंदुरचर्चित शुंड विराजित ॥ मोदक हस्तिं पाहावा हो ॥ गणराज० ॥ १ ॥ विघ्नविनाशक बुद्धिप्रकाशक ॥ तो वरदायक ध्यावा हो ॥ गणराज० ॥ २ ॥ आनंदात्मज चिंतितसे तुज ॥ हा भवसिंधु तरावा हो ॥ गणराज० ॥ ३ ॥

**पद**—( राग कल्याण ताल धुमाळी संतपदाची जोड या० चा. )

॥ ४ ॥ दे पायांची जोड ॥ मोरया दे पायांची जोड ॥ध्रु०॥ नादुखें भोगुनि सारीं ॥ विषयवासना तोड ॥ मोरया दे० ॥१॥ विण कवणा शरण मी जाऊं ॥ नाम तुझें बहु गोड ॥ या दे० ॥ २ ॥ धरणिधरा येवढेंचि जाणुनि ॥ काढिं पा नोंड ॥ मोरया दे० ॥ ३ ॥

**पद**—( राग कालंगडा ताल एका चाल चिरंचीव कल्याण.)

॥ ५ ॥ जयजय विघ्नेश्वर मोरेश्वर गजानना देवा ॥ हेंचि मागणें जन्मोजन्मीं घडो तुझी सेवा ॥ ध्रु० ॥ नलगे मजला तुजविण गजरथ राज्यादिक हेवा ॥ उठो जिव्हेला रात्रंदिस हा कीर्तनगुण मेवा ॥ जय० ॥ १ ॥ प्रपंचांत हे मुख्य तसा तूं परमार्थिक ठेवा ॥ युक्त असे तरि दे शिवरामा पदयुग हे सेवा ॥ जय० ॥ २ ॥

**पद**—(राग कल्याण—ताल धुमाळी.)

॥ ६ ॥ वंदूं देव गजानन रे ॥ वंदूं० ॥ध्रु० सकळारंभीं आधि ज्याला ॥ करिती पूजन रे ॥ वंदूं० ॥ १ ॥ ज्याचे स्मरणें हरतिल विघ्नें ॥ पूर्ण दयाघन रे ॥ वंदूं० ॥ २ ॥ देव गजानन

 सं-काव्य ३३२

गौरीनंदन ॥ विघ्नविनाशन रे ॥ वंदूं ॥ ३ ॥ मोदकभक्षण पिवळें वसन ॥ मूषक वाहन रे ॥ वंदूं ॥ ४ ॥ ज्याला ध्यातां सुखरुप जहालों ॥ गोसावीनंदन रे ॥ वंदूं० ॥ ५ ॥

पद—(राग सूधकल्याण ताल एका)

॥ ७ ॥ मोरयाचे पाय चला पाहूं यारे ॥ ध्रु० ॥ जग हें मिथ्या व्यर्थचि ममता ॥ सोडुनि शरण त्याला जाऊं यारे ॥ १ ॥ मोर० आनन्य शरण होउनी शुद्ध भावें ॥ मस्तक चरणीं त्याचे ठेऊं-यारे ॥ मोर० ॥ २ ॥ करुनी अर्पण सर्वही हेतू ॥ स्वानंदें सुखरुप राहूं यारे ॥ मोर० ॥ ३ ॥ २७५५

पद

॥ ८ ॥ येइंगा तुं येइंगा तूं पंढरीच्या राया ॥ तुजविण क्षणि वाटे क्षीण झाली काया ॥ ध्रु० ॥ यातिहीन मतिहीन कर्म हीन माझें ॥ सर्वहि लज्जा सोडुनि बापा, शरण आलों तूज ॥ १ दीननाथ दीनबंधू नाम तुझां साजे ॥ पतीत पावन ऐसि जगीं ब्रीदावळी गाजे ॥ २ ॥ विटेवरी उभा नीट कटावरी कर ॥ तुका ह्मणे आह्मां हेंचीं ध्यान नीरंतर ॥ ३ ॥

पद—(राग पिलु ताल धुमाळी चाल भजरे भया राम.)

॥ ९ ॥ हरि तुझी आवडी मज देई देई ॥ कृपा कटाक्षें पाहुनि मजकडे ॥ अहंममता नेई नेई ॥ ध्रु० ॥ बुद्धिसाक्षि तूं मूर्ति प्रगटुनि ॥ हृदयीं सुस्थिर राहिं राहिं ॥ तुझि० ॥ १ ॥ धांवति वृत्ती चहुंकडे त्यांसी ॥ तुजविण न दिसो काहिं काहिं ॥

तुझि० ॥ २ ॥ क्लेश संसारीं भोगितों कीं ॥ सर्व थार तुझे पायिं पायिं ॥ तुझि ॥ ३ ॥ तव दासाचा हाचि मनोरथ ॥ पुरवुनि सेवा घेईं घेईं ॥ तुझि० ॥ ४ ॥

**पद**—(राग कल्याण-ताल-धुमाळी-चाल-संतपदाची-जो)

॥ १० ॥ तूं माझा यजमान रामा तूं माझा य० ॥ ध्रु० ॥ जननीजठरीं रक्षियलें मज ॥ पोसुनि पंचहि प्राण ॥ रामा तूं० ॥ १ ॥ बाहेर निघतां मातेचे स्तनीं ॥ पय केलें निर्माण ॥ रामा तूं० ॥ २ ॥ ऐसें असतां या पोटाची ॥ कां करुं चिंता जाण ॥ रामा तूं० ॥ ३ ॥ मध्वमुनीश्वर सांगतसे तुज ॥ धरिं अमुचा अभिमान ॥ रामा तूं माझा यजमान ॥ ४ ॥

**पद**—(राग खमाज-ताल दादरा-चाल-वेगीं व्हावें सावधान.)

॥ ११ ॥ आठवितों रामा ॥ घडि घडि घडि चरण तुझे ॥ आसनिं शयनिं भोजनिं गमनिं छंद तुझा आह्मां ॥ घडि घडि० ॥ ध्रु० ॥ हृदय तीत पूर्ण ब्रह्म ॥ नित्य निर्विकारा ॥ अंबुजदलनयन मुनी ॥ मानसीं विहारा ॥ १ ॥ घडि घडि० ॥ सर्व साक्षी सर्वोत्तम ॥ सर्व गुरूरूपा ॥ प्रेमियातें सौख्यसिंधु ॥ दशरथकुळदीपा ॥ घडि घडि० ॥ २ ॥ तात मात भ्रात नाथ ॥ तूंचि एक पाहीं ॥ केशव ह्मणे करिं दया ॥ शरण तुझ्या पाईं ॥ ३ ॥ घडि घडि० ॥

**पद**—(राग-कल्याण ताल दादरा-चाल वदवदवदत.)

॥ १२ ॥ जप तूं रामनाम ॥ किति मधुर मधुर मधुर मधुर ॥ ज० ॥ ध्रु० ॥ राम नाम ध्वनि उमटे ॥ तेथें लक्ष लावीं नेटें ॥ ब्रह्मा

नंद सहज भेटे ॥ प्रचुर प्रचुर प्रचुर प्रचुर ॥ ज० ॥ १ ॥ दृश्य देखतांचि दिठीं देयीं द्रष्टेयासिं मिठी ॥ आपुलें आपण सौख्य घोटीं ॥ नदुर नदुर नदुर नदुर ॥ ज० ॥ २ ॥ राम विष्णु कृष्ण ध्यान ॥ त्यासि दे मुंकुंद ज्ञान ॥ जेणें होय समाधान ॥ चतुर चतुर चतुर चतुर ॥ ज० ॥ ३ ॥

## ॥ पद ॥

॥ १३ ॥ विठाबाई माउली ॥ माय माझी विठाबाई माउली ॥ध्रु०॥ मम अंत पाहूं नको त्वरित ये॥ उचली तये पावुली ॥१॥ माय० ॥ वत्सावरि गो रसोनी जैसा ॥ येताति चाउली ॥ २ ॥ माय० ॥ जयरात्मज तनयावरि करीं ॥ सुखकर कर साउली ॥ ३ ॥ माय० ॥

## ॥ अभंग ॥

॥ १ ॥ रूप पाहतां लोचनीं ॥ सुख झालें हो साजणी ॥१॥ तो हा विठ्ठल बरवा ॥ तो हा माधव बरवा ॥ २ ॥ बहुतां सुकृतांची जोडी ॥ ह्मणुनि विठ्ठलीं आवडी ॥ ३ ॥ सर्व सुखाचें आगर ॥ बाप रखुमादेवीवर ॥ ४ ॥

॥ २ ॥ समचरणदृष्टि विटेवरी साजिरी ॥ तेथें माझी हरी वृत्ति राहो ॥ १ ॥ आणिक नलगे मायिक पदार्थ ॥ तेथें माझें आर्त्त नको देवा ॥ २ ॥ ब्रह्मादिक पदें दुःखाची शिराणी ॥ तेथें चित्त झणी जडों देसी ॥ ३ ॥ तुका ह्मणे त्याचें कळलें आह्मां वर्म ॥ जे जे कर्मधर्म नाशवंत ॥ ४ ॥

तुझि० ॥ २ ॥ क्लेश संसारीं भोगितों कीं ॥ सर्व थार तुझे पायिं पायिं ॥ तुझि ॥ ३ ॥ तव दासाचा हाचि मनोरथ ॥ पुरवुनि-सेवा वेई घेई ॥ तुझि० ॥ ४ ॥

✓ **पद**—(राग कल्याण-ताल-धुमाळी-चाल-संतपदाची-जो)

॥ १० ॥ तूं माझा यजमान रामा तूं माझा य० ॥ ध्रु० ॥ जननीजठरीं रक्षियलें मज ॥ पोसुनि पंचहि प्राण ॥ रामा तूं० ॥ १ ॥ बाहेर निघतां मातेचे स्तनीं ॥ पय केलें निर्माण ॥ रामा तूं० ॥ २ ॥ ऐसें असतां या पोटाची ॥ कां करुं चिंता जाण ॥ रामा तूं० ॥ ३ ॥ मध्वमुनीश्वर सांगतसे तुज ॥ धरिं अमुचा अभिमान ॥ रामा तूं माझा यजमान ॥ ४ ॥

✓ **पद**—(राग खमाज-ताल दादरा-चाल-वेगीं व्हावें सावधान.)

॥ ११ ॥ आठवितों रामा ॥ घडि घडि घडि चरण तुझे ॥ आसनिं शयनिं भोजनिं गमनिं छंद तुझा आह्मां ॥ घडि घडि० ॥ ध्रु० ॥ हृदय तीत पूर्ण ब्रह्म ॥ नित्य निर्विकारा ॥ अंबुजदलनयन मुनी ॥ मानसीं विहारा ॥ १ ॥ घडि घडि० ॥ सर्व साक्षी सर्वोत्तम ॥ सर्व गुरू-रूपा ॥ प्रेमियातें सौख्यसिंधु ॥ दशरथकुळदीपा ॥ घडि घडि० ॥ २ ॥ तात मात भ्रात नाथ ॥ तूंचि एक पाहीं ॥ केशव ह्मणे करिं दया ॥ शरण तुझ्या पाईं ॥ ३ ॥ घडि घडि० ॥

✓ **पद**—(राग-कल्याण ताल दादरा-चाल वदवदवदत.)

॥ १२ ॥ जप तूं रामनाम ॥ किति मधुर मधुर मधुर मधुर ॥ ज० ॥ ध्रु० ॥ राम नाम ध्वनि उमटे ॥ तेथें लक्ष लावीं नेटें ॥ ब्रह्मा-

नंद सहज भेटे ॥ प्रचुर प्रचुर प्रचुर प्रचुर ॥ ज० ॥ १ ॥ दृश्य देखतांचि दिठीं देयीं द्रष्टयासिं मिठी ॥ आपुलें आपण सौख्य घोटीं ॥ नदुर नदुर नदुर नदुर ॥ ज० ॥ २ ॥ राम विष्णु कृष्ण ध्यान ॥ त्यासि दे मुंकुंद ज्ञान ॥ जेणें होय समाधान ॥ चतुर चतुर चतुर चतुर ॥ ज० ॥ ३ ॥

## ॥ पद ॥

॥ १३ ॥ विठाबाई माउली ॥ माय माझी विठाबाई माउली ॥ध्रु० ॥ मम अंत पाहू नको त्वरित ये ॥ उचली तये पावुली ॥१॥ माय० ॥ वत्सावरि गो रसोनी जैसा ॥ येताति चाउली ॥ २ ॥ माय० ॥ जयरात्मज तनयावरि करीं ॥ सुखकर कर साउली ॥ ३ ॥ माय० ॥

## ॥ अभंग ॥

॥ १ ॥ रूप पाहतां लोचनीं ॥ सुख झालें हो साजणी ॥१॥ तो हा विठ्ठल बरवा ॥ तो हा माधव बरवा ॥ २ ॥ बहुतां सुकृतांची जोडी ॥ म्हणुनि विठ्ठलीं आवडी ॥ ३ ॥ सर्व सुखाचें आगर ॥ बाप रखुमादेवीवर ॥ ४ ॥

॥ २ ॥ समचरणदृष्टि विटेवरी साजिरी ॥ तेथें माझी हरी वृत्ति राहो ॥ १ ॥ आणिक नलगे मायिक पदार्थ ॥ तेथें माझें आर्त नको देवा ॥ २ ॥ ब्रह्मादिक पदें दुःखाची शिराणी ॥ तेथें चित्त म्हणी जडों देसी ॥ ३ ॥ तुका म्हणे त्याचें कळलें आम्हां वर्म ॥ जे जे कर्मधर्म नाशवंत ॥ ४ ॥

॥ ३ ॥ सुंदर तें ध्यान उभें विटेवरी ॥ कर कटावरी ठेवोनियां ॥ १ ॥ गळां तुळसीहार कासे पितांबर ॥ आवडे निरंतर हेंचि ध्यान ॥ २ ॥ मकरकुंडलें तळपती श्रवणीं ॥ कंठीं कौस्तुभमणि विराजित ॥ ३ ॥ तुका ह्मणे माझें हेंचि सर्व सुख ॥ पाहिन श्रीमुख आवडीनें ॥ ४ ॥

॥ ४ ॥ सदा माझे डोळा जडो तुझी मूर्ती ॥ रखुमाईच्या पती सोयरीया ॥ १ ॥ गोड तुझें रूप गोड तुझें नाम ॥ देई मज प्रेम सर्वकाळ ॥ २ ॥ विठो माउलिये हाचि वर देईं ॥ संचरोनि राहीं हृदयामाजी ॥ ३ ॥ तुका ह्मणे कांहीं न मागें आणिक ॥ तुझे पायीं सुख सर्व आहे ॥ ४ ॥

॥ ५ ॥ रूपीं गुंतले लोचन ॥ चरणीं स्थिरावलें मन ॥ १ ॥ देहभाव हरपला ॥ तुज पाहातां विठ्ठला ॥ २ ॥ कळोंनये सुखदुःख ॥ तान हरपली भूक ॥ ३ ॥ तुका ह्मणे नव्हे परती ॥ तुझ्या दर्शना मागुती ॥ ४ ॥

॥ ६ ॥ पहिलें देखीलें श्रीमुख ॥ तहान हरपली भूक ॥ १ ॥ पहा पहा डोळेभरी॥मूर्ति सांवळी गोजिरी ॥२॥ रवि शशी ज्याच्या कळा ॥ तो हा मदनाचा पूतळा ॥ ३ ॥ तुका ह्मणे वर्णू कांई ॥ घेतों अलाई बलाई ॥ ४ ॥

॥ ७ ॥ कर कटावरी तुळसीच्या माळा ॥ ऐसें रूप डोळां दावीं हरी ॥ १ ॥ ठेविले चरण दोन्ही विटेवरी ॥ ऐसें रूप हरी दावीं डोळां ॥ २ ॥ कटीं पीतांबर कास मिरवली ॥ दाखवीं वहीली ऐसी मूर्ती ॥ ३ ॥ गरुडपारावरी उभा राहिलासी ॥ आठवे

मानसीं तेंचि रूप ॥ ४ ॥ झुरोनि पांजरा होऊं पाहें आता ॥ येईं पंढरीनाथा भेटावया ॥ ५ ॥ तुका ह्मणे माझी पुरवावी आस ॥ विनंती उदास करूंनये ॥ ६ ॥

॥ ८ ॥ राजस सुकुमार मदनाचा पुतळा ॥ रविशशिकळा लोपलिया ॥ १ ॥ कस्तुरी मळवट चंदनाची उटी ॥ रुळे माळ कंठीं वैजयंती ॥ २ ॥ मुगुट कुंडलें श्रीमुख शोभलें ॥ सुखाचें ओतलें सकळही ॥ ३ ॥ कासे सोनसळा पांघरे पाटोळा ॥ घननीळ सांवळा बाईयानों ॥ ४ ॥ सकळही तुह्मीं व्हागे एकी सवा ॥ तुका ह्मणे जीवा धीर नाहीं ॥ ५ ॥

॥ ९ ॥ वचन ऐका कमळापती ॥ माझी रंकाची विनंती ॥ १ ॥ कर जोडितों कथेकाळीं ॥ आपण असावें जवळी ॥ २ ॥ ध्यावीध्यावी माझी भाक ॥ जरि का मागेन आणिक ॥ ३ ॥ तुकया बंधू ह्मणे देवा ॥ शब्द इतुकाची राखावा ॥ ४ ॥

॥ १० ॥ रंग मांडिला रंगणीं ॥ उभा राहिलों कीर्तनीं ॥ १ ॥ हातीं घेऊनीयां विणा ॥ कंठीं राहें नारायणा ॥ २ ॥ सांवळी देखिली ती मूर्ती ॥ माझ्या जीवींची विश्रांती ॥ ३ ॥ तुका ह्मणे देगा देवा ॥ देईं कीर्तनाचा ठेवा ॥ ४ ॥

॥ ११ ॥ येग येग विठाबाई ॥ आह्मां अनाथांचे आई ॥ १ ॥ भीमा आणि चंद्रभागा ॥ तुझ्या चरणींच्या गंगा ॥ २ ॥ इतुक्यांसहित तुंवा यावें ॥ माझ्या रंगणीं नाचावें ॥ ३ ॥ माझा रंग तूझ्या गुणीं ॥ ह्मणे नामयाची जनी ॥ ४ ॥

॥ १२ ॥ येईं गे विठ्ठले विश्वजीवनकले ॥ सुंदर घननीळे

पांडुरंगे ॥ १ ॥ येईं गे विठ्ठले करुणाकल्लोळे ॥ जीव तळमळे भेटावया ॥ २ ॥ नलगती गोड आणीक उत्तरें ॥ तुझें प्रेम झुरे भेटावया ॥ ३ ॥ तुका ह्मणे धांव घालीं कृष्णाबाई ॥ क्षेम चहूं बाहीं देईं मज ॥ ४ ॥

॥ १३ ॥ कटावरी कर कासया ठेविले ॥ जननी विठ्ठले जीवलगे ॥ १ ॥ शंखचक्रगदाकमळमंडित ॥ आयुधें मंडित कृष्णाबाई ॥ २ ॥ क्षण एक धीर होत नाहीं चित्ता ॥ केव्हां पंढरिनाथा भेटशील ॥ ३ ॥ तुका ह्मणे हेंचि करीं देईं क्षेमा ॥ तईंच विश्रामा पावईन ॥ ४ ॥

॥ १४ ॥ अपराध जरी झाले असंख्यात ॥ तरी कृपावंत नाम तुझें ॥ १ ॥ तुझें लाडिवाळ तुज कृपा यावी ॥ म्यां वाट पाहावी कवणाची ॥ २ ॥ मायबाप माझा रुक्मादेवीवर ॥ हा दृढ निर्धार अंतरींचा ॥ ३ ॥ तुका ह्मणे कोणे गोष्टींचें संकट ॥ नघालीं मज भेट नारायणा ॥ ४ ॥

॥ १५ ॥ बारे पांडुरंगा केव्हां भेटी देसी ॥ जाहलों मि परदेसी तुजवीण ॥ १ ॥ तुजवीण सखा मज नाहीं कोणी ॥ वाटतें चरणीं घालूं मिठी ॥ २ ॥ ओवाळावी काया चरणां वरोनी ॥ केव्हां चक्रपाणी भेटी देसी ॥ ३ ॥ तुका ह्मणे माझी पुरवीं आवडी ॥ वेगीं घाली उडी नारायणा ॥ ४ ॥

॥ १६ ॥ नव्हे निष्ठावंत तुज काय बोल ॥ सेवेविण मोल मागतसें ॥ १ ॥ न घडे भजन शुद्ध भाव निष्ठा ॥ आपुल्या अदृष्टावरी बोल ॥ २ ॥ पूर्वीं झाले भक्त असंख्य विरक्त ॥ काम

क्रोध अहंते निर्दाळिलें ॥ ३ ॥ ऐसी अंगवण नाहीं मज देवा ॥ करीतसें हेवा भेटायाचा ॥ ४ ॥ कृपा करोनियां पुरवीं असोसी ॥ आपुल्या ब्रिदासी राखावया ॥ ५ ॥ तुका ह्मणे एक बाळक अज्ञातें ॥ त्यासी हे पोसित मायबापें ॥ ६ ॥

॥ १७ ॥ हेंचि मागणें विठाबाई ॥ पायीं ठेवूनियां डोई ॥ १ शांति दया अंतःकरणीं ॥ रंगो रामनामीं वाणी ॥ २ ॥ मूळ द्वंद्वाचें विघडो ॥ निजानंदीं वृत्ति जडो ॥ ३ ॥ तुका ह्मणे हरी ॥ आतां आपुलेंसें करीं ॥ ४ ॥

॥ १८ ॥ कृपाळू सज्जन तुह्मीं संतजन ॥ एवढें कृपादान तुमचें मज ॥ १ ॥ आठवण तुह्मी द्यावी पांडुरंगा ॥ कींव माझी सांगा काकुलती ॥ २ ॥ अनाथ अपराधी पतित आगळा ॥ परि पायां वेगळा नका करूं ॥ ३ ॥ तुका ह्मणे तुह्मी निरविल्यावरी ॥ मग मज हरी उपेक्षिना ॥ ४ ॥

॥ १९ ॥ रामकृष्ण गोविंद नारायण हरी ॥ केशवा मुरारी पांडुरंगा ॥ १ ॥ लक्ष्मीनिवासा पाहें दीनबंधु ॥ तुझा लागो छंदु सदा मज ॥ २ ॥ तुझे नामीं प्रेम देईं अखंडित ॥ नेणें तपव्रत दान कांहीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे माझें हेंचि गा मागणें ॥ अखंडही गाणें नाम तुझें ॥ ४ ॥

॥ २० ॥ हरी तुझें नाम गाईन अखंड ॥ याविण पाखंड नेणें कांहीं ॥ १ ॥ अंतरीं विश्वास अखंड नामाचा ॥ काया मनें वाचा देईं हेंचि ॥ २ ॥ तुका ह्मणे आतां देईं संतसंग ॥ तुझे नामीं रंग भरो मना ॥ ३ ॥

॥ २१ ॥ सांवळें सुंदर रूप मनोहर ॥ राहो निरंतर हृदयीं माझे ॥ १ ॥ आणीक कांहीं आह्मां इच्छा नाहीं चाड ॥ तुझें नाम गोड पांडुरंगा ॥ २ ॥ जन्मोजन्मीं ऐसें मागितलें तुज ॥ आह्मांसी सहज द्यावें आतां ॥ ३ ॥ तुका ह्मणे देवा तुज ऐसे दयाळ ॥ धुंडितां सकळ नाहीं आह्मां ॥ ४ ॥

॥ २२ ॥ कोठें गुंतलासी योगीयांचे ध्यानीं ॥ आनंद कीर्तनीं पंढरीच्या ॥ १ ॥ काय काज कोठें पडलीसे गुंती ॥ कानीं न पडती बोल माझे ॥ २ ॥ काय शेषशयनीं सुखनिद्रा आली ॥ सोय कां सांडिली तुह्मीं देवा ॥ ३ ॥ तुका ह्मणे कोठें गुंतलेती सांगा ॥ किती पांडुरंगा वाट पाहूं ॥ ४ ॥

॥ २३ ॥ जन्ममरणांची कायसी चिंता ॥ तुझ्या शरणागता पंढरीराया ॥ १ ॥ वदनीं तुझें नाम अमृतसंजिवनी ॥ असतां चक्रपाणी भय कवण ॥ २ ॥ हृदयीं तुझें रूप बिंबलें साकार ॥ तेथें कोण पाड संसाराचा ॥ ३ ॥ तुका ह्मणे तुझ्या चरणांची पाखर ॥ असतां कळिकाळ पायातळीं ॥ ४ ॥

॥ २४ ॥ गरुडाचें वारिकें कासे पितांबर ॥ सांवळें मनोहर कैं देखेन ॥ १ ॥ बरवया बरवंटा घनमेघ सांवळा ॥ वैजयंती माळा गळां शोभे ॥ २ ॥ मुगुट माथां कोटिसूर्यांचा झळाळ ॥ कौस्तुभ निर्मळ शोभे कंठीं ॥ ३ ॥ ओतींव श्रीमुख सुखाचें सकळ ॥ वामांगीं वेल्हाळ रखुमादेवी ॥ ४ ॥ उद्धव अक्रुर उभे दोहींकडे ॥ वर्णिती पवाडे सनकादिक ॥ ५ ॥ तुका ह्मणे नव्हे अणिकांसारिखा ॥ तोचि माझा सखा पांडुरंग ॥ ६ ॥

स.काव्य
१९० ३३२

॥ २५ ॥ नये जरि तुज मधुर उत्तर ॥ दिधला सुस्वर नाहीं देवें ॥ १ ॥ नाहीं तयाविण भुकला विठ्ठल ॥ येईल तैसा बोल रामकृष्ण ॥ २ ॥ देवापाशीं मागें आवडीची भक्ति ॥ विश्वासेंशीं प्रीति भावबळें ॥ ३ ॥ तुका ह्मणे मना सांगतों विचार ॥ धरावा निर्धार दिसेंदिस ॥ ४ ॥

॥ २६ ॥ वंदूं चरणरज सेवूं उष्टावळी ॥ पूर्व कर्मा होळी करुनी सांडूं ॥ १ ॥ अमुप हें गाठीं बांधूं भांडवल ॥ अनाथ विठ्ठल आह्मांजोगा ॥२॥ अवघे होती लाभ एका या चिंतनें ॥ नामसंकीर्तनें गोविंदाच्या ॥ ३ ॥ जन्मामरणाच्या खुंटतील खेपा ॥ होईल हा सोपा सिद्ध पंथ ॥ ४ ॥ गेले पुढें त्यांचा शोधीत मारग ॥ चला जाऊं माग घेत आह्मीं ॥ ५ ॥ तुका ह्मणे घालूं जीवपणा चिरा ॥ जाऊं त्या माहेरा निजाचिया ॥ ६ ॥

॥ २७ ॥ धर्माची तूं मूर्ती ॥ पापपुण्य तुझे हातीं ॥ १ ॥ मज सोडवीं दातारा ॥ कर्मापासूनि दुस्तरा ॥ २ ॥ करिसी अंगीकार ॥ तरी काय माझा भार ॥ ३ ॥ जिवींच्या जीवना ॥ तुका ह्मणे नारायणा ॥ ४ ॥

॥ २८ ॥ नेणें गाणें कंठ नाहीं हा सुस्वर ॥ घालुं तुज भार पांडुरंगा ॥ १ ॥ नेणें राग वेळ काळ घात मात ॥ तुझे पायीं चित्त ठेवीं देवा ॥ २ ॥ तुका ह्मणे मज चाड नाहीं जना ॥ तुज नारायणावांचुनिया ॥ ३ ॥

॥ २९ ॥ काय उणें आह्मां विठोबाचे पायीं ॥ नाहीं ऐसें काई येथें एक ॥ १ ॥ नये भोंवतालें ठायीं वांटूं मन ॥ बराडी

करून दारोदारीं ॥ २ ॥ कोण बळी माझ्या विठोबावेगळा ॥ आणीक आगळा दुजा सांगा ॥ ३ ॥ तुका ह्मणे मोक्ष विठोबाचे गांवीं ॥ फुकाचीं लुटावीं भांडारें तीं ॥ ४ ॥

॥ ३० ॥ न व्हावें तें झालें देखियेले पाय ॥ आतां फिरूं काय मागें देवा ॥ १ ॥ बहु दिस होतों करीत हे आस ॥ तें आलें सायासें फळ आजी ॥ २ ॥ कोठवरि जिणें संसाराच्या आशा ॥ उगवो हा फांसा एथूनिया ॥ ३ ॥ बुडालीं तयांचा मूळ ना मारग ॥ लागला तो लाग सोडूनियां ॥ ४ ॥ पुढें उल्लंघितां दुःखाचे डोंगर ॥ नाहीं अंतपार गर्भवासा ॥ ५ ॥ तुका ह्मणे कास धरीन पीतांबरीं ॥ तूं भवसागरीं तारूं देवा ॥६॥

॥ ३१ ॥ तुजविण मज कोण वो सोयरें ॥ आणीक दुसरें पांडुरंगे ॥ १ ॥ लागलीसे आस पाहें तुझें वास ॥ रात्रीं वो दिवस लेखीं बोटीं ॥ २ ॥ काम गोड मज नलगे हा धंदा ॥ तुका ह्मणे सदां हेंचि ध्यान ॥ ३ ॥

॥ ३२ ॥ आह्मीं मागों ऐसें नाहीं तुजपाशीं ॥ जरी तूं भीतोसी पांडुरंगा ॥ १ ॥ पाहें विचारूनि आहे तुज ठावें ॥ आह्मीं धालों नांवें तुझ्या एका ॥ २ ॥ रिद्धि सिद्धि तुझें मोक्ष भांडवल ॥ हें तों आम्हां फोल भक्तीपुढें ॥ ३ ॥ तुका ह्मणे जाऊं वैकुंठा चालत ॥ बैसोनी निवांत सुख भोगूं ॥ ४ ॥

॥ ३३ ॥ नलगे हें मज तुझें ब्रह्मज्ञान ॥ गोजिरें सगुण रूप पुरे ॥ १ ॥ लागला उशीर पतितपावना ॥ विसरोनि वचना गेलासिया ॥ २ ॥ जाळोनि संसार बैसलों अंगणीं ॥

तुझे नाहीं मनीं मानसींही ॥ ३ ॥ तुका ह्मणे नको रागेजों विठ्ठला ॥ उठीं देई मला भेटी आतां ॥ ४ ॥

॥ ३४ ॥ काय सांगों तुझ्या चरणांच्या सुखा ॥ अनुभव ठाऊका नाहीं तुज ॥ १ ॥ बोलतां हें कैसें वाटे खरेपण ॥ अमृताचे गुण अमृतासी ॥ २ ॥ आह्मी एक एका ग्वाही मायपुतें ॥ जाणों तें निरुतें सुख दोघें ॥ ३ ॥ तुका ह्मणे आह्मां मोक्षाचा कांटाळा ॥ कां तुह्मी गोपाळा नेणां ऐसें ॥ ४ ॥

॥ ३५ ॥ देखोनियां तुझ्या रूपाचा आकार ॥ उभा कटीं कर ठेवूनियां ॥ १ ॥ तेणें माझ्या चित्ता होतें समाधान ॥ वाटे तें चरण न सोडावे ॥ २ ॥ मुखें गातों गीत वाजवितों टाळी ॥ नाचतों राउळीं प्रेमसुखें ॥ ३ ॥ तुका ह्मणे मज तुझ्या नामापुढें ॥ तुच्छ हें बापुडें सकळही ॥ ४ ॥

॥ ३६ ॥ आतां येणें विण नाहीं आह्मां चाड ॥ कोण बडबड करी वांया ॥ १ ॥ सुख तेंचि दुःख पुण्य पापखरें ॥ हें तों आह्मां बरें कळों आलें ॥ २ ॥ तुका ह्मणे वाचा वाहिली अनंता ॥ बोलायाचें आतां काम नाहीं ॥ ३ ॥

॥ ३७ ॥ कां रे माझा तुज नये कळवळा ॥ असोनि जवळा हृदयस्था ॥ १ ॥ अगा नारायणा निष्ठुरा निर्गुणा ॥ केला शोक नेणां कंठस्फोट ॥ २ ॥ कां हें चित्त नाहीं पावलें विश्रांती ॥ इंद्रियांची गति कुंटेचिना ॥ ३ ॥ तुका ह्मणे कां रे धरियेला कोप ॥ सरलें नेणों पाप पांडुरंगा ॥ ४ ॥

॥ ३८ ॥ दीनानाथा तुझीं ब्रिदें चराचर ॥ घेसील कैवार शरणागता ॥ १ ॥ पुराणीं जे तुझे गर्जती पवाडे ॥ ते आह्मां रोकडे कळों आले ॥ २ ॥ आपुल्या दासांचें न साहसी उणें ॥ उभा त्याकारणें राहिलासी ॥ ३ ॥ चक्र गदा हातीं आयुधें अपारें ॥ न्यून तेथें पुरें करूं धांवे ॥ ४ ॥ तुका ह्मणे तुज भक्तीचें कारण ॥ करावया पूर्ण अवतार ॥ ५ ॥

॥ ३९ ॥ वर्णूं महिमा ऐसी नाहीं मज वाचा ॥ नबोलवे साचा पार तुझा ॥ १ ॥ ठायींची हे काया ठेविली चरणीं ॥ आतां ओवाळूनि काय सांडूं ॥ २ ॥ नाहीं भाव ऐसा करूं तुझी सेवा ॥ जीव वाहूं देवा तोही तुझा ॥ ३ ॥ मज माझें कांहीं न दिसे पाहतां ॥ जें तुज अनंता समर्पावें ॥ ४ ॥ तुका ह्मणे आतां नाहीं मज थार ॥ तुझे उपकार फेडावया॥५॥

॥ ४० ॥ नव्हे सुख मज नलगे हा मान ॥ न राहे हें जन काय करूं॥ १ ॥ देह उपचारें पोळतसे अंग ॥ विषतुल्य चांग मिष्टान्न तें ॥ २ ॥ नाइकावे स्तुस्ति वाणितां थोरीव ॥ होतो माझा जीव कासावीस ॥ ३ ॥ तुज पावें ऐसी सांग कांहीं कळा॥ नको मृगजळा गोवूं मज ॥ ४ ॥ तुका ह्मणे आतां करीं माझें हित ॥ काढावें जळत आगींतूनि ॥ ५ ॥

॥ ४१ ॥ न मिळो खावया न वाढो संतान ॥ परि हा नारायण कृपा करो ॥ १ ॥ ऐसी माझी वाचा मज उपदेशी ॥ आणीक लोकांसी हेंचि सांगे ॥ २ ॥ विटंबो शरीर होत कां

विपत्ती ॥ परि राहो चित्तीं नारायण ॥ ३ ॥ तुका ह्मणे नाशिवंत हें सकळ ॥ आठवे गोपाळ तेंचि हित ॥ ४ ॥

॥ ४२ ॥ जरी माझी कोणी कापितील मान ॥ तरी नको आन वदों जिव्हे ॥ १ ॥ सकळां इंद्रियां हे माझी विनंती ॥ नका होऊं परतीं पांडुरंगा ॥ २ ॥ आणिकांची मात नाइकावी कानीं ॥ आणीक नयनीं न पहावें ॥ ३ ॥ चित्ता तुवां पायीं रहावें अखंडित ॥ होउनी निश्चित एकविध ॥ ४ ॥ चला पाय हात हेंचि काम करा ॥ माझ्या नमस्कारा विठोबाच्या ॥ ५ तुका ह्मणे तुह्मां भय काय करी ॥ आमुचा कैवारी नारायण ॥ ६ ॥

॥ ४३ ॥ तुजविण वाणीं आणिकांची थोरी ॥ तरी माझी हरी जिव्हा झडो ॥ १ ॥ तुजविण चित्ता आवडे आणीक ॥ तरी हा मस्तक भंगो माझा ॥ २ ॥ नेत्रीं आणिकांसि पाहीन आवडी ॥ जातु तेचि घडी चांडाळ हे ॥ ३ ॥ कथामृतपान न करिती श्रवण ॥ काय प्रयोजन मग यांचें ॥ ४ ॥ तुका ह्मणे काय वांचून कारण ॥ तुज एक क्षण विसंबतां ॥ ५ ॥

॥ ४४ ॥ विठ्ठलारे तूं उदाराचा राव ॥ विठ्ठला तूं जीव या जगाचा ॥ १ ॥ विठ्ठलारे तूं उदाराची रासी ॥ विठ्ठला तुजपाशीं सकळ सिद्धी ॥ २ ॥ विठ्ठलारे तुझें नाम बहु गोड ॥ विठ्ठलारे कोड पुरविसी ॥ ३ ॥ विठ्ठलारे तुझें श्रीमुख चांगलें ॥ विठ्ठला लागलें ध्यान मनीं ॥ ४ ॥ विठ्ठलारे वाचे बोला बहुरस ॥

विठ्ठलारे सोस घेतला जीवें ॥ ५ ॥ विठ्ठलारे शोक करितसे तुका ॥ विठ्ठला तूं येकां झडकरी ॥ ६ ॥

॥ ४५ ॥ आणीक दुसरें मज नाहीं आतां ॥ नेमिलें या चित्तापासुनियां ॥१॥ पांडुरंग मनीं पांडुरंग ध्यानीं जागृतीं स्वप्नीं पांडुरंग ॥ २ ॥ पडिलें वळण इंद्रियां सकळां ॥ भाव तो निराळा नाहीं दुजा ॥ ३ ॥ तुका ह्मणे नेत्रीं केलें ओळखण ॥ साजिरें तें ध्यान विटेवरी ॥ ४ ॥

॥ ४६ ॥ लक्षूनियां योगी पाहाती आभास ॥ तें दिसे आह्मांस दृष्टीपुढें ॥ १ कर दोन्ही कटीं राहिलासे उभा ॥ सांवळी हे प्रभा अंगकांती ॥ २ ॥ व्यापूनि वेगळें राहिलेंसे दुरी ॥ सकळां अंतरीं निर्विकार ॥ ३ ॥ रूप नाहीं रेखा नामही जयासी ॥ आपुल्या मानसीं शिव ध्याय ॥ ४ ॥ अंत नाहीं पार वर्णा नाहीं थार ॥ कुळ याति शिर हस्तपाद ॥ ५ ॥ अचेत चेतलें भक्तीचिया सुखें ॥ आपुल्या कौतुकें तुका ह्मणे ॥ ६ ॥

॥ ४७ ॥ कैसें करूं ध्यान कैसापाहों तुज ॥ वर्म दावीं मज याचकासी ॥ १ ॥ कैसी भक्ति करूं सांग तुझी सेवा ॥ कोण्याभावें देवा आतुडसी ॥ २ ॥ कैसी कीर्ति वाणूं कैसा लक्षा आणूं ॥ जाणूंहा कवणु कैसा तुज ॥ ३ ॥ कैसा गाऊं गीतीं कैसा ध्याऊं चित्तीं ॥ कैसी स्थिती मती दावीं मज ॥ ४ ॥ तुकाह्मणे जैसें दास केलें देवा ॥ तैसे हें अनुभवा आणि मज ॥ ५ ॥

॥ ४८ ॥ होईन भिकारी ॥ पंढरीचा वारकरी ॥ १ ॥ हाचि

माझा नेम धर्म ॥ अवघें विठोबाचें नाम ॥ २ ॥ हेचि माझी उपासना ॥ लागेन संतांच्या चरणा ॥ ३ ॥ तुका ह्मणे देवा ॥ करीन ते भाळी सेवा ॥ ४ ॥

॥ ४९ ॥ नसे तरी मनीं नसो ॥ परी वाचे तरी वसो ॥ १ ॥ देह पडो या चिंतनें ॥ विठ्ठल नामसंकीर्तनें ॥ २ ॥ दंभस्थिती भलत्या भावें ॥ मज हरिजन ह्मणावें ॥ ३ ॥ तुका ह्मणे काळें तरी ॥ मज सांभाळील हरी ॥ ४ ॥

॥ ५० ॥ घेई घेई माझे वाचे ॥ गोड नाम विठोबाचें ॥ १ ॥ तुह्मी घ्यारे डोळे सुख ॥ पाहा विठोबाचें मुख ॥ २ ॥ तुह्मी आईकारे कान ॥ माझ्या विठोबाचे गुण ॥ ३ ॥ मना तेथें धांव घेई ॥ राहें विठोबाचे पायीं ॥ तुका ह्मणे जीवा ॥ नको सोडूं या केशवा ॥ ४ ॥

॥ ५१ ॥ धणी नपुरे गुण गातां ॥ रूप दृष्टी न्याहाळितां ॥ १ ॥ बरवा बरवा पांडुरंग ॥ कांति सांवळी सुरंग ॥ २ ॥ सर्व मंगळाचें सार ॥ मुख सिद्धीचें भांडार ॥ ३ ॥ तुका ह्मणे सुखा ॥ अंतपार नाहीं लेखा ॥ ४ ॥

॥ ५२ ॥ तुज मागणें तें देवा ॥ आह्मां तुझी चरणसेवा ॥ १ ॥ आन नेघों देसी तरी ॥ रिद्धि सिद्धि मुक्ति चारी ॥ २ ॥ संत संगति सर्वकाळ ॥ थोर प्रेमाचा सुकाळ ॥ ३ ॥ तुका ह्मणे नाम ॥ तेणें पुरे माझें काम ॥ ४ ॥

॥ ५३ ॥ तुझा शरणागत ॥ जन्मोजन्मींचा अंकित ॥ १ ॥ आणीक नेणें कांहीं हेवा ॥ तुजवांचूनि केशवा ॥ २ ॥ हेंचि

माझें गाणें ॥ तुझें नाम संकीर्तन ॥ ३ ॥ तुझ्या नामांचीं भूषणें ॥ तुका ह्मणे ल्यालों लेणें ॥ ४ ॥

॥ ९४ ॥ उतरलों पार ॥ सत्य झाला हा निर्धार ॥ १ ॥ तुझें नाम धरिलें कंठीं ॥ केली संसाराची तुटी ॥ २ ॥ आतां नव्हे बाधा ॥ कोणेविशीं कांहीं कदा ॥३॥ तुका ह्मणे कांहीं ॥ आतां उरलें ऐसें नाहीं ॥ ४ ॥

॥ ९५ ॥ धन्य देहू गांव पुण्य भूमीठाव ॥ तेथें नांदे देव पांडुरंग ॥ १ ॥ धन्य क्षेत्रवासी लोक ते दैवाचे ॥ उच्चारिती वाचे नाम-घोष ॥ २ ॥ करकटी उभा विश्वाचा जनिता ॥ वामांगीं ते माता रखुमादेवी ॥ ३ ॥ गरुड दारीं उभा जोडुनियां कर ॥ अश्वत्थ समोर उत्तरामुख ॥ ४ ॥ दक्षिणे शंकर लिंग हरेश्वर ॥ शोभे गंगातीर इंद्रायण ॥ ५ ॥ लक्ष्मीनारायण बल्लाळाचें वन ॥ तेथें अधिष्ठान सिद्धेश्वर ॥ ६ ॥ विघ्नराज द्वारीं बहिरव बाहेरी ॥ हनमंत शेजारीं सहित दोघ ॥ ७ ॥ तेथें दास तुका करितो कीर्तन ॥ हृदयीं चरण विठोबाचे ॥ ८ ॥

॥ ९६ ॥ अल्प माझी मती ॥ ह्मणोनि येतों काकुलती ॥ १ ॥ आतां दाखवा दाखवा ॥ मज पाउलें केशवा ॥ २ ॥ धीर माझ्या मना ॥ नाहीं नाहीं नारायणा ॥ ३ ॥ तुका ह्मणे दया ॥ मज करा अभागिया ॥ ४ ॥

॥ ९७ ॥ वाटुली पाहातां सिणले डोळुले ॥ दाविसी पाउलें कैंवो डोळां ॥ १ ॥ तूं माय माउली कृपेची साउली ॥ विठ्ठले पाहिली वास तुझी ॥ २ ॥ कांबा मोकलिलें कवणा निरविलें ॥

कठिण कैसें झालें हृदय तुझें ॥ ३ ॥ तुका ह्मणे माझ्या आसा-वल्या बाह्या ॥ तुज क्षेम द्याया पाडुरंगा ॥ ४ ॥

॥ ५८ ॥ विठ्ठल सोयरा सज्जन सांगाती ॥ विठ्ठल या चित्तीं बैसलासे ॥ १ ॥ विठ्ठलें हें अंग व्यापीली ते काया ॥ विठ्ठल हे छाया माझी मज ॥ २ ॥ बैसला विठ्ठल जिव्हेचिया माथां ॥ न वदे अन्यथा आन दुजें ॥ ३ ॥ सकळां इंद्रियां मन एक प्रधान ॥ तें ही करी ध्यान विठोबाचें ॥ ४ ॥ तुका ह्मणे या विठ्ठलासी आतां ॥ नये विसंबतां माझें मज ॥ ५ ॥

॥ ५९ ॥ सकळ धर्म मज विठोबाचें नाम ॥ अणीकतें वर्म नेणें कांहिं ॥ १ ॥ काय जाणों संतां निरविलें देवें ॥ करिती याभावें कृपा मज ॥ २ ॥ तुका ह्मणे माझा कोण अधिकार ॥ तो मज विचार कळों यावा ॥ ३ ॥

॥ ६० ॥ उदंड शाहाणे होत तर्कवंत ॥ परि या नेणवे अंत विठोबाचा ॥ १ ॥ उदंडा अक्षरां करोत भरोवरी ॥ परि ते नेणवे थोरी विठोबाची ॥ २ ॥ तुका ह्मणे नाहीं भोळेपणा-विण ॥ जाणीव ते सिण रितें माप ॥ ३ ॥

॥ ६१ ॥ आमुची कृपाळु तूं होसी माउली ॥ विठ्ठले साउली शरणागता ॥ १ ॥ प्रेमपान्हा स्तनीं सदा सर्व काळ ॥ दृष्टी हे निर्मळ अमृताची ॥ २ ॥ भूक तान दुःख वाटों नेदीं सीण ॥ अंतरींचा गुण जाणोनियां ॥ ३ ॥ आशा तृष्णा माया चिंता दवडीं दुरी ॥ ठाव आह्मां करीं खेळावया ॥ ४ ॥ तुका

ह्मणे लावीं संताचा सांगात ॥ जेथें नपावे हात कळिकाळाचा ॥ ५ ॥

॥ ६२ ॥ पाहतां श्रीमुख सुखावलें सुख ॥ डोळियांची भूक नवजो माझी ॥ १ ॥ जिव्हे गोडी तीन अक्षरांचा रस ॥ अमृत जयास फिकें पुढें ॥ २ ॥ श्रवणींचीं वाट चोखाळली शुद्ध ॥ गेले भेदाभेद वारोनियां ॥ ३ ॥ महामळें मन होतें जें गांदलें ॥ शुद्ध चोखाळलें स्फटिक जैसें ॥ ४ ॥ तुका ह्मणे माझ्या जीवाचें जीवन ॥ विठ्ठल निधान सांपडलें ॥ ५ ॥

॥ ६३ ॥ पतिव्रते जैसा भ्रतार प्रमाण ॥ आह्मां नारायण तैशापरी ॥ १ ॥ सर्व भावें लोभ्या आवडे हें धन ॥ आह्मां नारायण तैशापरी ॥ २ ॥ तुका ह्मणे एकविध झालें मन ॥ विठ्ठलावांचून नेणे दुजें ॥ ३ ॥

॥ ६४ ॥ विठ्ठल गीतीं गावा विठ्ठल चित्तीं ध्यावा ॥ विठ्ठल उभा पाहावा विटेवरी ॥ १ ॥ अनाथाचा बंधु विठ्ठल कृपासिंधु ॥ तोडी भवबंधु यमपाश ॥ २ ॥ तोचि शरणांगता विठ्ठल मुक्तिदाता ॥ विठ्ठल या संतांसमागमें ॥ ३ ॥ विठ्ठल गुणनिधी विठ्ठल सर्व सिद्धी ॥ लागली समाधी विठ्ठल नामें ॥४॥ विठ्ठलाचें नाम घेतां झालें सुख ॥ गोडावलें मुख तुका ह्मणे ॥५॥

॥ ६५ ॥ लक्ष्मीवल्लभा ॥ दिनानाथा पद्मनाभा ॥ १ ॥ सुख वसे तुझे पायीं ॥ मज ठेवीं तेचि ठायीं ॥ २ ॥ माझी अल्प हे वासना ॥ तूं तो उदारांचा राणा ॥ ३ ॥ तुका ह्मणे भोगें ॥ पीडा केली धांव वेगें ॥ ४ ॥

॥ ६६ ॥ माझी विठ्ठल माउली ॥ प्रेम पान्हा पान्हायेली ॥ १ ॥ कुर्वाळुनि लावी स्तनीं ॥ न वंजे दुरी जवळुनि ॥ २ ॥ केली पुरवी आळी ॥ नव्हे निष्ठुर कोवळी ॥ ३ ॥ तुका ह्मणे घांस ॥ मुखीं घाली ब्रह्मरस ॥ ४ ॥

॥ ६७ ॥ विठ्ठल गीतीं विठ्ठल चित्तीं ॥ विठ्ठल विश्रांति भोग जया ॥ १ ॥ विठ्ठल आसनीं विठ्ठल शयनीं ॥ विठ्ठल भोजनीं ग्रासोग्रासीं ॥ २ ॥ विठ्ठल जागृति स्वप्न सुषुप्ती ॥ आन दुजें नेणती विठ्ठलेंविण ॥ ३ ॥ भूषण अळंकार सुखाचे प्रकार ॥ विठ्ठल निर्धार जयां नरा ॥ ४ ॥ तुका ह्मणे तेही विठ्ठलचि झाले ॥ संकल्प मुराले दुजेपणें ॥ ५ ॥

॥ ६८ ॥ नमो विष्णु विश्वरूपा मायबापा ॥ अपारा अमुपा पांडुरंगा ॥ १ ॥ विनवितों रंक दास मी सेवक ॥ वचन तें एक आयकावें ॥ २ ॥ तुझी स्तुति वेद करितां भागला ॥ निवांतचि ठेला नेती नेती ॥ ३ ॥ ऋषि मुनी बहु सिद्ध कवीजन ॥ वर्णितां ते गुण न सरती ॥ ४ ॥ तुका ह्मणे तेथें काय माझी वाणी ॥ जे तुझी वाखाणी कीर्ति देवा ॥ ५ ॥

॥ ६९ ॥ अंतरींचा भाव जाणोनियां गुज ॥ तैसें केलें काज पांडुरंगा ॥ १ ॥ घातलें वचन न पडेचि खालीं ॥ तूं आह्मां माउली अनाथांची ॥ २ ॥ मज याचकाची पुरवावी आशा ॥ पंढरीनिवासा मायबापा ॥ ३ ॥ नाशिली आशंका माझिया जीवाची ॥ उरली भेदाची होती कांहीं ॥ ४ ॥ तुका ह्मणे आतां केला मी निर्भर ॥ गाईन अपार गुण तुझे ॥ ५ ॥.

॥ ७० ॥ उदार कृपाळ अनाथांचा नाथ ॥ ऐकसी मात शरणागतां ॥ १ ॥ सर्वभार माथां चालविसी त्यांचा ॥ अनुसरलीं वाचाकायामनें ॥ २ ॥ पाचारितां उभा राहासी जवळी ॥ पाहिजे ते काळीं पुरवावें ॥ ३ ॥ चालतां-ही-पंथ सांभाळिसी वाटे ॥ वारिसील कांटे खडे हातें ॥ ४ ॥ तुका ह्मणे चिंता नाहीं तुझ्या दासां ॥ तूं त्यांचा कोंवसा सर्व भावें ॥ ५ ॥

॥ ७१ ॥ काय कीर्ति करूं लोक दंभमान ॥ दाखवीं चरण तुझे मज ॥ १ ॥ मज आतां ऐसें नको करूं देवा ॥ तुझा दास जावां वायांविण ॥ २ ॥ होइल थोरपण जाणिवेचा भार ॥ दुरावेन दूर तुझ्या पायीं ॥ अंतरींचा भाव काय कळे लोकां ॥ एक मानी एकां देखोदेखीं ॥ ४ ॥ तुका ह्मणे तुझे पाय आतुडती ॥ ते मज विपत्ति गोड देवा ॥ ५ ॥

॥ ७२ ॥ मानावया जग व्हावी द्रव्य माया ॥ नाहीं हे माझिया जीवा चाड ॥ १ ॥ तुझ्या पायांसाठीं केली आराणूक ॥ आतां कांहीं एक नको दुजें ॥ २ ॥ करुनियां कृपा करीं अंगीकार ॥ न लावीं उशीर आतां देवा ॥ ३ ॥ नव्हे साच कांहीं कळों आलें मना ॥ म्हणोनि वासना आवरिली ॥ ४ ॥ तुका म्हणे आतां मनोरथ सिद्धी ॥ माझे कृपानिधी पाववावे ॥ ५ ॥

॥ ७३ ॥ आतां सर्वभावें हा माझा निर्धार ॥ नकरीं विचार आणिकांसी ॥ १ ॥ सर्वभावें नाम गाईन आवडी ॥ सर्व माझी जोडी पाय तुझे ॥ २ ॥ लोटांगण तुझ्या घालीन आंगणीं ॥

पाहीन भरोनी डोळे मुख ॥३॥ निर्लज्ज होऊनि नाचेन रंगणीं ॥ येऊं नेदि मनीं शंका कांहीं ॥ ४ ॥ अंकित अंकीला दास तुझा देवा ॥ संकल्प हा जीवा तुका ह्मणे ॥ ५ ॥

॥ ७४ ॥ बहु उतावीळ भक्तीचिया काजा ॥ होसी केशीराजा मायबापा ॥ १ ॥ तुझ्या पायीं मज झालासे विश्वास ॥ ह्मणोनिया आस मोकलिली ॥ २ ॥ ऋषि मुनि सिद्ध साधक अपार ॥ कळला विचार त्यांसी तुझा ॥ ३ ॥ नाहीं नासतें सुख दिलें तयांस ॥ झाले जे उदास सर्व भावें ॥ ४ ॥ तुका ह्मणे सुख नमाये मानसीं ॥ धरिले जीवेंसी पाय तुझे ॥ ५ ॥

॥ ७५ ॥ माया मोहजाळीं होतों सांपडला ॥ परि या विठ्ठला कृपा आली ॥ १ ॥ काढूनि बाहेरि ठेविलों निराळा ॥ कवतुक डोळां दाखविलें ॥ २ ॥ नाचेंउडें माया करी कवतुक ॥ नाशवंत सुखें साच केलीं ॥ ३ ॥ रडे फुंदे दुःखें कुटितील माथा ॥ एकासी रडतां तेंही मरे ॥ ४ ॥ तुका ह्मणे मज वाटतें नवल ॥ मी माझें ह बोल ऐकोनियां ॥ ५ ॥

॥ ७६ ॥ देहभाव आह्मी राहिलों ठेवूनि ॥ निवांत चरणीं विठोबाच्या ॥ १ ॥ आमुच्या हिताचा जाणोनि उपाव ॥ तोचि पुढें देव करीतसे ॥ २ ॥ म्हणउनी नाहीं सुखदुःख मनीं ॥ ऐकिलिया कानीं वचनाचें ॥ ३ ॥ झालों मी निःसंग निवांत एकला ॥ भार त्या विठ्ठला घालूनियां ॥ ४ ॥ तुका म्हणे झालों जयाचा अंकित ॥ तोचि माझें हित सर्व जाणे ॥ ५ ॥

॥ ७७ ॥ बुद्धीचा जनिता लक्ष्मीचा पति ॥ आठवितां

चित्तीं काय नव्हे ॥ १ ॥ आणिकां उपायां कोण वांटी मन ॥ सुखाचें निधान पांडुरंग ॥ २ ॥ गीत गावों नाचों छंदें वावों टाळी ॥ वैष्णवांचे मेळीं सुखरूप ॥ ३ ॥ अनंत ब्रम्हांडें एके रोमावळी ॥ आम्ही केला भोळीं भावें उभा ॥ ४ ॥ लटिका हा केला संसार सिंधु ॥ मोक्षा खरा बंधु नाहीं पुढें ॥ ५ ॥ तुका म्हणे ज्याच्या नामाचे अंकित ॥ राहिलों निश्चित त्याच्या बळें ॥ ६ ॥

॥ ७८ ॥ भावबळें कैसा झालासी लाहान ॥ मागें संतीं ध्यान वर्णियेलें ॥ १ ॥ तें मज उचित करूनियां देवा ॥ दाखवीं केशवा मायबापा ॥ २ ॥ पाहोनियां डोळां बोलेन मी गोष्टी ॥ आलिंगूनि मिठी देईन पायीं ॥ ३ ॥ चरणीं दृष्टि उभा राहेन समोर ॥ जोडोनियां कर पुढें दोन्ही ॥ ४ ॥ तुका ह्मणे उत्कंठित वासना ॥ पुरवीं नारायणा आर्त माझें ॥ ५ ॥

॥ ७९ ॥ कृपाळु ह्मणोनि बोलती पुराणें ॥ निर्धार वचनें यांची मज ॥ १ ॥ आणीक उपाय नेणेंचि मी कांहीं ॥ तुझें वर्म ठायीं पडे तैसें ॥ २ ॥ नये घड कांहीं बोलतां वचन ॥ रिघालों शरण सर्वभावें ॥ ३ ॥ कृपा करिसी तरि थोडें तुज काम ॥ माझा तरी श्रम बहु हरे ॥ तुका ह्मणे मज दाखवीं श्रीमुख ॥ हरेल या भूक डोळियांची ॥ ५ ॥

॥ ८० ॥ सर्वभावें आलों तुजचि शरण ॥ काया वाचा मनें सहित देवा ॥ १ ॥ आणीक दुसरें नये माझ्या मना ॥ राहिली वासना तुझ्या पायीं ॥ २ ॥ माझियेवरिचें कांहीं जड-

भारी ॥ तुजविण वारी कोण देवा ॥ ३ ॥ तुझे आह्मी दास आमुचा तूं ऋणी ॥ चाळत दुरुनी आलों मागें ॥ ४ ॥ तुका ह्मणे आतां घेतलें धरणें ॥ हिशोबाकारणें भेटी देई ॥ ५ ॥

॥ ८१ ॥ हरि हरि तुह्मीं ह्मणारे सकळ ॥ तेणें मायाजाळ तुटईल ॥ १ ॥ आणिका नका कांहीं गाबाळाचे भरी ॥ पडों येथें थोरी नागवण ॥ २ ॥ भावें तुळसीदळ पाणी जोडा हात ॥ ह्मणवा पतित वेळोवेळां ॥ ३ ॥ तुका ह्मणे हा तंव कृपेचा सागर ॥ नामासाठीं पार पाववील ॥ ४ ॥

॥ ८२ ॥ आणीक कोणाचा न करीं मी संग ॥ जेणें होय भंग माझ्या चित्ता ॥ १ ॥ विठ्ठलावांचूनि आणीक जे वाणी ॥ नाइकें मी कानीं आपुलिया ॥ २ ॥ समाधानासाठीं बोलावी हे मात ॥ परि माझें चित्त नाहीं कोठें ॥ ३ ॥ जिवाहूनि मज तेचि आवडती ॥ आवडे ज्या चित्तीं पांडुरंग ॥ ४ ॥ तुका ह्मणे माझें तोचि जाणे हित ॥ आणिकांच्या चित्त नेदीं बोला ॥ ५ ॥

॥ ८३ ॥ गासी तरि एक विठ्ठलचि गाई ॥ नाहीं तरि ठायीं राहें उगा ॥ १ ॥ अद्वैतीं तों नाहीं बोलाचें कारण ॥ जाणीविचा सीण करिसी वायां ॥ २ ॥ तुका म्हणे किती करावी फजिती ॥ लाज नाहीं चित्तीं निलाजिरा ॥ ३ ॥

॥ ८४ ॥ जयाचिये वाचे नये हा विठ्ठल ॥ त्याचे मज बोल नावडती ॥ १ ॥ शत्रु तो म्यां केला न ह्मणें आपुला ॥ जो विन्मुख विठ्ठला सर्व भावें ॥ २ ॥ जयासी नावडे विठोबाचें नाम ॥ तो जाणा अधम तुका ह्मणे ॥ ३ ॥

॥ ८५ ॥ आणीक कांहीं मज नावडे मात ॥ एका पंढरि-नाथा वांचूनियां ॥ १ ॥ त्याचीच कथा आवडे कीर्तन ॥ तें मज श्रवण गोड लागे ॥ २ ॥ तुका ह्मणे संत ह्मणोत भलतें ॥ विठ्ठलापरतें न मनीं कांहीं ॥ ३ ॥

॥ ८६ ॥ तुज म्हणतील कृपेचा सागर ॥ तरि कां केला धीर पांडुरंगा ॥ १ ॥ अझुनि कां नये तुज माझी दया ॥ काय देवराया पाहातोसि ॥ २ ॥ आळवितों जैसें पाडस कुरंगिणी ॥ पिडिलिया वनीं तान भूक ॥ ३ ॥ प्रेमरस पान्हा पाजीं माझे आई ॥ धांवें वो विठाई वोरसोनि ॥ ४ ॥ तुका ह्मणे माझें कोण हरी दुःख ॥ तुजविण एक पांडुरंगा ॥ ५ ॥

॥ ८७ ॥ पवित्र तो देह वाणी पुण्यवंत ॥ जो वदे अच्युत सर्व काळ ॥ १ ॥ तयाच्या चिंतनें तरतील दोषी ॥ जळतील रासी पातकाच्या ॥ २ ॥ देव इच्छी रज चरणींची माती ॥ धांवत चालती मागें मागें ॥ ३ ॥ काय त्यां उरलें वेगळें आणीक ॥ वैकुंठनायक जया कंठीं ॥ ४ ॥ तुका ह्मणे देव भक्तांचा संगम ॥ तेथें ओघ नाम त्रिवेणीचा ॥ ५ ॥

॥ ८८ ॥ पतितपावना ॥ दिनानाथा नारायणा ॥ १ ॥ तुझें रूप माझे मनीं ॥ राहो नाम जपो वाणी ॥ २ ॥ ब्रम्हांड-नायका ॥ भक्तजनाच्या पाळका ॥ ३ ॥ जीवाचिया जीवा ॥ तुका ह्मणे देवदेवा ॥ ४ ॥

॥ ८९ ॥ सरळीं हीं नामें उच्चारावीं सदां ॥ हरिवा गोविंदा रामकृष्णा ॥१॥ पुण्य पर्वकाळ तीर्थेंही सकळ ॥ कथा

सिंधुजळ न्हाऊं येती ॥ २ ॥ अवघेचि लाभ बैसलिया घरा ॥ येती भाव धरा एकेठायीं ॥ ३ ॥ शेळ्या मेंढ्या गाई सेवा घेती म्हैसी ॥ कामधेनु तैसी नव्हे एक ॥ ४ ॥ तुका म्हणे सुखें पाविजे अनंता ॥ हें वर्म जाणतां सुलभचि ॥ ५ ॥

॥ ९० ॥ करीं हेचि काम ॥ नाम जपें राम राम ॥ १ ॥ लागो हाचि छंद ॥ मना गोविंद गोविंद ॥ २ ॥ तुका म्हणे मना ॥ मज भीक द्यावी दीना ॥ ३ ॥

॥ ९१ ॥ विठ्ठल हा चित्तीं ॥ गोड लागे गातां गीतीं ॥१॥ आम्हां विठ्ठल जीवन ॥ टाळ चिपळिया धन ॥ २ ॥ विठ्ठल हे वाणी ॥ अमृत हे संजिवनी ॥ ३ ॥ रंगला या रंगें ॥ तुका विठ्ठल सर्वांगें ॥ ४ ॥

॥ ९२ ॥ विठ्ठल विठ्ठल मंत्र सोपा ॥ करी पापा निर्मूळ ॥ १ ॥ भाग्यवंता छंद मनीं ॥ कोडें कानीं ऐकती ॥ २ ॥ विठ्ठल हें दैवत भोळें ॥ चाड काळें न धरावी ॥ ३ ॥ तुका म्हणे भलते याती ॥ विठ्ठल चित्तीं ते शुद्ध ॥ ४ ॥

॥ ९३ ॥ कोठें गुंतलासी द्वारकेच्या राया ॥ वेळ कां सखया लावियेला ॥ १ ॥ दीननाथ ब्रीद सांभाळीं आपुलें ॥ नको पाहों केलें पापपुण्य ॥ २ ॥ पतितपावन ब्रीदें चराचर ॥ पातकी अपार उद्धरिले ॥ ३ ॥ तुकयाबंधु म्हणे द्रौपदीचा धांवा ॥ केला तैसा मला पावें आतां ॥ ४ ॥

॥ ९४ ॥ पंडित तोचि एक भला ॥ नित्य भजे जो विठ्ठला अवघें सम ब्रह्म पाहे ॥ सर्वांभूतीं विठ्ठल आहे ॥ २ ॥ रिता

नाहीं कोणी ठाव ॥ सर्वाभूतीं वासुदेव ॥ ३ ॥ तुका म्हणे तोंची दास ॥ त्या देखीलया जाती दोष ॥ ४ ॥

॥ ९५ ॥ विठ्ठल टाळ विठ्ठल दिंडी ॥ विठ्ठल तोंडीं उच्चारा ॥ १ ॥ विठ्ठल अवघ्या भांडवला ॥ विठ्ठल बोला विठ्ठल ॥ २ ॥ विठ्ठल नाद विठ्ठल भेद ॥ विठ्ठल छंद विठ्ठल ॥ ३ ॥ विठ्ठल सुखा विठ्ठल दुःखा ॥ तुकया मुखा विठ्ठल ॥ ४ ॥

॥ ९६ ॥ काय तुझें वेचे मज भेटी देतां ॥ वचन बोलतां एक दोन ॥ १ ॥ काय तुझें रूप घेतों मी चोरोनि ॥ त्याभेणें लपोनि राहिलासी ॥ २ ॥ काय तुझें आम्हा करावें वैकुंठ ॥ भेउं नको भेट आतां मज ॥ ३ ॥ तुका म्हणे तुझी नलगे दसोडी ॥ परी आहे आवडी दर्शनाची ॥ ४ ॥

॥ ९७ ॥ मारगीं चालतां पाउला पाउलीं ॥ चिंतावी माउली पांडुरंग ॥ १ ॥ सर्व सुख लागे घेऊनियां पाठी ॥ आवडीचा कंठीं रस ओती ॥ २ ॥ पीतांबरें छाया करी लोभापर ॥ पाहे तें उत्तर आवडीचें ॥ ३ ॥ तुका म्हणे हेंची करावें जीवन ॥ वाचे नारायण तान भूक ॥ ४ ॥

॥ ९८ ॥ पवित्र होईन चरित्र उच्चारें ॥ रूपाच्या आधारें गोजिरिया ॥ १ ॥ आपुरती बुद्धि पुण्य नाहीं गांठीं ॥ पायीं घाली मिठी पाहें डोळां ॥ २ ॥ गाईन ओवी शिष्टांच्या आधारें ॥ सारीन विचारें आयुष्या या ॥ ३ ॥ तुका म्हणे तुझें नाम नारायणा ॥ ठेवीन मी मना आपुलीया ॥ ४ ॥

॥ ९९ ॥ मथुरेच्या राया माझें दंडवत पायां ॥ १ ॥

तुमचे कृपेचें पोषणें ॥ माझा समाचार घेणें ॥ २ ॥ नाम धरिलें कंठीं ॥ असें आर्तभूत पोटीं ॥ ३ ॥ जीवींचें तें जाणा ॥ तुका म्हणे नारायणा ॥ ४ ॥

॥१००॥ वाट पाहें हरि कां नये अझुनि ॥ निष्ठुर कां मनीं धरियेलें ॥१॥ काय करूं धीर होत नाहीं जीवा ॥ काय आड ठेवा उभा ठेला ॥ २ ॥ नाहीं माझा धांवा पडियेला कानीं ॥ कोठें चक्रपाणी गुंतलेती ॥ ३ ॥ नाहीं आलें कळों अंतरा अंतर ॥ कृपावंत फार आईकतो ॥ ४ ॥ बहुतां दिसांचें राहिलें भातुकें ॥ नाहीं कवतुकें कुरवाळिलें ॥ ५ ॥ तुका ह्मणे देईं एकवेळा भेटी ॥ शीतळ हें पोटीं होईल मग ॥ ६ ॥

॥ १०१ ॥ नाहीं दिलें कधीं कठिण उत्तर ॥ तरी कां अंतर पडियेलें ॥ १ ॥ ह्मणऊनि आतां वियोग न साहे ॥ लांचावलें देह संघष्टणें ॥ २ ॥ वेळोवेळां वाचे आठवितों नाम ॥ अधिकचि प्रेम चढे घेतां ॥ ३ ॥ तुका म्हणे पांडुरंगे जननीये ॥ वेउनि कडिये बुझविलें ॥ ४ ॥

॥ १०२ ॥ तरीं आम्ही तुझी धरियेली कास ॥ नाहीं कोणी दास वांयां गेला ॥ १ ॥ आगा पंढरीशा उभ्या विटेवरी ॥ येईं लवकरी धांवें नेटें ॥ २ ॥ पालवितों तुज उभी करोनि बाहे ॥ कृपावंता पाहें मजकडे ॥ ३ ॥ तुका म्हणे तुज बहु कान डोळे ॥ कां हे माझे वेळे ऐसी परी ॥ ४ ॥

॥ १०३ ॥ धरूनि पालव असुडीन करें ॥ मग काय बरें दिसे लोकीं ॥ १ ॥ काय तें विचारा ठायींचें आपणां ॥ जो हा

नारायणा अवकाश ॥ २ ॥ अंतर पायांसी तोंवरी या गोष्टी ॥ पडिलिया मिठी हालों नेदीं ॥ ३ ॥ रुसलेती तरी होईल बुझावणी ॥ तांतडी करूनि साधावें हें ॥ ४ ॥ सांपडलिया आधीं कारणासी ठाव ॥ येथें करूं भाव दृढ आतां ॥ ५ ॥ तुका म्हणे तुझे ठाऊके बोभाट ॥ मग खटपट चुकली ते ॥ ६ ॥

॥ १०४ ॥ मागता भिकारी जालों तुझे द्वारीं ॥ देई मज हरी कृपादान ॥ १ ॥ प्रेम प्रीति नाम उचित करावें ॥ भावें संचरावें हृदयामाजी ॥ २ ॥ सर्व भावें शरण आलों पांडुरंगा ॥ कृपाळु तूं जगामाजी एक ॥ ३ ॥ तापत्रयें माझी तापविली काया ॥ शीतळ व्हावया पाय तुझे ॥ ४ ॥ संबंधीं जनवाद पीडलों परोपरी ॥ अंतरलों दुरी तुजसी तेणें ॥ ५ ॥ तुका म्हणे आतां तुझा शरणागत ॥ करावें सनाथ मायबापा॥६॥

॥ १०५ ॥ घेईन मी जन्म याजसाठीं देवा ॥ तुझी चरण-सेवा साधावया ॥ १ ॥ हरिनाम कीर्तन संतांचें पूजन ॥ घालूं लोटांगण महाद्वारीं ॥ २ ॥ आनंदें निर्भर असों भलते ठायीं ॥ सुख दुःखें नाहीं चाड आम्हां ॥ ३ ॥ आणीक सायास न करीं न धरीं आस ॥ होइन उदास सर्व भावें ॥ ४ ॥ मोक्ष आम्ह घरीं कामारीतें दासी ॥ होय सांगों तैसी तुका म्हणे ॥ ५ ॥

॥१०६॥ डोळियां पाझर कंठ माझा दाटे ॥ येऊं देई भेटे पांडुरंगे ॥१॥ बहु दिस टाकिलें निरास कां केलें ॥ कोठें वो गुंतलें चित्त तुझें ॥ २ ॥ बहुधंदा तुज नाहीं वो आठव ॥ राहिलासे जीव माझा कंठीं ॥ ३ ॥ पंढरीस जाती वारकरी संतां ॥ निरोप

बहुतां हातीं धाडीं ॥४॥ तुजविण कोण सांवा धांवा करी ॥ ये वो झडकरी पांडुरंगे ॥ ५ ॥ काय तुझी वाट पाहों कोठवरी ॥ कृपाळु कांपरी विसरलासी ॥ ६ ॥ एक वेळ माझा धरूनि आठव ॥ तुका ह्मणे ये वो न्यावयासी ॥ ७ ॥

॥१०७॥ जाऊं देवाची या गांवां ॥ देव देईल विसांवा ॥ १ ॥ देवा सांगों सुख दुःख ॥ देव निवारील भूक ॥ २॥ घालूं देवासीच भार ॥ देव सुखाचा सागर ॥ ३ ॥ राहों जवळी देवापाशीं ॥ आतां जडोनि पायांसी ॥ ४ ॥ तुका ह्मणे आह्मी बाळें ॥ या देवाचीं लडिवाळें ॥ ५ ॥

॥१०८॥ देवा आतां ऐसा करीं उपकार ॥ देहाचा विसर पाडीं मज ॥ १ ॥ तरींच हा जीव सुख पावे माझा ॥ बरें केशीराजा कळों आलें ॥ २ ॥ ठाव देईं चित्ता राखें पायां पाशीं ॥ सकळ वृत्तींसी अखंडीत ॥३॥आस भय चिंता लाज काम क्रोध ॥ तोडावा संबंध यांचा माझा ॥ ४ ॥ मागणें तें एक हेंचि आहे आतां ॥ नाम मुखीं संत संग देई ॥ ५ ॥ तुका ह्मणे नको वर पंग देवा ॥ घेईं माझी सेवा भावशुद्ध ॥ ६ ॥

॥१०९॥ येईं वो येईं वो येईं धांवोनियां ॥ विलंब कां वायां लाविला कृपाळे ॥ १ ॥ विठाबाई विश्वंभरे भव च्छेदके ॥ कोठें गुंतलीस अगे विश्वव्यापके ॥ २ ॥ नकरीं नकरीं नकरीं आतां आळस अव्हेरू ॥ व्हावया प्रकट कैंचें दूरी अंतरू ॥ ३ ॥ नेघें नेघें नेघें माझी वाचा विसांवा ॥ तुका म्हणे हांवा हांवा हांवा साधावा ॥ ४ ॥

॥११०॥ येणें मुखें तुझे वर्णी गुण नाम ॥ तेंचि मज प्रेम देईं देवा ॥१॥ डोळे भरूनियां पाहें तुझें मुख ॥ तेंचि मज सुख देईं देवा ॥२॥ कान भरोनियां ऐकें तुझी कीर्ती ॥ ते मज विश्रांती देईं देवा ॥ ३ ॥ वाहें रंगीं टाळी नाचेन उदास ॥ हें देईं हातांस पायां बळ ॥ ४ ॥ तुका म्हणे माझा सकळ देह भाव ॥ आणीक नको ठाव चिंतू यासी ॥ ५ ॥

॥१११॥ सांवळें रूपडें चोरटें चित्ताचें ॥ उभें पंढरीचे विटेवरी ॥ १ ॥ डोळीयांची धणी पाहातां नपुरे ॥ तयालागीं झुरे मन माझें ॥ २ ॥ आन गोड कांहीं नलगे संसारीं ॥ राहिले अतरीं पाय तुझे ॥ ३ ॥ प्राण रिघों पाहे कुडी हे सांडुनी ॥ श्रीमुख नयनीं न देखतां ॥४॥ चित्त मोहियेलें नंदाच्या नंदानें ॥ तुका ह्मणे येणें गरुडध्वजें ॥ ५ ॥

॥११२॥ तेरा दिवस झाले निश्चक्र करितां ॥ नपवसी अनंता माय बापा ॥ १ ॥ पाषाणांची खोळ घेउनि बैसलासी ॥ काय हृषीकेशी झालें तुज ॥ २ ॥ तुज वरी आतां प्राण मी त्यजीन ॥ हत्या मी घालीन पांडुरंगा ॥ ३ ॥ फार विठाबाई धरीली तुझी आस ॥ करीन जीता नास पांडुरंगा ॥ ४ ॥ तुका म्हणें आतां पाडीलें निर्वाण ॥ प्राण हा सांडीना चंद्रभागे ॥ ५ ॥

॥११३॥ लोक फार वाखा अमंगळ झाला ॥ त्याचा त्याग केला पांडुरंगा ॥ १ ॥ विषयां वंचलों मीपणा मुकलों ॥ शरण तुज आलों पांडुरंगा ॥२॥ घर दार अवघीं त्यजिलीं नारायणा ॥

जीवींच्या जीवना पांडुरंगा ॥ ३ ॥ तुका म्हणे पडिलों पुंडलिका पाशीं ॥ धांव हृषीकेशी आलिंगी मज ॥ ४ ॥

॥ ११४ ॥ धरूनियां सोई परतलें मन ॥ अनुलक्षीं चरण करूनियां ॥ १ ॥ येईं पांडुरंगे नेईं सांभाळूनि ॥ करुणा वचनीं आळवितों ॥ २ ॥ बुद्धि झाली साह्य परि नाहीं बळ ॥ अवलोकितों जळ वाहे नेत्रीं ॥ ३ ॥ न चलती पाय गळित झाली काया ॥ म्हणऊनि दया येऊं द्यावी ॥ ४ ॥ दिशेच्या करीतों वारियासी मात ॥ जोडुनियां हात वाट पाहें ॥ ५ ॥ तुका म्हणे वेग करावा सत्वर ॥ पाववया तीर भवनदीचें ॥ ६ ॥

॥ ११५ ॥ एकांताचें सुख देईं मज देवा ॥ आघात या जीवा चुकवुनि ॥ १ ॥ ध्यानीं रूप वाचे नाम निरंतर ॥ आपुला विसर पडों नेदीं ॥ २ ॥ मायबाळा भेटी सुखाची आवडी ॥ तैशी मज गोडी देईं देवा ॥ ३ ॥ कीर्ती ऐकोनियां झालों शरणांगत ॥ दासाचें तुं हित करीतोसी ॥ ४ ॥ तुका म्हणे मी तों दीन पापराशी ॥ घालावें पाठीशी मायबापा ॥ ५ ॥

॥ ११६ ॥ नाम घेतां उठाउठीं ॥ होय संसारासी तुटी ॥ १ ॥ ऐसा लाभ बांधा गांठी ॥ विठ्ठल पायीं पडे मिठी ॥ २ ॥ नामापरतें साधन नाहीं ॥ जें तूं करिशी आणिक कांहीं ॥ ३ ॥ हाक मारोनि सांगे तुका ॥ नाम घेतां राहों नका ॥ ४ ॥

॥ ११७ ॥ अवघींच तीर्थें घडलीं एकवेळा ॥ चंद्रभागा डोळां देखिलिया ॥ १ ॥ अवघींच पापें गेलीं दिगांतरीं ॥

वैकुंठी पंढरी देखिलिया ॥ २॥ अवघिया संतां एकवेळा भेटी॥ पुंडलीक दृष्टी देखिलिया ॥ ३ ॥ तुका ह्मणे जन्मा आल्याचें सार्थक ॥ विठ्ठलचि एक देखिलिया ॥ ४ ॥

॥ ११८ ॥ नाम उच्चारितां कंठीं ॥ पुढें उभा जगजेठी ॥ १ ॥ ऐसें धरोनियां ध्यान ॥ मनें करावें चिंतन ॥ २ ॥ ब्रह्मादिकांच्या ध्याना नये ॥ तो हा कीर्तनाचे सोये ॥ ३ ॥ तुका ह्मणे सार घ्यावें ॥ मनें हरिरूप पाहावें ॥ ४ ॥

॥ ११९ ॥ भेटी लागीं जीवा लागलीसे आस ॥ पाहें रात्रीं दिवस वाट तुझी ॥ १ ॥ पूर्णिमेचा चंद्र चकोरा जीवन ॥ तैसें माझें मन वाट पाहे ॥ २ ॥ दिवाळीच्या मुळा लेंक आसावली ॥ पाहतसे वाटुली पंढरीची ॥ ३ ॥ भुकेलिया बाळा अति शोक करीं ॥ वाटपाहे परी माउलीची ॥ ४ ॥ तुका ह्मणे मज लागलीसे भूक ॥ धांवूनि श्रीमुख दावीं देवा ॥ ५ ॥

॥ १२० ॥ अगा करुणाकरा करीतसें धांवा ॥ या मज सोडवा लवकरी ॥ १ ॥ ऐकोनियां माझीं करुणेचीं वचनें ॥ व्हावें नारायणें उतावीळ ॥ २ ॥ मागें पुढें अवघा दिसे रिता ठाव ॥ ठेवूनि पायीं भाव वाट पाहें ॥ ३ ॥ उशीर तो आतां न पाहिजे केला ॥ अहो जी विठ्ठला मायबापा ॥ ४ ॥ उरलें तें एक हेंचि मज आतां ॥ अवघें विचारितां शून्य झालें ॥ ५ ॥ तुका ह्मणे आतां करीं कृपादान ॥ पाउलें समान दावीं डोळां ॥६॥

॥ १२१ ॥ कासया गा मज घातलें संसारीं ॥ चित्त पायांवरी नाहीं तुझ्यां ॥ १ ॥ कासया गा मज घातलें या जन्मा

॥ नाहीं तुझा प्रेमा नित्य नवा ॥ २ ॥ नामाविण माझी वाचा अभंगळ ॥ ऐसा कां चांडाळ निर्मियेला ॥ ३ ॥ तुका ह्मणे माझी जळो जळो काया ॥ विठ्ठला सखया वांचुनिया ॥ ४ ॥

॥ १२२ ॥ देह जावो अथवा राहो ॥ पांडुरंगीं माझा भावो ॥ १ ॥ चरण नसोडीं सर्वथा ॥ आण तुझी पंढरिनाथा ॥ २ ॥ वदनीं तुझें मंगळ नाम ॥ हृदयीं अखंडित प्रेम ॥ ३ ॥ नामा ह्मणे केशव-राजा ॥ केला पण चालवीं माझा ॥ ४ ॥

॥ १२३ ॥ किती देवा तुह्मां येऊं काकूळती ॥ काय या संचितीं लिहिलें माझ्या ॥ १ ॥ कांहो माझी सांड केली हृषीकेशी ॥ आह्मी कोणापाशीं तोंड वासों ॥ २ ॥ ब्रिदाचा तोडर गर्जे त्रि-भूवनीं ॥ तूंचि एक धणी त्रैलोक्याचा ॥ ३ ॥ समूळ घेतला पृथिवीचा भार ॥ माझाचि जौंजार काय तूला ॥ ४ ॥ नको पाहूं अंत पांडुरंगे आई ॥ नामा हरीपायीं घाली मिठी ॥ ५ ॥

॥ १२४ ॥ गाऊं नेणें कळा कुसरी ॥ कान धरोनि ह्मणे हरी ॥ १ ॥ माझ्या बोबडिया बोला ॥ चित्त द्यावें गा विठ्ठला ॥ २ ॥ मज हंसतील लोक ॥ परि मी गाईन निःशंक ॥ ३ ॥ तुझे नामीं मी निर्लज्ज ॥ काय जना सवें काज ॥ ४ ॥ तुका ह्मणे माझी विनंती ॥ तुह्मी परिसा कमळापती ॥ ५ ॥

॥ १२५ ॥ तुजलागीं माझा जीव झाला पिसा ॥ अवलोकितों दिशा पांडरंगा ॥ १ ॥ सांडिला व्यवहार माया लोकाचार ॥ छंद निरंतर हाचि मनीं ॥ २ ॥ आइकिलें कानीं तें

रूप लोचन ॥ देखावया सीण करिताती ॥ ३ ॥ प्राण हा विकळ होय कासावीस ॥ जीवनाविण मत्स्य तयापरी ॥ ४ ॥ तुका ह्मणे आतां कोण तो उपाय ॥ करूं तुझे पाय आतुडे तो ॥ ५ ॥

॥ १२६ ॥ कोणे गांवीं आहे सांगा हा विठ्ठल ॥ जरी ठावा असेल तुह्मां कोणा ॥ १ ॥ लागतसें पायां येतों लोटांगणीं ॥ मात तरी कोणी सांगा याची ॥ २ ॥ गुणरूप याचे वाणिती या संतां ॥ मज क्षेम देतां सुख वाटे ॥ ३ ॥ सर्वस्वें हा जीव ठेवीन चरणीं ॥ पांडुरंग कोणी दावी तया ॥ ४ ॥ तुका ह्मणे गाईवत्सा तडातोडी ॥ तैसी जाते घडी एकी मज ॥ ५ ॥

॥ १२७ ॥ न कळे तें कळों येईल उगलें ॥ नामें या विठ्ठलें एकाचिया ॥ १ ॥ न दिसे तें दिसों येईल उगलें ॥ नामें या विठ्ठलें एकाचिया ॥ २ ॥ न बोलों तें बोलों येईल उगलें ॥ नामें या विठ्ठलें एकाचिया ॥ ३ ॥ न भेटे तें भेटों येईल आपण ॥ करितां चिंतन विठोबाचें ॥ ४ ॥ अलभ्य तो लाभ होईल अपार ॥ नाम निरंतर ह्मणतां वाचे ॥ ५ ॥ तुका ह्मणे आसक्त जीव सर्व भावें ॥ तरतील नांवें विठोबाच्या ॥ ६ ॥

॥ १२८ ॥ माझी सर्व चिंता आहे विठोबासी ॥ मी त्याच्या पायांसी न विसंवें ॥ १ ॥ विसरेना रूप क्षण एक चित्तीं ॥ जिवलग मूर्ती सांवळी ते ॥ २ ॥ विसरतां हरी क्षण एक घडी ॥ अंतरली जोडी लक्ष लाभ ॥ ३ ॥ तुका ह्मणे माझ्या विठोबाचे पायें ॥ संजीवनी आहे हृदयामाजी ॥ ४ ॥

॥ १२९ ॥ मागें बहुतां जनां राखिलें आडणी ॥ धांवसी

निर्वाणी नाम घेतां ॥ १ ॥ ऐसें ठावें झालें मज बरव्या परी ॥ ह्मणऊनि करी धांवा तुझा ॥ २ ॥ माझे विशीं तुज पडिला विसरू ॥ आतां काय करूं पांडुरंगा ॥ ३ ॥ अझुनि कां नये तुह्मासी करुणा ॥ दुरि नारायणा धरिलें मज ॥ ४ ॥ तुका ह्मणे जीव जाऊं पाहे माझा ॥ आतां केशीराजा घालीं उडी ॥ ५ ॥

॥ १३० ॥ जे गाती अखंड विठ्ठलाचें गीत ॥ त्यांचे पायीं चित्त ठेवीन मी ॥ १ ॥ जयासी आवडे विठ्ठलाचें नाम ॥ ते माझे परम प्राणसखे ॥ २ ॥ जयांसी विठ्ठल आवडे लोचनीं ॥ त्यांचे पायवणी स्वीकारीन ॥ ३ ॥ विठ्ठलासी जिहीं दिला सर्व भाव ॥ त्यांच्या पायीं ठाव मागईन ॥ ४ ॥ तुका ह्मणे रज होईन चरणींचा ॥ ह्मणविती त्यांचा हरिचे दास ॥ ५ ॥

॥ १३१ ॥ विठ्ठला रे तुझे वर्णितां गुणवाद ॥ विठ्ठला रे दग्ध जालीं पापें ॥ १ ॥ विठ्ठला रे तुझें पाहातां श्रीमुख ॥ विठ्ठला रे सुख जालें नयना ॥ २ ॥ विठ्ठला रे तुज देतां आलिंगन ॥ विठ्ठला तनमन निवाल्या बाह्या ॥ ३ ॥ विठ्ठला रे तुझी ऐकतां कीर्ति ॥ विठ्ठल हे विश्रांति पावले स्मरणें ॥ ४ ॥ विठ्ठला रे तुकयाबंधु ह्मणे देहभाव ॥ विठ्ठला जीवीं पाव धरितां गेला ॥ ५ ॥

॥ १३२ ॥ नको मज ताठा नको अभिमान ॥ तुजवांचूनि क्षीण होतो जीव ॥ १ ॥ दुर्धर हे माया न होय सुटका ॥ वैकुंठनायका सोडवीं मज ॥ २ ॥ तुका ह्मणे तुझें झालिया दर्शन ॥ मग निवारण होइल सर्व ॥ ३ ॥

॥ १३३ ॥ चाल घरा उभा राहें नारायणा ॥ ठेवूं दे चरणावरि माथा ॥ १ ॥ वेळो वेळां देईं क्षेम आलिंगन ॥ वरी अवलोकन कृपा दृष्टी ॥ २ ॥ प्रक्षाळूं दे पाय बैसें माजवरीं ॥ चित्तस्थिर करीं पांडुरंगा ॥ ३ ॥ आहे त्या संचितें करवीन भोजन ॥ काय न जेवून करिसी आतां ॥ ४ ॥ करुणाकरें नाहीं कळों दिलें वर्म ॥ दुरी होतां भ्रम कोण वारी ॥ ५ ॥ तुका ह्मणे आतां आवडीच्या सत्ता ॥ बोलिलों अनंता करवीन तें ॥ ६ ॥

॥ १३४ ॥ कधीं कृपा करिसी नेणें ॥ मज दीनाचें धांवणें ॥ १ ॥ भेटीलागीं पंढरीनाथा ॥ जीवीं लागली तळमळ व्यथा ॥ २ ॥ सिणलें माझें मन ॥ वाट पाहतां लोचन ॥ ३ ॥ तुका ह्मणे लागली भूक ॥ तुझें पहावया श्रीमुख ॥ ४ ॥

॥ १३५ ॥ आत्मस्थिति मज नको हा विचार ॥ देईं निरंतर चरणसेवा ॥ १ ॥ जन्मोजन्मीं तुझा दास पुरुषोत्तमा ॥ हेचि गोडी माझ्या देईं जीवा ॥ २ ॥ काय सायुज्यता मुक्ति हेचि गोड ॥ देवभक्त कोड तेथें नाहीं ॥ ३ ॥ कायतें निर्गुण पाहें कैशा परी ॥ वर्णूं तुझी हरी कीर्ती कैसी ॥ ४ ॥ गोड चरण सेवा देव भक्त पणें ॥ मज देवा ह्मणें दुराविसी ॥ ५ ॥ जाणिवे पासूनि सोडवीं माझ्या जीवा ॥ देईं चरणसेवा निरंतर ॥ ६ ॥ तुका ह्मणे गोडागोड नलगे प्रीति ॥ सेवेविण चित्तीं सार नाहीं ॥ ७ ॥

॥ १३६ ॥ ऐकें पांडुरंगा वचन माझें एक ॥ झालों मी सेवक

दास तुझा ॥ १ ॥ कळे तैसा आतां करावा उद्धार ॥ खुंटल ॥ विचार माझा पुढें ॥ २ ॥ दंभमान माझा करूं पाहे घात हे झालियाही थीत कारणाचा ॥ ३ ॥ हीन बुद्धि माझी अधमयाती ॥ अहंकार चित्तीं वसों पाहे ॥ ४ ॥ तुका ह्मणे मज बिघडतां क्षण ॥ नलगे जतन करीं देवा ॥ ५ ॥

॥ १३७ ॥ जेणें माझें चित्त राहे तुझ्या पायीं ॥ अखंड तें देईं प्रेमसुख ॥ १ ॥ देहभाव राख दीन करूनियां ॥ ब्रह्माचारी वायां जाय तैसा ॥ २ ॥ द्रव्य दारा नको मानाची आवडी ॥ कवणेविशीं गोडी प्रपंचाची ॥ ३ ॥ तुझें नाम माझें धरूनियां चित्त ॥ एकांत लोकांत सदा राहो ॥ ४ ॥ तुका ह्मणे तुझे जडोनियां पायीं ॥ झालों उतराई पांडुरंगा ॥ ५ ॥

॥ १३८ ॥ हेंचि माझें तप हेंचि माझें दान ॥ हेंचि अनुष्ठान नाम तुझें ॥ १ ॥ हेंचि माझें तीर्थ हेंचि माझें व्रत ॥ सत्य हें सुकृत नाम तुझें ॥ २ ॥ हाचि माझा धर्म हेंचि माझें कर्म ॥ हाचि नित्यनेम नाम तुझें ॥ ३ ॥ हाचि माझा योग हाचि माझा यज्ञ ॥ हेंचि जपध्यान नाम तुझें ॥ ४ ॥ हेंचि माझें ज्ञान श्रवण मनन ॥ हेंचि निजध्यासन नाम तुझें ॥ ५ ॥ हा माझा आचार हा माझा विचार ॥ हा माझा निर्धार नाम तुझें ॥ ६ ॥ तुका ह्मणे दुजें सांगायासि नाहीं ॥ नामेंविण कांहीं धनवित ॥७॥

॥ १३९ ॥ जळो ते जाणीव जळो ते शाहाणीव ॥ राहो माझा भाव विठ्ठलपायीं ॥ १ ॥ जळो तो आचार जळो तो विचार ॥ राहो मन स्थीर विठ्ठल पायीं ॥ २ ॥ जळो हा लौकिक

जळो दंभमान ॥ लागो जीवा ध्यान विठ्ठलाचें ॥ ३ ॥ जळो हें शरीर जळो हा संबंध ॥ राहो परमानंद माझ्या कंठीं ॥ ४ ॥ तुका ह्मणे येथें अवघेंचि होय ॥ धरीं मना सोय विठोबाची ॥ ५ ॥

॥ १४० ॥ विश्वास धरूनि राहिलों निवांत ॥ ठेवूनियां चित्त तुझे पायीं ॥ १ ॥ तरावें बुडावें तुझिया वचनें ॥ निर्धार हा मनें केला माझ्या ॥ २ ॥ नकळे हें मज साच चालविलें ॥ देसी तें उगलें घेइन देवा ॥ ३ ॥ मागणें तें सरे ऐसें करीं देवा ॥ नाहीं तरीं सेवा सांगा पुढें ॥ ४ ॥ करावें कांहीं कीं पाहावें उगलें ॥ तुका ह्मणे बोलें पांडुरंगा ॥ ५ ॥

॥ १४१ ॥ तुझिया दासांचा हीन झालों दास ॥ नधरीं उदास मायबापा ॥ १ ॥ तुजविण प्राण कैसा राहों पाहे ॥ वियोग न साहे क्षणभरी ॥ २ ॥ आणिक माझ्या जीवें मोकलिली आस ॥ पाहे तुझी वास पांडुरंगा ॥ ३ ॥ सर्व भावें तुज आणिला उचित ॥ राहिलों निश्चित तुझे पायीं ॥ ४ ॥ तुका ह्मणे तुज असो माझा भार ॥ बोलतों मी फार काय जाणें ॥ ५ ॥

॥ १४२ ॥ तुज पाहातां समोरी ॥ दृष्टि न फिरे माघारी ॥ १ ॥ माझें चित्त तुझ्या पायां ॥ मिठी पडली पंढरिराया ॥ २ ॥ नव्हे सारितां निराळें ॥ लवण मेळवितां जळें ॥ ३ ॥ तुका ह्मणे बळी ॥ जीव दिला पायांतळीं ॥ ४ ॥

॥ १४३ ॥ सर्वकाळ डोळां बैसो नारायण ॥ नयो अभिमान आडमध्यें ॥ १ ॥ धाड पडो माझ्या थोरपणावरी ॥ वाचे नरहरी उच्चारीना ॥ २ ॥ जळो अंतरीचें सर्व जाणपण ॥ विवाद

५वन अहंतेचें ॥ ३ ॥ सकळां चरणीं गळित माझा जीव ॥ तुका ह्मणे भाव एकविध ॥ ४ ॥

॥१४४॥ झाडा वरपोनि खाऊनियां पाला ॥ आठवी विठ्ठला वेळोवेळां ॥ १ ॥ वल्कलें नेसुनि चिंधीया वेढूनी ॥ सांडी जवळुनी देहभान ॥ २ ॥ लोकमान वमनासमान मानणें ॥ एकांतीं राहाणें विठोसाठीं ॥ ३ ॥ सहसा करूं नये प्रपंचीं सौजन्य ॥ सेवावें अरण्य एकांतवास ॥ ४ ॥ ऐसा हा निर्धार करी जो मनाचा ॥ तुका ह्मणे त्याचा पांग फिटे ॥ ५ ॥

॥ १४५ ॥ अभयदान मज देई गा उदारा ॥ कृपेच्या सागरा पांडुरंगा ॥ १ ॥ देहभाव तुझ्या ठेवियेला पायीं ॥ आणीक मी कांहीं नेणें दुजें ॥ २ ॥ सेवा भक्ति भाव नेणें मी पतित ॥ आतां माझें हित तुझ्या पायीं ॥ ३ ॥ अवघा निरोपिला तुज देहभाव ॥ आतां मज पाव पांडुरंगा ॥ ४ ॥ तुका ह्मणे तुझें नाम दीनानाथ ॥ तें मज उचित करीं आतां ॥ ५ ॥

॥ १४६ ॥ ऐसें कोणी करी लागो तुझी सोय ॥ माझे विठाबाई जननिये ॥ १ ॥ पतितपावन ह्मणविसी जरी ॥ आवरण करीं तरी माझें ॥ २ ॥ नाहीं तरी ब्रीद टाकीं सोडुनियां ॥ नधरिसी माया जरी माझी ॥ ३ ॥ बोलिला तो बोल करावा साचार ॥ तरी लोक बरें ह्मणतील ॥ ४ ॥ करावा संसार लोकलाजे भेणें ॥ वचनासी उणें येऊं नेदीं ॥ ५ ॥ तुह्मां आह्मां तैसें नाहीं ह्मणे तुका ॥ होशील तूं सखा जिवलग ॥ ६ ॥

॥ १४७ ॥ तूं आह्मां सोयरा सज्जन सांगाती ॥ तुजलागीं प्रीति चालो सदा ॥ १ ॥ तूं माझा जिव्हाळा जीवाचा जीवलग होसी अंतरंग अंतरींचा ॥ २ ॥ गण गोत मित्र तूं माझें जीवन ॥ अनन्य शरण तुझ्या पायीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे सर्व गुणें तुझा दास ॥ आवडे अभ्यास सदा तुझा ॥ ४ ॥

॥ १४८ ॥ आवडेल तैसें तुज आळवीन ॥ वाटे समाधान जीवा तैसें ॥ १ ॥ नाहीं येथें कांहीं लौकिकाची चाड ॥ तुजवीण गोड देवराया ॥ २ ॥ पुरवीं मनोरथ अंतरींचे आर्त ॥ धाय वरी गीत गाईं तुझें ॥ ३ ॥ तुका ह्मणे लेंकी आळवी माहेरा॥ गाऊं या संसारा तुज तैसें ॥ ४ ॥

॥ १४९ ॥ यालागीं आवडी ह्मणा राम कृष्ण ॥ जोडा नारायण सर्व काळ ॥ १ ॥ सोपें हें साधन लाभ येतो घरा ॥ वाचेसी उच्चारा राम हरि ॥ २ ॥ नलगती कष्ट नलगे सायास॥ करावा अभ्यास विठ्ठलाचा ॥ ३ ॥ नलगे तप तीर्थ करणें महादान ॥ केल्या एक मन जोडे हरि ॥ ४ ॥ तुका ह्मणे कांहीं न वेचितां धन ॥ जोडे नारायण नामासाठीं ॥ ५ ॥

॥ १५० ॥ जायाचें शरीर जाईल क्षणांत ॥ कां हा गोपीनाथ पावेचिना ॥ १ ॥ तुह्मी संत सारे कृपेचे सागर ॥ माझा निरोप फार सांगा देवा ॥ २ ॥ अनाथ अज्ञान कोणी नाहीं त्याला ॥ पायांपें विठ्ठला ठेवीं मज ॥ ३ ॥ तुका ह्मणे ऐसी करा निरवण ॥ मग तो रक्षण करील माझें ॥ ४ ॥

॥ १५१ ॥ त्रासलाहा जीव संसारींच्या सुखा ॥ तुजवीण

सुखा नाहीं कोणी ॥ १ ॥ ऐसें माझे मनीं वाटे नारायणा ॥ घालावी चरणावरी मिठी ॥ २ ॥ कइं तें सुंदर देखोनि रूपडें ॥ आवडीच्या कोडें आळंगीन ॥ ३ ॥ नाहीं पूर्व पुण्य मज पामरासी ॥ ह्मणोनी पायांसी अंतरलों ॥ ४ ॥ अलभ्य लाभ कैंचा संचिता वेगळा ॥ विनवी गोपाळा दास तुका ॥ ५ ॥

॥ १९२ ॥ हाचि माझा नेम धरिला हो धंदा ॥ यावरि गोविंदा भेटी द्यावी ॥ १ ॥ हाचि माझा ध्यास सदा सर्वकाळ ॥ न्यावयासी मूळ येसी कधीं ॥ २ ॥ डोळियांची भूक पाहातां श्रीमुख ॥ आलिंगनें सुख निवती भुजा ॥ ३ ॥ बहु चित्त ओढे तयाचिंयि सोई ॥ पुरला हा कांहीं नवस नेणें ॥ ४ ॥ बहुबहु काळ झालों कासावीस ॥ वाहिलें बहुवस कलेवर ॥५॥ तुका ह्मणे आतां पाडावें हें ओझें ॥ पांडुरंगा माझें इयावरि ॥६॥

॥ १९३ ॥ जन्म मृत्यु फार झाले माझ्या जीवा ॥ ऐक माझा धांवा पांडुरंगा ॥ १ ॥ सिणलों बहुत करितां येरझारा ॥ रखुमाईच्या वरा पावें वेगीं ॥ २ ॥ तुका ह्मणे तूं गा पतित-पावन ॥ घेई माझा सीण जन्मांतर ॥ ३ ॥

॥ १९४ ॥ आतां माझ्या दुःखा कोण हो सांगाती ॥ रखुमाइचा पति पावेचिना ॥ १ ॥ काय विधात्यानें घातलीसे रेखा ॥ सुटका या दुःखा न होयचि ॥ २ ॥ तुका ह्मणे माझी विसरू नको चिंता ॥ अगा पंढरिनाथा पाव वेगीं ॥ ३ ॥

॥ १९५ ॥ पंढरीसी जावें ऐसें माझे मनीं ॥ विठाई जननी भेटे केव्हां ॥ १ ॥ नलगे तयाविण सुखाचा सोहळा ॥ लागे

मज ज्वाळा अग्निचिया ॥ २ ॥ तुका ह्मणे त्याचे पाहिलीया पाय ॥ मग दुःख जाय सर्व माझें ॥ ३ ॥

॥ १५६ ॥ तन मन धन दिलें पंढरिराया ॥ आतां सांगावया उरलें नाहीं ॥ १ ॥ अर्थचाड चिंता नाहीं मनीं आशा ॥ तोडियेला फांसा उपाधीचा ॥ २ ॥ तुका ह्मणे एक विठोबाचें नाम ॥ आहे जवळी दाम नाहीं रुका ॥ ३ ॥

॥ १५७ ॥ आलिया संसारा ऊठा वेग करा ॥ शरण जा उदारा पांडुरंगा ॥ १ ॥ देह हें देवाचें धन कुबेराचें ॥ तेथें मनुष्याचें काय आहे ॥ २ ॥ देता देवविता नेता नेवविता ॥ येथें याची सत्ता काय आहे ॥ ३ ॥ निमित्याचा धनी केला असे प्राणी ॥ माझें माझें ह्मणोनि व्यर्थ गेला ॥ ४ ॥ तुका ह्मणे कां रे नाशिवंतासाठीं ॥ देवासवें आटी पाडितोसी ॥ ५ ॥

॥ १५८ ॥ वेढा वेढा रे पंढरी ॥ मोर्चे लावा भीमातिरीं ॥ १ ॥ चला चला संतजन ॥ करा देवासी भांडण ॥ २ ॥ लुटालुटा पंढरपुर ॥ धरा रखुमाईचा वर ॥ ३ ॥ तुका ह्मणे चला ॥ घाव निशाणी घातला ॥ ४ ॥

॥ १५९ ॥ आवडे हें रूप गोजिरें सगुण ॥ पाहातां लोचन सुखावले ॥ १ ॥ आतां दृष्टीपुढें ऐसाचि तूं राहें ॥ जो मी तुज पाहें पांडुरंगा ॥ २ ॥ लांचावलें मन लागलीसे गोडी ॥ ते जीवें न सोडीं ऐसें झालें ॥ ३ ॥ तुका ह्मणे आह्मीं केली जे लडिवाळी ॥ पुरवावी आळी मायबापें ॥ ४ ॥

॥ १६० ॥ गरुडावरी बैसोनि येतो जगजेठी ॥ त्याचे

चरणीं मिठी घालूं चला ॥ १ ॥ सांवळें रूपडें देखिलें लोचनीं ॥ शंख चक्र दोन्ही शोभताहे ॥ २ ॥ पीतांबर झळके हेचि त्याची खूण ॥ वांकी रुणझुण करिताती ॥ ३ ॥ गरुडाचा चपेटा येत असे नेटें ॥ कस्तुरी मळवट शोभताहे ॥ ४ ॥ पदक एकावळी शोभताहे कंठीं ॥ तुका ह्मणे मिठी घालूं चला ॥ ५ ॥

॥ १६१ ॥ सांग पांडुरंगा मज हा उपाव ॥ जेणें तुझे पाव आतुडती ॥ १ ॥ न कळे हा निर्धार ब्रह्मादिकां पार ॥ कायसा विचार माझा तेथें ॥ २ ॥ तुका ह्मणे आतां धरुनियां धीर ॥ राहूं कोठवर मायबापा ॥ ३ ॥

॥ १६२ ॥ नरनारी बाळें अवघा नारायण ॥ ऐसें माझें मन करीं देवा ॥ १ ॥ योग काम क्रोध द्वेष निंदा द्वंद्व ॥ अवघा गोविंद निःसंदेह ॥ २ ॥ असावें म्यां सदां विषयीं विरक्त ॥ काया वाचा चित्त तुझे पायीं ॥ ३ ॥ करोनियां साह्य पुरवीं मनोरथ ॥ व्हावें कृपावंत तुका ह्मणे ॥ ४ ॥

॥ १६३ ॥ भावभक्तिवादें करावें कीर्तन ॥ आशाबद्ध मन करूं नये ॥ १ ॥ अन्न पाणी धन द्रव्य नारायण ॥ विठ्ठला वांचून बोलूं नये ॥ २ ॥ सप्रेम करावें देवाचें कीर्तन ॥ भय द्या सोडून शरीराचें ॥ ३ ॥ तरी मग जोडे विठ्ठल निधान ॥ केलिया कीर्तन सिद्धि पावे ॥ ४ ॥ देव जोडिलिया तया काय ऊणें ॥ तुका- ह्मणे मन धीट करा ॥ ५ ॥

॥ १६४ ॥ सर्वोपरी तुझे गुण गा उत्तम ॥ तुझे ठायीं प्रेम

राहो माझें ॥ १ ॥ माउलीपरीस आहेसी उदार ॥ तरी कां निष्ठुर मन केलें ॥ २ ॥ गजेंद्राकारणें केलें त्वां धावणें ॥ तरी कां निर्वाण पाहातोसी ॥ ३ ॥ प्रल्हादा संकटीं रक्षिलें त्वां देवा ॥ तरी कां केशवा सांडी केली ॥ ४ ॥ अन्यायी अजामेळ तो झाला पावन ॥ ऐसें हें पुराण हाका मारी ॥ ५ ॥ तुका ह्मणे माझे थोर अपराध ॥ नाम करी छेद क्षणमात्रें ॥ ६ ॥

॥ १६५ ॥ आतां वांढों नेदीं आपुलें हें मन ॥ नसोडीं चरण विठोबाचे ॥ १ ॥ दुजियाचा संग लागों नेदीं वारा ॥ आपुल्या शरीरावरूनियां ॥ २ ॥ यावें जावें आह्मीं देवाच सांगातें ॥ मागूनी करीत हेंचि आलों ॥ ३ ॥ काय वांयां गेलों तो करूं उद्वेग ॥ उभा पांडुरंग मागें पुढें ॥ ४ ॥ तुका ह्मणे प्रेम मागतों आगळें ॥ येथें भोगूं फळें वैकुंठींचीं ॥ ५ ॥

॥ १६६ ॥ आतां आह्मां हेंचि काम ॥ वाचे स्मरों रामराम ॥ १ ॥ ऐसी मोलाची हे घडी ॥ धरूं पायांची आवडी ॥२॥ अमृताची खाणी ॥ तथे ठायीं वेचूं वाणी ॥ ३ ॥ तुका ह्मणे पांडुरंगा ॥ माझ्या जीवींच्या जिवलगा ॥ ४ ॥

॥ १६७ ॥ आतां जावें पंढरीसी ॥ दंडवत विठोबासी ॥१॥ जेथें चंद्रभागातीरीं ॥ आह्मी नाचों पंढरपुरीं ॥ २ ॥ जेथें संतांची दाटणी ॥ त्यांचें घेऊं पायवणी ॥ ३ ॥ तुका ह्मणे आह्मी बळी ॥ जीव दिधला पायांतळीं ॥ ४ ॥

॥ १६८ ॥ रंगीं रंगें नारायणा ॥ उभा करितों कीर्तना ॥१॥

हातीं घेऊनियां विणा ॥ कंठीं राहें नारायणा ॥ २ ॥ देखिलीसे मूर्ती ॥ माझ्या हृदयाची विश्रांति ॥ ३ ॥ तुका ह्मणे देवा ॥ देई कीर्तनाचा हेवा ॥ ४ ॥

॥ १६९ ॥ तुझा भरवसा आह्मां ॥ फार होता पुरुषोत्तमा ॥ १ ॥ भवसागर संकटीं ॥ तारिशील जगजेठी ॥ २ ॥ नाम आदित्याचें झाड ॥ त्याचा नपडे उजेड ॥ ३ ॥ सिलंगणीचें सोनें ॥ त्यासी गाहाण ठेवी कोण ॥ ४ ॥ तुका ह्मणे देवा ॥ ब्रीद सोडूनियां ठेवा ॥ ५ ॥

॥ १७० ॥ विठोबाचे पायीं जीव म्यां ठेविला ॥ भक्तिभावें केला देव ऋणी ॥ १ ॥ देव माझा ऋणी आहे सहाकारी ॥ परस्परें वारी भवभय ॥ २ ॥ भवभय डोहीं बुडो नेदी पाहीं ॥ धरूनियां बाही तारी मज ॥ ३ ॥ तारियेले दास पडिल्या संकटीं ॥ विष केलें पोटीं अमृतमय ॥ ४ ॥ अमृतातें सेवीतसें नामरसा ॥ तोडियेला फांसा बंधनाचा ॥ ५ ॥ बंधनाचा फांसा आह्मीं कांहीं नेणों ॥ पाय तुझे जाणों पद्मनाभा ॥६॥ पद्मनाभा नाभिकमळीं ब्रह्मादिक ॥ त्रैलोक्यनायक ह्मणविसी ॥७॥ ह्मणविसी देवा दासांचा अंकित ॥ मनाचा संकेत पाहोनियां ॥८॥ पाहोनियां दृढ निश्चय तयाचा ॥ तोचि दास साचा जवळीक ॥ ९ ॥ जवळीक झाली ब्रह्मीं सुखावले ॥ मार्ग दाखविले मूढां जनां ॥ १० ॥ मूढ जनामाजी दास तुझा मूढ ॥ कास तुझी दृढ धरियेली ॥ ११ ॥ धरियेले तुझे पाय रे विठ्ठला ॥ तुका सुखी झाला तुझ्या नामें ॥ १२ ॥

॥ १७१ ॥ बहु क्लेशी झालों या हो नरदेहीं ॥ कृपा दृष्टी पाहीं पांडुरंगा ॥ १ ॥ पांडुरंगा सर्व देवांचिया देवा ॥ ध्यावी माझी सेवा दीनानाथा ॥ २ ॥ दीनानाथ ब्रिद त्रिभुवनीं तुझें ॥ मायबापा ओझें उतरावें ॥ ३ ॥ उतरीं सत्वर पैलथडी नेई ॥ पूर्णसुख देई पायांपाशीं ॥ ४ ॥ पायांपाशीं मज ठेवीं निरंतर ॥ आशा तुझी फार दिवस केली ॥ ५ ॥ केली आस तुझी वाट मी पाहातों ॥ निशीदिनीं ध्यातों नाम तुझें ॥ ६ ॥ नाम तुझें गोड स्वभक्तां आवडे ॥ भक्तांलागीं कडे घेसी खांदां ॥ ७ ॥ घेसी खांद्यावरी खेळविसी लोभें ॥ पाऊल तें शोभे विटेवरी ॥ ८ ॥ विटेवरी उभा देखिलासी डोळां ॥ मनाचा सोहळा पुरविसी ॥ ९ ॥ पुरवीं सत्वर त्रैलोक्यस्वामिया ॥ मिठी घाली पायां तुका भावें ॥ १० ॥

॥ १७२ ॥ मौन कां धरिलें विश्वाच्या जीवना ॥ उत्तर वचना देईं माझ्या ॥ १ ॥ तूं माझें संचित तूंचि पूर्वपुण्य ॥ तूं माझें प्राचीन पांडुरंगा ॥ २ ॥ तूं माझें सत्कर्म तूं माझा स्वधर्म ॥ तूंचि नित्यनेम नारायणा ॥ ३ ॥ कृपावचनाची वाट पाहातसें ॥ करुणा वोरसें बोल कांहीं ॥ ४ ॥ तुका ह्मणे प्रेमळाच्या प्रियोत्तमा ॥ बोल सर्वोत्तमा मजसवें ॥ ५ ॥

॥ १७३ ॥ संतजना माझी यावया करुणा ॥ ह्मणउनी दीन हीन झालों ॥ १ ॥ नेणें योग युक्ती नाहीं ज्ञान मती ॥ गातसें या गीतीं पांडुरंगा ॥ २ ॥ भाव भक्ती नेणें तप अनुष्ठान ॥ करितों कीर्तन विठ्ठलाचें ॥ ३ ॥ ब्रह्मज्ञान ध्यान न

कळे धारणा ॥ एका नारायणा वांचूनियां ॥ ४ ॥ तुका ह्मणे माझा विठोबासी भार ॥ जाणे हा विचार तोचि माझा ॥ ५ ॥

॥ १७४ ॥ ऐसें काय उणें झालें तुज देवा ॥ भावें वीण सेवा घेसी माझी ॥ १ ॥ काय मज द्यावा नलगे मुशारा ॥ पाहावें दातारा विचारूनि ॥ २ ॥ करितों पाखांडें जोडूनि अक्षरें ॥ नव्हे ज्ञान खरें भक्तिरस ॥ ३ ॥ गुण वाद तुझे न बोलवे वाणी ॥ आणिका छळणी वाद सांगें ॥ ४ ॥ तरी आतां मज राखें तुझे पायीं ॥ देखसील कांहीं प्रेमरस ॥ ५ ॥ तुका ह्मणे तुज हांसतील लोक ॥ निष्काम सेवक ह्मणोनिया ॥ ६ ॥

॥ १७५ ॥ जनाचिया मना जावें कासियेसी ॥ माझी वाराणसी पाडुरंग ॥ १ ॥ तेथें भागीरथी येथें भीमरथी ॥ अधिक ह्मणती चंद्रभागा ॥ २ ॥ तेथें माधवराव येथें यादव-राव ॥ जाणोनियां भाव पुंडलीकाचा ॥ ३ ॥ विष्णु पद गया तेचि येथें आहे ॥ प्रत्यक्ष हें पाहें विटेवरी ॥ ४ ॥ तुका ह्मणे हेचि प्रपंच उद्धरी ॥ आतां पंढरपुरीं घडो बापा ॥ ५ ॥

॥ १७६ ॥ स्वामी तूंही कैसा न पडसी डोळां ॥ सुंदर सांवळा घवघवीत ॥ १ ॥ चतुर्भुज माळा रुळे एकावळी ॥ कस्तुरी निढळीं रेखिलीसे ॥ २ ॥ शंख चक्र गदा रुळे वैज-यंती ॥ कुंडलें तळपती श्रवणीं दोन्ही ॥ ३ ॥ तुका ह्मणे स्वामी आतां दावीं पाय ॥ पांडुरंग माये कृपावंते ॥ ४ ॥

॥ १७७ ॥ आणीक कोणापुढें वासूं मुख सांग ॥ माझें अंतरंग कोण जाणे ॥ १ ॥ पाहें तुजकडे येऊनी जाऊनी ॥

पांडुरंगा मनीं विचारावें ॥ २ ॥ भय चिंता अवघे उद्योग सांडिले ॥ आठवुनी पाउलें असें तुझीं ॥ ३ ॥ नका विसरूं मज वैकुंठनायका ॥ विनवीतसे तुका वंदीजन ॥ ४ ॥

॥ १७८ ॥ सांवळें सुंदर पाहे दृष्टीभरी ॥ ऐसें कांहीं करीं मन मांझें ॥ १ ॥ मना तुज ठाव *दिला त्याचे पायीं* ॥ राहें विठाबाईसवें सदा ॥ २ ॥ मना नको धरूं आणिकांचा संग ॥ नाहीं पांडुरंग जयां मनीं ॥ ३ ॥ वरपंग भाव नको ह्मणे तुका ॥ करीं प्राणसखा नारायण ॥ ४ ॥

॥ १७९ ॥ उदार कृपाळ पतितपावना ॥ ब्रीदें नारायणा जाती वांयां ॥ १ ॥ वर्णिलासि श्रुति नेणें तुझा पार ॥ राहे मौनाकार नेति ऐसें ॥ २ ॥ तेथें माझा धांवा पावे कोणीकडे ॥ अदृष्ट हें पुढें वोढवलें ॥ ३ ॥ कोण ऐसा भक्त लाधला भाग्यासी ॥ आठवण ऐसी द्यावी तुज ॥ ४ ॥ तुका ह्मणे नको पाहों माझा अंत ॥ जाणोनि हे मात उडी घालीं ॥ ५ ॥

॥ १८० ॥ पंढरी पावन झालें माझें मन ॥ आतां करूं ध्यान विठोबाचें ॥ १ ॥ आतां ऐसें करूं नाम गाऊं गीतीं ॥ सुखाचा सांगाती विठो करूं ॥ २ ॥ संग करूं त्याचा तो सखा आमचा ॥ अनंतां जन्मांचा मायबाप ॥ ३ ॥ परतोनि सोई धरीं कारे मना ॥ विठ्ठल चरणा घालीं मिठी ॥ ४ ॥ घातलीसे मिठी नाहीं भक्तिभाव ॥ उदार पंढरिराव तुका ह्मणे ॥ ५ ॥

॥ १८१ ॥ पहावा नयनीं विठ्ठलचि एक ॥ कांहीं तरी

२९५५

सार्थक संसाराचें ॥ १ ॥ कोठें पाहों तुज कांगा लपालासी ॥ कांहीं बोल मशीं नारायणा ॥ २ ॥ वाटतें उदास मज दाहि-दिशा ॥ तुजविण हृषिकेशा वांचोनियां ॥ ३ ॥ नको ठेवूं मज आपणा वेगळें ॥ बहुत कळवळें तुजलागीं ॥ ४ ॥ तुका ह्मणे भेटी देईं नारायणा ॥ घडी कंठवेना तुजविण ॥ ५ ॥

॥ १८२ ॥ पूर्वीं बहुतांचे केले प्रतिपाळ ॥ तें मज सकळ श्रुत आहे ॥ १ ॥ अज अविनाश निर्गुण निरामय ॥ विचा-रिलें काय त्यांचे वेळे ॥ २ ॥ तयांचिये वेळे होशी कृपावंत ॥ माझाचि कां अंत पाहतोसी ॥ ३ ॥ नारद प्रल्हाद उपमन्यु धुरू ॥ त्यांचा अंगिकारु कैसा केला ॥ ४ ॥ अंबऋषीसाठीं गर्भवास झाले ॥ कांगा मोकलिलें कृपासिंधु ॥ ५ ॥ धर्माचें उच्छिष्ट अर्जुनाचीं घोडीं ॥ आणिक सांकडीं किती एक ॥ ६ ॥ झालासी लुगडीं तया द्रौपदीचीं ॥ नयेकां आमुची कृपा कांहीं ॥ ७ ॥ तुका ह्मणे कांगा झालासी कठीण ॥ माझा भाग सीण कोण जाणे ॥ ८ ॥

॥ १८३ ॥ कोण तो उपाव करूं भेटावया ॥ जाळावी हे काया ऐसें वाटे ॥ १ ॥ सोडोनियां गांव जाऊं वनांतरा ॥ रुकुमादेवीवरा पाहावया ॥ २ ॥ करूं उपवास शोषूं हें शरीर ॥ न धरवे धीर नारायणा ॥ ३ ॥ जाती आयुष्याचे दिवस हे चारी ॥ मग केव्हां हरी भेटशील ॥ ४ ॥ तुका ह्मणे कांहीं सांगा विचारोनी ॥ विठो तुझे मनीं असेल तें ॥ ५ ॥

॥ १८४ ॥ तुझें रूप पाहतां देवा ॥ सुख झालें माझ्या

जीवा ॥ १ ॥ हें तों वाचे बोलवेना ॥ काय सांगों नारायणा ॥२॥ जन्मांजन्मींचें सुकृत ॥ तुझे पायीं रमे चित्त ॥ ३ ॥ जरी योगाचा अभ्यास ॥ तेव्हां तुझा निजध्यास ॥ ४ ॥ तुका ह्मणे भक्त ॥ गोड गाऊं हरिचें गीत ॥ ५ ॥

॥ १८५ ॥ नको विद्या वय आयुष्य फारसें ॥ नाहीं मज पिसें मुक्तीचेंही ॥ १ ॥ रामकृष्ण ह्मणतां जावो माझा प्राण ॥ हेंचि कृपादान मागतसें ॥ २ ॥ नको धन मान न वाढो संतान ॥ मुखीं नारायण प्राण जावा ॥ ३ ॥ तुका ह्मणे दीन काकुलती येतों ॥ तुम्हां आळवितों पांडुरंगा ॥ ४ ॥

॥ १८६ ॥ तुझे पाय माझें भाळ ॥ एकत्रता सर्वकाळ ॥१॥ हेंचि देई विठाबाई ॥ पांडुरंगे माझे आई ॥ २ ॥ नाहीं मोक्ष मुक्ती चाड ॥ तुझी सेवा लागे गोड ॥ ३ ॥ सदा संग सज्जनांचा ॥ नको वियोग पंढरीचा ॥ ४ ॥ नित्य चंद्रभागे स्नान ॥ करीं क्षेत्र प्रदक्षिण ॥ ५ ॥ पुंडलीक पाहेन दृष्टी ॥ हर्षें नाचों वाळवंटीं ॥ ६ ॥ तुका ह्मणे पांडुरंगा ॥ तुझें रूप चंद्रभागा ॥७॥

॥ १८७ अनाथाचा सखा ऐकिला प्रताप ॥ होसी कृपावंत मजवरी ॥ १ ॥ माझिया गा चित्ता करीं शिकवण ॥ जेणें तुझे चरण जोडतील ॥ २ ॥ जोडोनियां कर येतों काकुलती ॥ रकुमाईच्या पति कृपावंता ॥ ३ ॥ हरुषें निर्भर करीं माझें मन ॥ दाखवीं चरण पांडुरंगा ॥ ४ ॥ तुझे भेटीविण जन्म गेला वांयां ॥ भजन कराया शक्ति नाहीं ॥ ५ ॥ नघडे तुझी सेवा नघडे पूजन ॥ जन्मोनि निष्कारण जाऊं पाहे ॥ ६ ॥

तुका ह्मणे हरि करावें या काय ॥ भजनासी साह्य होई बापा ॥ ७ ॥

॥ १८८ ॥ नेणें गाऊं कांहीं धड बोलतां वचन ॥ कायावाचामनेंसहित आलों शरण ॥ १ ॥ करीं अंगीकार नको मोकलूं हरी ॥ पतित पावन ब्रीदें करावीं खरीं ॥ २ ॥ नेणें भक्तिभाव तुझा ह्मणवितों दास ॥ जरी देसी अंतर तरी लज्जा कोणास ॥ ३ ॥ ह्मणे तुकयाबंधु तुझे धरियेले पाये ॥ आतां कोण दुजा ऐसा आह्मांसी आहे ॥ ४ ॥

॥ १८९ ॥ तूंच मायबाप बंधु सखा आमचा ॥ वित्त गोत जीवलग जीवाचा ॥ १ ॥ आणीक प्रमाण नाहीं दुसरें आतां योगक्षेमभार तुझे घातला माथां ॥ २ ॥ तूंच क्रियाकर्म धर्म देव तूं कूळ ॥ तूंच तप तीर्थ व्रत गुरु सकळ ॥ ३ ॥ ह्मणे तुकयाबंधु करिता कार्यना देवा ॥ तूंच भाव भक्ति पूजा पुनस्कार आघवा ॥ ४ ॥

॥ १९० ॥ गोविंद गोविंद ॥ मना लागलिया छंद ॥ १ ॥ मग गोविंद ते काया ॥ भेद नाहीं देवा तया ॥ २ ॥ आनंदलें मन ॥ प्रेमें पाझरती लोचन ॥ ३ ॥ तुका ह्मणे आळी ॥ जेवी नुरेचि वेगळी ॥ ४ ॥

॥ १९१ ॥ हेंचि दान देगा देवा ॥ तुझा विसर न व्हावा ॥ १ ॥ गुण गाईन आवडी ॥ हेचि माझी सर्व जोडी ॥ २ ॥ नलगे मुक्ति आणि संपदा ॥ संतसंग देई सदां ॥ ३ ॥ तुका ह्मणे गर्भवासीं ॥ सुखें घालावें आह्मासी ॥ ४ ॥

जीवा ॥ १ ॥ हें तों वाचे बोलवेना ॥ काय सांगों नारायणा ॥२॥ जन्मांजन्मींचें सुकृत ॥ तुझे पायीं रमे चित्त ॥ ३ ॥ जरी योगाचा अभ्यास ॥ तेव्हां तुझा निजध्यास ॥ ४ ॥ तुका ह्मणे भक्त ॥ गोड गाऊं हरिचें गीत ॥ ५ ॥

॥ १८५ ॥ नकों विद्या वय आयुष्य फारसें ॥ नाहीं मज पिसें मुक्तीचेंही ॥ १ ॥ रामकृष्ण ह्मणतां जावो माझा प्राण ॥ हेंचि कृपादान मागतसें ॥ २ ॥ नको धन मान न वाढो संतान ॥ मुखीं नारायण प्राण जावा ॥ ३ ॥ तुका ह्मणे दीन काकुलती येतों ॥ तुम्हां आळवितों पांडुरंगा ॥ ४ ॥

॥ १८६ ॥ तुझे पाय माझें भाळ ॥ एकत्रता सर्वकाळ ॥१॥ हेंचि देई विठाबाई ॥ पांडुरंगे माझे आई ॥ २ ॥ नाहीं मोक्ष मुक्ती चाड ॥ तुझी सेवा लागे गोड ॥ ३ ॥ सदा संग सज्जनांचा ॥ नको वियोग पंढरीचा ॥ ४ ॥ नित्य चंद्रभागे स्नान ॥ करीं क्षेत्र प्रदक्षिण ॥ ५ ॥ पुंडलीक पाहेन दृष्टी ॥ हर्षें नाचों वाळवंटीं ॥ ६ ॥ तुका ह्मणे पांडुरंगा ॥ तुझें रूप चंद्रभागा ॥७॥

॥ १८७ अनाथाचा सखा ऐकिला प्रताप ॥ होसी कृपावंत मजवरी ॥ १ ॥ माझिया गा चित्ता करीं शिकवण ॥ जेणें तुझे चरण जोडतील ॥ २ ॥ जोडोनियां कर येतों काकुलती ॥ रकुमाईच्या पति कृपावंता ॥ ३ ॥ हरुषें निर्भर करीं माझें मन ॥ दाखवीं चरण पांडुरंगा ॥ ४ ॥ तुझे भेटीविण जन्म गेला वांयां ॥ भजन कराया शक्ति नाहीं ॥ ५ ॥ नघडे तुझी सेवा नघडे पूजन ॥ जन्मोनि निष्कारण जाऊं पाहे ॥ ६ ॥

तुका ह्मणे हरि करावें या काय ॥ भजनासी साह्य होई बापा ॥ ७ ॥

॥ १८८ ॥ नेणें गाऊं कांहीं धड बोलतां वचन ॥ काया-वाचामनेंसहित आलों शरण ॥ १ ॥ करीं अंगीकार नको मोकलूं हरी ॥ पतित पावन ब्रीदें करावीं खरीं ॥ २ ॥ नेणें भक्तिभाव तुझा ह्मणवितों दास ॥ जरी देसी अंतर तरी लज्जा कोणास ॥ ३ ॥ ह्मणे तुकयाबंधु तुझे धरियेले पाये ॥ आतां कोण दुजा ऐसा आह्मांसी आहे ॥ ४ ॥

॥ १८९ ॥ तूंच मायबाप बंधु सखा आमचा ॥ वित्त गोत जीवलग जीवाचा ॥ १ ॥ आणीक प्रमाण नाहीं दुसरें आतां योगक्षेमभार तुझे घातला माथां ॥ २ ॥ तूंच क्रियाकर्म धर्म देव तूं कूळ ॥ तूंच तप तीर्थ व्रत गुरु सकळ ॥ ३ ॥ ह्मणे तुकयाबंधु करिता कार्यना देवा ॥ तूंच भाव भक्ति पूजा पुनस्कार आघवा ॥ ४ ॥

॥ १९० ॥ गोविंद गोविंद ॥ मना लागलिया छंद ॥ १ ॥ मग गोविंद ते काया ॥ भेद नाहीं देवा तया ॥ २ ॥ आनं-दलें मन ॥ प्रेमें पाझरती लोचन ॥ ३ ॥ तुका ह्मणे आळी ॥ जेवी नुरेचि वेगळी ॥ ४ ॥

॥ १९१ ॥ हेंचि दान देगा देवा ॥ तुझा विसर न व्हावा ॥ १ ॥ गुण गाईन आवडी ॥ हेचि माझी सर्व जोडी ॥ २ ॥ नलगे मुक्ति आणि संपदा ॥ संतसंग देई सदां ॥ ३ ॥ तुका ह्मणे गर्भ-वासीं ॥ सुखें घालावें आह्मासी ॥ ४ ॥

॥ १९२ ॥ करोनी आरती ॥ चक्रपाणी ओंवाळीती ॥१॥ आजी पुरले नवस ॥ धन्य काळ हा दिवस ॥ २ ॥ पाहा पाहा वो सकळा ॥ पुण्यवंत तुह्मी बाळा ॥ ३ ॥ तुका वाहे टाळी ॥ उभा सन्निध जवळी ॥ ४ ॥

॥ १९३ ॥ मिळोनीयां संतजन ॥ करूं देवासी भांडण ॥ १ ॥ वेढावेढा पंढरपुर ॥ धरा रखुमाईचा वर ॥ २ ॥ लुटा लुटा हो पंढरी ॥ मोर्चा लावा भीमा तीरीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे हल्लां केला ॥ घाव निशाणी घातला ॥ ४ ॥

॥ १९४ ॥ सकळ देवांचें दैवत ॥ उभा आहे पारंगत ॥ १ ॥ रंग लुटा माझे बापा ॥ शुद्ध भावें खऱ्या मापा ॥ २ ॥ रंग लुटीला बहुतीं ॥ ध्रुव नारदादि संतीं ॥ ३ ॥ तुका लुटी-तसे रंग ॥ साह्य झाला पांडुरंग ॥ ४ ॥

॥ १९५ ॥ देह जावो अथवा राहो ॥ पांडुरंगीं माझा भावो- ॥ १ ॥ चरण न सोडी सर्वथा ॥ आण तुझी पंढरी-नाथा ॥ २ ॥ वदनीं तुझें मंगळ नाम ॥ ह्रदई अखंडीत प्रेम ॥ ३ ॥ नामा ह्मणे केशव राजा ॥ केला पण चालवि माझा ॥ ४ ॥

॥ १९६ ॥ काय करावें साधन ॥ जेणें जोडे नारायण ॥१॥ त्यासी उपाय तो थोडा ॥ गर्जे विठूचा पवाडा ॥२॥ प्राक्त-नाची दोरी ॥ तैसे गुण देतो हरी ॥ ३ ॥ तुकाह्मणे ऐका ॥ भजा पंढरी नायका ॥ ४ ॥

॥१९७॥ नाम गाऊं नाम घेऊं ॥ नाम विठोबाला वाहूं ॥१॥

आह्मी दैवाचे दैवाचे ॥ दास पंढरीरायाचे ॥ २ ॥ टाळ वीणा घेऊं हातीं ॥ विठ्ठल नाम गाऊं गीतीं ॥ ३ ॥ नामा ह्मणे लाखोली सदा ॥ सहस्र नामाचि गोविंदा ॥ ४ ॥

॥ १९८ ॥ चला बाई पांडुरंग पाहूं वाळवंटी ॥ मांडी येला काला भोंवती गोपाळांचि दाटी ॥ १ ॥ लुब्धल्या नर नारी आणि पशुयाती ॥ विसरल्या देह भाव शंका नाहीं चित्तीं ॥ २ ॥ हमामा हुंबरी पावा वाजवी मोहरी ॥ घेतलासे मधीं घालोनियां हरी ॥ ३ ॥ पुष्पांचा वर्षाव झाली आरत्यांची दाटी ॥ तुळशी गुंफोनियां घालीताती कंठीं ॥ ४ ॥ यादवांचा राणा भक्त मानोहर कान्हा ॥ तुका ह्मणे सुख वाटे देखोनियां मना ॥ ५ ॥

॥ १९९ ॥ नमो आदि रूपा ओंकार स्वरूपा ॥ विश्वाचिया रूपा पांडुरंगा ॥ १ ॥ तुझीया सत्तेनें तुझे गुण गाऊं ॥ तेणें सुखी राहूं सर्व काळ ॥ २ ॥ तूंची श्रोता वक्ता ज्ञानासी अंजन ॥ सर्व होणे जाणे तुझे हातीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे जेथें नाहीं मी तूं पण ॥ स्तवावें हे कोण कोणा लागीं ॥ ४ ॥

॥ २०० ॥ मी तव अनाथ अपराधी ॥ कर्महीन मतिमंद बुद्धी ॥ तुज म्या आठविलें नाहीं कधीं ॥ वाचें कृपानिधी मायबापा ॥ १ ॥ नाहीं ऐकीलें गाइलें गीत ॥ धरिली लाज सांडिलें हित ॥ नावडे पुराणा बैसले संत ॥ केली बहुत परनिंदा ॥ २ ॥ केला करविला नाहीं उपकार ॥ नाहीं दया आली पीडितां पर ॥ करूं नये तो केला व्यापार ॥ वाहिला भार कुटुंबाचा ॥ ३ ॥ नाहीं केलें तीर्थाचें भ्रमण ॥ पाळिला

पिंडकर चरण ॥ नाहीं संत सेवा घडलें ज्ञान ॥ पूजा अवलो-
कन मूर्तीचें ॥ ४ ॥ असंग संग घडले अन्याय ॥ बहुत धर्म
उपाय ॥ नकळे हित करावें तें ॥ काय नये बोलूं आठवूं तें
॥ ५ ॥ आप आणिलिया घातकर ॥ शत्रु झालों मी दावेदार ॥
तूं तव कृपेचा सागर ॥ उतरी पार तुका ह्मणे ॥ ६ ॥

॥ २०१ ॥ जैसे तैसे तारी ॥ तुज शरणांगत हरी ॥ १ ॥
आतां न पाहिजे केलें ॥ ब्रींद लटिकें आपुलें ॥ २ ॥ शुद्ध
नाहीं चित्त ॥ परि ह्मणवीतों भक्त ॥ ३ ॥ मज कोण पुसे
रंका ॥ नाम सांगे तूझें तुका ॥ ४ ॥

॥ २०२ ॥ हेंचि देवासी मागत ॥ चरण सेवा अखंडीत
॥ १ ॥ वास द्यावा पंढरीचा ॥ सदा संग हरि दासांचा
॥ २ ॥ नामा ह्मणे कमला पती ॥ हेंचि द्यावें पुढता पुढती ॥ ३ ॥

॥ २०३ ॥ काय माझा आतां पाहतोसी अंत ॥ येई बा
धांवत देव राया ॥ १ ॥ तुजवीण होईल जीवासी आकांत ॥
येई बा धांवत देवराया ॥ २ ॥ असे जरी काम भेटोनीयां
जावें ॥ धांवोनियां यावें देवराया ॥ ३ ॥ यरे यरे देवा नामा
तुज बाहत ॥ येई बा धांवत देवराया ॥ ४ ॥

॥ २०४ ॥ एक प्रहर रात्र झाली ॥ फेरि विठ्ठलाची
आली ॥ १ ॥ नामा ह्मणे जनी पाहे ॥ द्वारीं उभा कोण
आहे ॥ २ ॥ प्रभा घरांत दाटली ॥ एकसराई लूटली ॥ ३ ॥
पदक वैजयंती गळां ॥ उभा विठ्ठल सांवळा ॥ ४ ॥ एकामेकीं
आलिंगन ॥ नामा ह्मणे जनी धन्य ॥ ५ ॥

---

पद—( राग—झिंजोटी. ताल—एका. कुणि दावा नयनीं कंसा. )

॥१॥ हरिसी सतत भजावें मनुजा ॥ हरिसी सतत भजावें रे ॥ध्रु०॥ दुर्लभ हा नरदेहाचि जाणुनि ॥ क्रोधादिक वरजावे रे ॥ निशिदिनिं सुजन पथासि धरुनियां ॥ मुक्तिपदावर जावें रे ॥ हरिसी० ॥ १ ॥ दृश्य सकळ हें व्यर्थचि जाणुनि ॥ सचित्सुख समजावें रे ॥ कोण मी कैंचा कोठुनि आलों ॥ हेंचि मनीं समजावें रे ॥ हरि० ॥ २ ॥ दीनदयाघनचरितचि गाउनी ॥ प्रेमामृतें भिजवावे रें ॥ गुरुवचनीं विश्वास ठेवुनियां ॥ दुर्जनसंग त्यजावे रे० ॥ हरिसी० ॥ ३ ॥

पद—( राग—आडाणा. ताल—दादरा. चाल—हरिचे नाम गारे. )

॥ २ ॥ करिं अति त्वरा ॥ घडि घडि घडि पल पल जप ॥ अमृत धाम रामनाम धरुनि आदरा ॥ ध्रु० ॥ अंतसमय परम घोर ॥ दोषत्रय करिती जोर ॥ घुरु घुरु घुरु कंठ होय ॥ भरिल भ्रम हरिल स्मृति ॥ करिल घाबरा ॥ करिं० ॥ १ ॥ अति दुर्धर अपरिहरा ॥ येइल जंव तुजसि जरा ॥ लट लट लट हलल मान ॥ धनुसमान तनु पुमान होत बावरा ॥ करिं० ॥ २ ॥ जो इंद्रियसंघ दक्ष ॥ तो निजकल्याण दक्ष ॥ त्यज वट वट खटपट उगि ॥ झटपट करि कपटरहित ॥ भज रमावरा ॥ करिं० ॥ ३ ॥ विनवि पंत विठ्ठलशर्म ॥ किमपि धरि विरम विरम ॥ विषयिं नरम अमर महित ॥ चरमतनू परम लाभ ॥ न करिं मातिरा ॥ करिं० ॥ ४ ॥

पद—( राग कल्याण. ताल—त्रिवट. चाल—सं. प. जो. या चा. )

॥ ३ ॥ हरिची नाम शर्करा गोड ॥ सोडवि दुर्मतिखोड ॥ ध्रु० ॥

दुष्ट दुष्ट परिपुष्ट अहंकृति, ॥ महिष होतसे रोड ॥ हरि० ॥१॥ हरऊनि संशय सकल मनाचे ॥ उपजवि सन्मति-मोड ॥ हरि० ॥ २ ॥ पंत विठ्ठल प्रेक्षित ही भालि ॥ भवतरणा तरि जोड ॥ हरि० ॥ ३ ॥

पद—( राग–कालंगडा. ताल–त्रजनी. )

॥ ४ ॥ रंगमें खुदा खोज निकालो ॥ तनत किया मन मक्का है ॥ मीहं महंमद झूले अंदर ॥ रसुलीछा लकलक्का है ॥ ध्रु० ॥ पंच तनके दरगा अंदर ॥ आलिफ नामका सीका है ॥ अयन अली गुल चमन खुला है ॥ बीन देखेका धक्का है ॥ रंग० ॥१॥ बे चुन बेच गुन निरंजन ॥ बे शुभाकु देखो है ॥ बेन मनके दीदकसीदमो सो एक आशके पक्का है ॥ रंग० ॥ २ ॥ दास नवलका पीर अवलिया ॥ नाघेसर वली बाका है ॥ उनकीयाथा महरेमसो बानी ॥ नबी नाम विठ्ठलको है ॥ रंग० ॥ ३ ॥

पद—( राग–असावरी. ताल–त्रिवट. )

॥ ५ ॥ सतत तुझें प्रभु मी यश गावें ॥ तव भजनीं रंगावें ॥ ध्रु० ॥ त्वदितर लोभें प्रभु नच माझें ॥ चित्त कधीं जागावें ॥ सतत० ॥ १ ॥ न घडे प्रभु मज जरि तव सेवा ॥ तरि कां व्यर्थ जगावें ॥ सतत ० ॥ २ ॥ त्वत्प्रेमामृत याचितसें मी ॥ काय इतर मागावें ॥ सतत० ॥ ३ ॥ घनमकरंदीं तव पदकमलीं ॥ मन भृंगें गुंगावें ॥ सतत० ॥ ४ ॥ दास विनविता दीन सख्या तुज ॥ मदघनगा भंगावें ॥ सतत० ॥ ५ ॥

पद—( राग—गौरी. ताल—धुमाळी. )

॥ ६ ॥ देखिला हो हरि देखिला हो ॥ विश्वव्यापक मुरारी ॥ ध्रु० ॥ आजि सोनियाचा दीन ॥ वर्षे अमृताचा घन ॥ देखि० ॥ १ ॥ बरवा संतसमागम ॥ प्रकटला आत्माराम ॥ देखि० ॥ २ ॥ बाप रुक्मादेवीवर ॥ कृपासिंधु करुणाकर ॥ देखि० ॥ ३ ॥

पद—(राग—बिभास. ताल—एका.)

॥ ७ ॥ तूं पाव हरी सदया ॥ सदया सदयारे। हर हर हर भव भय कर ॥ सार्थक वर देवा ॥ ध्रु० ॥ घडिभरि तरि दर्शन दे ॥ हृदयीं प्रगटुनियां ॥ मन तव पदिं रत करि प्रभु । सेवक रक्षायां ॥ तूं० ॥ १ ॥ तारीं दीना नंदनंदना । गाइन त्वन्महिम्या । लवकरि मृति भय हरुनि । शांत हृदय करिबा ॥ तूं० ॥ २ ॥

पद—( राग—जिल्हा काफी. ताल—एका. )

॥ ८ ॥ तारी तारी यदुराया ॥ गेला गेला जन्म वायां ॥ध्रु०॥ दृश्य संगीं गुंग झालों ॥ क्षणिक सुखें नाहीं धालों ॥ वैराग्याचे वाटे भ्यालों । वारि वारी मोह व्यथा ॥ तारी० ॥ १ ॥ नाहीं केली शुद्ध मति ॥ कैशी घडे तव भक्ति ॥ मार्ग चुकलों झाली भ्रांती ॥ धरुनि हातीं नेइं पंथा ॥ ता० ॥ २ ॥ आतां मजला अन्य त्राता ॥ नदिसे तुजविणें अनंता ॥ धांव वेगें कृपावंता ॥ रंक पायीं ठेवि माथा ॥ ता० ॥ ३ ॥

पद—(राग—जयवंति. ताल—त्रिवट.)

॥ ९ ॥ दयासागर पिता करुणा निधान ॥ विसरूं नको क्षण

॥ ध्रु० ॥ रोग शोक पाप दुःखी ॥ तोचि ठाके संमुखी ॥ सोडुनि दुर्बल सुता नाहीं ॥ करित गमन ॥ दया० ॥ १ ॥ उघडोनि हृदय द्वार ॥ हांक मारी वारंवार ॥ देई प्रीति उपहार करीं दर्शन ॥ दया० ॥ २ ॥

पद—( राग—काफीजिल्हा. ताल—त्रिवट. )

॥ १० ॥ तुजविणरे भगवान् ॥ कोठेंच मन हें न जडो ॥ ध्रु० ॥ मिथ्या ऐसें जाणुनि सकळहि ॥ विषयसुख नावडो ॥ प्रभुसत्तेनें जे जे समयीं ॥ घडेल तें सुखिं घडो ॥ तु० ॥ १ ॥ योग लक्ष निज धैर्यबळें ॥ जिव मोहांत न सांपडो ॥ आयुष्य सरल्या कधीं तरीं ॥ देह पडेल तेथें पडो ॥ तु० ॥ २ ॥ प्रपंच रहाटीं वर्तत असतां ॥ कुणिकडेचि नाअडो ॥ वैराग्याग्निनें प्रचंड होउनि ॥ अखंडित कडकडो ॥ तु० ॥ ३ ॥ ह्मणें सोयरा विपरीत बुद्धिचा कुसंग हा विघडो ॥ मुमुक्षु होउनि शुद्ध ब्रह्मींचें मोक्षद्वार उघडो ॥ तु० ॥ ४ ॥

पद—( राग—बेहाग. ताल—त्रिवट. )

॥ ११ ॥ तूं मेरे प्रान आधार ॥ प्रभुजी ॥ तूं मेरे ० ॥ ध्रु० ॥ नमस्कार दंडवत बंधना ॥ अनक बार जाऊं वार ॥ प्रभु० ॥ १ ॥ उठत बैठत सोवत जागत ॥ ये मन तुजही चितार ॥ प्रभु० ॥ २ ॥ सुख दुःख मनकी सबही बर्था ॥ तुजही आज्ञासार ॥ प्रभु० ॥ ३ ॥ तूं मेरे ओट बल बुद्ध धन तुमही ॥ तूं मेरे पर-

वार ॥ प्रभु० ॥ ४ ॥ जो तुम करो सोई फल हमरे ॥ पेरव नानकगुरुचरणार ॥ प्रभु० ॥ ५ ॥

पद—( राग—असावरी. ताल—चौताल. )

॥ १२ ॥ तारीगा दीनासी दीनबंधु ब्रीद जगीं गाजत ॥ ध्रु० ॥ नसे कोठें मना शांति भेट दे जगन्नाथ ॥ कातर हृदय हा रंक पावें परात्पर ॥ तारी० ॥ १ ॥

पद—( राग--जिव्हा काफी. ताल--दीपचंदी. )

॥ १३ ॥ भज भज तो भगवंत ॥ जया न आदि न अंत ॥ ध्रु०॥ ध्याउनि पावती उत्तम सुख ज्या ॥ चित्तीं संतत संत ॥ जया० ॥ १ ॥ आर्तजनाचा ताप निवारी ॥ जो नित्य दयावंत ॥ जया० ॥ २ ॥ जाशि शरण त्या भाव धरोनि ॥ लाभेल सूख अनंत ॥ जया० ॥ ३ ॥

पद—( राग, ताल वरच्या पदाप्रमाणें. )

॥ १४ ॥ अनन्य शरण रिघा हरिला ॥ तारक तो जगदीश्वर जाणुनि ॥ ध्रु० ॥ अनंत करे वर द्याया भक्तां ॥ पाशीं नित्य उभा ॥ हरिला० ॥ १ ॥ कास धरा विश्वासें तयाची ॥ देणार नाहीं दगा ॥ हरिला० ॥ २ ॥ मानव देहीं साधन हें करिं ॥ एका जनार्दनिं गा ॥ हरिला० ॥ ३ ॥

पद—( राग—काफी. ताल—धुमाळी. चाल—जमका अजप. )

॥ १५ ॥ जमसों नहीं डरोंगा बे ॥ हरिका भजन करोंगा बे ॥ ध्रु० ॥ अहंता मारूं ममता मारूं खानजादमै कहांऊ ॥ मन मेरा अन्न

चौकस राखूं चित्त चैतनमें मिलाऊं ॥ जम० ॥ १ ॥ रामनामका घोडा मेरा मैदाने दवडाऊं ॥ भजन प्रताप हातमे बर्छी सन्मुख लेकर जाऊं ॥ जम० ॥ २ ॥ और लोक कसबके चाकर मै हुजूरका काजी ॥ कामक्रोधकी गरदन मारूं साहेब राखं राजी ॥ जम० ॥ ३ ॥ मै साहेबका साचा चाकर मेरा नाम कबीरा ॥ सबसंतकुं शीस नमाऊ जोहरि पारखे हीरा ॥ जम० ॥ ४ ॥

पद—(राग—भैरवी. ताल—त्रिवट.)

॥ १६ ॥ वद नामचि तें सार ॥ रसने वद० ॥ ध्रु० ॥ गोरस मधुरस ईक्षुरस सुधारस ॥ नवरस तेहि असार ॥ रसने० ॥ १ ॥ तळमळसी किती करिसी कीं हे ॥ वेडे वेडे चार ॥ रसने० ॥२॥ भक्त मयूर कृपाघन राघव ॥ उगडिल मुक्तिद्वार ॥ रसने० ॥३॥

पद—(राग—बिभास. ताल—एका.)

॥ १७ ॥ आठवूं तुज देवा प्रेमें भक्तजन तूं सखा ॥ सांभाळुनियां निजदासातें देशी नित्य सुखा ॥ ध्रु० ॥ अनंत प्रीति अपार करुणा अगम्य तुझी कळा ॥ अगाध तुझें ज्ञान भासतें सीमा न दिसे बळा ॥ अतर्क्य चातुर्यानें केलें भूषित त्वां भूतळा ॥ मिठी घालितों सद्भावानें तुझ्या मंगळगळां ॥ आठवूं० ॥ १ ॥ त्रिभुवनि तुझी कीर्ति गातसे काय गावि मानवें ॥ मतिहीन तुज जोडूं पाहूं आळवूनियां स्तवें ॥ अनेक रिपु संसारीं गांजितों त्यांसीं वारावें ॥ सन्मति देउनि सन्मार्गातें आह्मां लावावें ॥ आठवूं० ॥ २ ॥ कृपा सदोदित तुझी आह्मां दीनावरती असो ॥

तुझ्या भक्तिचा प्रेमा देवा दासां हृदयीं वसो ॥ जेणें तुझी विस्मृति पडते ऐशी बुद्धि नसो ॥ मोक्षसाधन व्यवसायीं मन सदैव रमलें असो ॥ आठवूं तुज देवा प्रेमें भक्त जना तूं सखा ॥ ३ ॥

पद—( राग—रामकली. ताल—धुमाळी. चाल—विठ्ठल भक्ताची. )

॥ १८ ॥ श्रीरंगा ॥ दे मजला सत्संगा ॥ आलों शरण तुला ॥ १ ॥ रघुनाथा ॥ आवडो तुझे गुण गातां ॥ आ० ॥ २ ॥ गोविंदा ॥ सोडवि विषयछंदा ॥ आ० ॥ ३ ॥ स्वानंदा ॥ विसरविं विषय छंदा ॥ आ० ॥ ४ ॥ श्रीकृष्णा ॥ दूरकरीं धनतृष्णा ॥ आ० ॥ ५ ॥ रघुराया ॥ आवरी आपुली माया ॥ आ० ॥ ६ ॥ गोपाळा ॥ उघडी चिन्मय डोळा ॥ आ० ॥ ७ ॥ श्रीरामा ॥ दे मज भजन प्रेमा ॥ आ० ॥ ८ ॥ घनश्यामा ॥ नेई मज निज धामा ॥ आ० ॥ ९ ॥ भगवंता ॥ तारी विठ्ठलपंता ॥ आलों शरण तुला ॥ आ० ॥ १० ॥

पद—( राग—कालंगडा. ताल—धुमाळी. चाल—तोवरि तळमरे. )

॥ १९ ॥ आह्मीं नमुं त्याला, नमुं त्याला ॥ उपाधि नाहीं ज्याला ॥ध्रु०॥ संशय उरला नाहीं ॥ अवघा ब्रह्मचि झाला पाहीं ॥ आह्मीं० ॥ १ ॥ स्वयंभु मुळचा आहे ॥ द्वैतपणासि गिळुनि राहे ॥ आह्मीं० ॥ २ ॥ समूळ अवघें हरलें ॥ पूर्ण निर्गुण जयासि कळलें ॥ आह्मीं० ॥ ३ ॥ रंगनाथ गुरुपायीं ॥ ज्याचा निश्चय दुसरा नाहीं ॥ आह्मीं० ॥ ४ ॥

पद—( राग–कल्याण. ताल–त्रिवट. )

॥ २० ॥ वद वद वद वद रसने नाम श्रीहरीचें ॥ कर कर कर सार्थक या अतुल जिवनाचें ॥ ध्रु० ॥ तोचि दीनबंधु हरिल ॥ प्रेमें अति जाड्य अखिल ॥ सद्भावें हृदय भरिल ॥ स्वीय सेवकाचें ॥ वद० ॥ १ ॥ कोण प्रभूविण सदय ॥ सत्कार्यीं देईल जय ॥ घोर दुःख टाळिल भय ॥ दीनअनाथाचें ॥ वद० ॥ २ ॥ आठवि तरी जगदीश्वर ॥ तोचि एक भवभयहर ॥ भजन अति प्रेमल कर ॥ निशिदिनीं तयाचें ॥ वद० ॥ ३ ॥

✓ पद—(राग–पूर्वी. ताल–त्रिवट.)

॥ २१ ॥ कसा करिल भव पार ॥ हरी मज कसा० ॥ ध्रु० ॥ तनमन धन विषयां गुंतलें ॥ भजनीं आळस फार ॥ हरि० ॥ १ ॥ मी एक गायक मी एक वैदिक ॥ हाचि उठे अहंकार ॥ हरि० ॥ २ ॥ खटपट करितां वायां गेली ॥ नाहीं केला उपकार ॥ हरि० ॥ ३ ॥ आदि नारायण जोडुनि पाणी ॥ पतित करीं उद्धार ॥ हरि मज० ॥ ४ ॥

पद—(राग–कल्याण. ताल–धुमाळी.)

॥ २२ ॥ नारायण नामाच्या छंदें नाचत महिवरती ॥ पाहाहो ॥ १ ॥
नारद योगी नाना भुवनें फिरूनिया येती ॥ पाहाहो ॥ २ ॥
अति दुःखानें पीडित मानव बघतां गहिंवरती ॥ पाहाहो ॥ ३ ॥
वारुनि त्यांचें दुःख हराया हेतु मनीं करिती ॥ पाहाहो ॥ ४ ॥

पद—( राग–हिंडोल. ताल–त्रिवट. )

॥ २३ ॥ याहो गडे याहो गडे। निजहित साधूं ॥ ध्रु० ॥ गगन मंदिरिं। गंभिरसागरीं। गिरिगव्हरीं। हृदयीं भूतनाथा। धुंडूं हो सदया ॥ निज० ॥ १ ॥ तळमळ न मिटे। भय न सुटे। जरी नुमटे। अंतरीं कृपासिंधु। ध्याऊं हो सखया ॥ निज० ॥ २ ॥

पद—( राग–काफी. ताल–धुमाळी. )

॥ २४ ॥ नारायणा न तुज ओळखिला ॥ ध्रु० ॥ नकळे कांहीं वाटत गोड विषय ॥ सांठत पापनिचय आटत सकळ वय ॥ कांरे हरे उगिच मला ॥ श्रम येथ करुनि ठेला ॥ नारा० ॥ १ ॥ नाहीं नामरस प्रेम धरुनियां सेवियला ॥ फिरतां संसारीं हे लुब्ध झाला ॥ साच अनुदिनीं जाच होय जिव वायां गेला ॥ कांरे० ॥ नारा० ॥ २ ॥ दृढ आशापाश तेणें जाय परसदनाला ॥ भासे दुर्दैव योग आड आला ॥ भजन पुजन ध्यान न घडे खलचि केला ॥ कांरे० ॥ नारा० ॥ ३ ॥ विप्र जगन्नाथ बाळ करि आळ होई त्याला ॥ प्रसन्न तोडीं भवबंध-नाला ॥ दुर्जन षड्वैरी यांचे संगा कृष्णदास भ्याला ॥ कांरे० ॥ नारा० ॥ ४ ॥

पद—( राग–काफी. ताल–धुमाळी. चाल–तारितारि रामराया. )

॥ २५ ॥ देवा तुझ्या उपकारा ॥ नाहीं नाहीं पारावारा ॥ ध्रु० ॥ माझे अपराध अगणित ॥ परमावधि अपरमित ॥ गणितां थकला चित्रगुप्त ॥ ऐशा मज तारिसी पामरा ॥ देवा० ॥ १ ॥

पृथ्वी आप तेज वात ॥ आकाश हें मन अद्भुत ॥ माझे स्पर्शी कंटाळत ॥ ऐशा तारिसी मज दुर्धरा ॥ देवा० ॥ २ ॥ दुर्धर परि तुझा ह्मणवित ॥ चरणीं अर्पूनि सर्वही हेत ॥ पतित करावा पुनित ॥ दीनोद्धारा मयुरेश्वरा ॥ देवा० ॥ ३ ॥

पद—( राग—कालंगडा. ताल—त्रिवट. )

॥२६॥ हरिसें कोई नहिं बडा ॥ दिवानें क्यौं गफलतमें पडा ॥ ध्रु० ॥ प्रल्हाद बेटा हरिसें लपटा ॥ जबी खांब कडकडा ॥ दिवानें० ॥ १ ॥ गोपीचंदा बचन सुनकर ॥ महाल मुलुख सब छोडा ॥ दिवानें० ॥ २ ॥ हनुमानसें सेवा कीनी ॥ ले द्रोणागिरी उडा ॥ दिवानें० ॥ ३ ॥ पुंडलीकनें सेवा कीया ॥ विठ्ठल इटपर खडा ॥ दिवानें० ॥ ४ ॥ कहत कबीरा सुन भई साधू ॥ हरिचरन चित्त जडा ॥ दिवानें० ॥ ५ ॥

पद—( राग—यमन. ताल—त्रिवट. )

॥ २७ ॥ लौकरि धांवत धांवत सदया ॥ चपल उडी हरि घाल ये ॥ ध्रु०॥ गांजिति हे मज वैरी सारे ॥ न कळति तुजला हाल ये ॥ लौकरि० ॥ १ ॥ या समयीं प्रभु आश्रय नाहीं ॥ चालुं नको तूं चाल ये ॥ लौकरि० ॥ २ ॥ मायबाप कनवाळु दयाब्धी ॥ पीडित हा तंव बाळ ये ॥ लौकरि० ॥ ३ ॥

पद—( राग—कल्याण. ताल—त्रिवट. )

॥ २८ ॥ अघसंकट सर्व हराया ॥ साधन नाम तुझें प्रभुराया ॥ ध्रु० ॥ तव नामासम सुदृढ नौका ॥ न दुजी मोह

तराया ॥ साध० ॥ १ ॥ दुर्विषयांच्या जाळीं पडतां ॥ सोडवी कोण नाराया ॥ साध० ॥ २ ॥ अनुतापाग्नी प्रेमसुधेनें ॥ हृदयीं शांत कराया ॥ साध० ॥ ३ ॥

पद—( राग–कालंगडा. ताल–त्रिवट. )

॥ २९ ॥ तें मन निष्ठुर कां केलें ॥ जें पूर्ण दयेनें भरलें ॥ गजेंद्राचे हांके सरसें ॥ धाउनियां आलें ॥ तें० ॥ १ ॥ प्रल्हादाच्या भावार्थासि ॥ स्तंभीं गुरगुरलें ॥ तें० ॥ २ ॥ पांचाळीच्या करुणा वचनें ॥ कळवळुनि आलें ॥ तें० ॥ ३ ॥ एकाजनार्दन पूर्ण कृपेनें ॥ निशिदिनिं पादिं रमलें ॥ तें० ॥ ४ ॥

पद—( राग–कालंगडा. ताल–एका. चाल–चरंजीव. )

॥ ३० ॥ अखंड हरि हरि वदारे ॥ बापानों ॥ अखंड० ॥ किति सेवाल धन दुर्मदा ॥ रे बापानों ॥ अखंड० ॥ ध्रु० ॥ काय रानांत आटल्या नद्या ॥ काय तरू ह्मणति फळ नद्या ॥ किति कांडोकांडिं मिरवाल मुद्या ॥ गेलि आजची घडि नये उद्यां ॥ रे बापानों० ॥ १ ॥ काय बिदींत न मिळति चिंध्या ॥ काय न मिळे भोंपळा दुध्या ॥ यातों युक्ति सुखाच्या सुध्या ॥ वाचा एकोबाचा भागवत अध्या ॥ रे बापानों० ॥ २ ॥ काय पर्वतीं बुजाल्या दऱ्या ॥ काय दुष्काळ पडल्या कऱ्या ॥ काय महाग तृणाच्या बोऱ्या ॥ या तो वैराग्य युक्ति खऱ्या ॥ रे बापानों० ॥ ३ ॥ बाहु असतां आपणापाशीं ॥ मग कशास पाहिजे उशी ॥ काय अडचण महदाकाशीं ॥ ठाव नेदि काय

पृथ्वी तुशी ॥ रे बापानों० ॥ ४ ॥ काय लोकि दारवंठे रोविले ॥ काय न निळति जुने जोंधळे ॥ ऐसें टांकुनि दुर्मद आंधळे ॥ व्यर्थ अमोल आयुष्य उधळे ॥ रे बापानों० ॥ ५ ॥ कर जोडुनि अमृत विनवितो ॥ बाहु उभारोनि गर्जतो ॥ जो निश्चय धरूनि बैसतो ॥ त्याला घरीं बसल्या राम देतो ॥ रे बापानों ॥ ६ ॥

पद—( राग–कल्याण. ताल–एका. चाल–क्षणभंगुर. )

॥ ३१ ॥ जाणो हरिचे पाय ॥ आह्मी जाणों हरिचे पाय ॥ ध्रु० ॥ नित्य नेम न जाणो यम ही न जाणो नेणों अन्य उपाय ॥ आह्मी० ॥ १ ॥ परिस देउनी सोनें घेणें ॥ जळो तयाचा व्यवसाय ॥ आह्मी० ॥ २ ॥ कृष्णाचें पद सोडुनि आम्ही ॥ मुक्ती वरूं हाय हाय ॥ आम्ही जा० ॥ ३ ॥

पद—( राग–कल्याण. ताल–एका. चाल–संतपदाची जोड. )

॥ ३२ ॥ गड्यानों घ्या हरिच्या नामा ॥ लिहितां कशास ओनामा ॥ ध्रु० ॥ सांगतों ऐका एक वर्म ॥ पहावे भागवतीं धर्म ॥ दुःखसें पाप होय शर्म ॥ यत्न त्या कशासरे परम ॥ न पावे हरि वांचुनि क्षेमा ॥ लिहितां० ॥ १ ॥ शरण सद्गुरुला जावें ॥ हरिभजनिं नच लाजावें ॥ हरिचें सगुणरूप ध्यावें ॥ निर्मळ भावें पूजावें ॥ सांडुन हृदयांतिल कामा ॥ लिहितां० ॥ २ ॥ गृह धन जन यांची ममता ॥ धरुनि व्यर्थची कां श्रमतां ॥ हृदयीं वागवुनी समता ॥ हरिचें चरणांबुज नमितां ॥ नेईल हरि तो निजधामा ॥ लिहितां० ॥ ३ ॥

पद—( राग—यमन. ताल—चौताल. )

॥ ३३ ॥ ध्याऊं या सत्य सनातन जो प्रभु पूर्ण ज्ञान आनंद ॥ धृ० ॥ निराकार जो शुद्ध शांतिरूप ॥ परमात्मा सर्वात्मा जगच्चालक अद्वैत शिव अनंत ॥ ध्याऊं या० ॥ १ ॥

पद—( राग—कतल. ताल—त्रिवट. )

॥ ३४ ॥ धन्य तेचि कीं भजति हरिला ॥ धृ० ॥ देह गेह मोह सर्वहि टाकुनि ॥ संतसमागमीं गाति यशाला ॥ धन्य० ॥ १ ॥ तारक सर्वोत्तम हरि मानुनि ॥ आठविती मनीं सतत अजाला ॥ धन्य० ॥ २ ॥ दैवी भूषणें अंगीं लेउनि ॥ भगवद्भावें नमिति जगाला ॥ धन्य० ॥ ३ ॥ ईश्वरसत्ता स्वीकारि सुखें ॥ शोक हर्ष भय हृदयीं न ज्याला ॥ धन्य० ॥ ४ ॥ सर्वेंद्रिय दास्यत्वीं योजुनि ॥ घडिघडि स्मरती पूर्ण कृपेला ॥ धन्य० ॥ ५ ॥

पद—( राग—कल्याण. ताल—धुमाळी. चाल—राम कथारस. )

॥ ३५ ॥ संतपदाची जोड ॥ दे हरि संतपदाची जोड ॥ ध्रु० ॥ संत समागमें आत्मत्वाचा ॥ सुंदर उगवे मोड ॥ दे हरि० ॥ १ ॥ सुफलित करुनी पूर्ण मनोरथ ॥ पुरविशि जिविचें कोड ॥ दे हरि० ॥ २ ॥ अमृत ह्मणेरे निजभक्ताचा ॥ शेवट करिशी गोड ॥ दे हरि० ॥ ३ ॥

पद—( राग—भैरवी. ताल—त्रिवट. )

॥ ३६ ॥ पतितनकों पावन कीजे ॥ तुमबिन कछू हु न सूझे हो

॥ ध्रु०॥ जो जो आये सरन तिहारे ॥ ताहे प्रेमसुख दीजे हो ॥ पतितनकों० ॥ १ ॥ राखो लाज बिरदबानेकी ॥ मोहे अपनो कर लिजे हो ॥ पतितनकों० ॥ २ ॥ मानपुरी प्रभु अधम उधारन ॥ पल पल यह तन छीजे हो ॥ पतितनकों० ॥ ३ ॥

पद—( राग—कालंगडा. ताल—धुमाळी. )

॥ ३७ ॥ कोठें नच जावें ॥ श्रीहरिलागीं भजावें ॥ ध्रु० ॥ दो चों दिवसां घांटा ॥ भरडुनि उदक करुनियां प्यावें ॥ १ ॥ कोठें० ॥ समयीं आल्या अतितासी ॥ यथाशक्ती भोजन द्यावें ॥ २ ॥ कोठें० ॥ उठतां बसतां धामीं ॥ अमृतेश्वरासी ध्यातची जावें ॥ कोठें नच जावें ॥ ३ ॥

पद—(राग—कालंगडा. ताल-धुमाळी. चाल-बरवे समजारे उमजारे.)

॥३८॥ नरहरि तो भेटवाहो ॥ कोणि तळमळ माझी चुकवाहो ॥ ॥ नर० ॥ ध्रु० ॥ देइन मी द्विजकाय तुझाला ॥ करिन चरणसेवाहो ॥ नर० ॥ १ ॥ कशाला हा संसार पुरे मज ॥ होती जाच जीवाहो ॥ नर० ॥ २ ॥ सज्जन जे तुझी सदय तयातें ॥ मजसाठीं विनवा हो ॥ नर० ॥ ३ ॥ जगन्नाथ सुत कृष्ण तुझाला करितों नमन वांचवा हो ॥ नर० ॥ ४ ॥

पद—( राग—बिभास. ताल—एका. )

॥ ३९ ॥ उठुनि सुप्रभातिं स्मरूं शुद्धमनें देवा ॥ प्रेमभाव धरुनि भजूं करुं तयाची सेवा ॥ ध्रु० ॥ जो परेश चिदानंद तापश्रमावारी ॥ भक्त ध्याती जे तयांचीं संकटें निवारी ॥ उठुनि०

॥ १ ॥ प्रभु कृपानिधान विमल भक्तमनविहारी ॥ आठवितां धांव घाली दिनजनकैवारी ॥ उठुनि० ॥ २ ॥ अनुदिन गुण गाति ज्याचे भाविक नरनारी ॥ धरि भावें कांस त्याची भव-नदी उतारी ॥ उठुनि० ॥ ३ ॥

पद—( राग—भूपकल्याण. ताल—धुमाळी. )

॥४०॥ धांव पाव सावळे विठाबाई कां मनीं धरिली अढी ॥ अनाथ मी अपराधी स्मरतो उतरा पैल थडी ॥ ध्रु० ॥ भक्तरायें ब्रीद बांधलें म्हणुनि घेतली उडी ॥ द्रौपदीचा ऐकुनि धांवा नेसविलीं लुगडीं ॥ धांव० ॥ १ ॥ एकनाथा ग्रहीं पाणि वाहिलें गंगेच्या कावडी ॥ थोव्यासंगें कणसें आलीं बोधल्याचे घरीं ॥ धांव० ॥ २ ॥ कबीरागृहीं शेले विणुनियां घालिसि पायांतळीं ॥ चोरव्यासंगें केली मैत्री ढोरें त्याचीं ओढीं ॥ धांव० ॥ ३ ॥ गोऱ्यासंगें चिखल तुडवी मडकी त्याची घडी ॥ मिराबाईनें वीष पाजिलें भक्तिचे आवडी ॥ धांव० ॥ ४ ॥ रोहिदासासि गुज बोलतां रंगविसी कातडीं ॥ सजन कसाई माला विकितां त्याची धरिसी तागडी ॥ धांव० ॥ ५ ॥ गौवळणींचीं पोरें बोबडीं हनुवांकडी ॥ त्यांच्यासंगें जेवुं लागला भुरकूं लागला कढी ॥ धांव० ॥ ६ ॥ पुतनेनें स्तनी पाजितां ओढिसि तिच्या नाडी ॥ झाबळ भटाचें केलें पारिपत्य पाडीयेली पातडी ॥ धांव० ॥ ७ ॥ झाला झाला नंदाचा गाईराखा पांघुरला घोंगडी ॥ गौळणीनें तुला बांधिलें भक्तिच्या आवडी ॥ धांव० ॥ ८ ॥ कुब्जादासी आव-

डली आठांठायीं वांकडी ॥ निश्चय जीचा पाहुनि बळकट कसि केली फांकडी ॥ धांव० ॥ ९ ॥ पांडवांचा करी कारभार सभेमध्यें लुडबुडी ॥ द्रौपदीचा झाला गळाठा चौहातें वाढी ॥ धांव० ॥ १० ॥ चहुं हातानें उचली पात्रें उच्छिष्टें वेगें काढी ॥ कौरवांनीं पण मांडिला मोत्याच्या खोडी ॥ धांव० ॥ ११ ॥ शिशुपाळाचें शिर उडविलें नाहीं लागली घडी ॥ गौळणीनें तुला बांधिलें भक्तिच्या आवडी ॥ धांव० ॥ १२ ॥ सुदामजीला बहु पीडिलें मुलें त्याचीं उघडीं ॥ मुष्टिभरी पोहे भक्षिले लागली त्या गोडी ॥ धांव० ॥ १३ ॥ दिली सोन्याची नगरी त्याला नाहीं लागली घडी ॥ दामाजीची रसित गुजरली बहु निकट तांतडी ॥ धांव० ॥ १४ ॥ बादशाहाचा हिशोब गुजरिला कवडीनें कवडी ॥ दासकरी विनंती लागो हरिभजनाची गोडी ॥ धांव० ॥ १५ ॥

( पद—राग–देस. ताल–त्रिवट. )

॥ ४१ ॥ कां नये प्रभु करुणा ॥ धरि चरणा दुःख हरणा ॥ सतत याचिं ॥ ध्रु० ॥ कां अस्वस्थासी शांति न देसी सदया तेंवी ॥ शांतिरूप गांजसि ॥ त्वत्कृपा कां मद्दुःख नाशा ॥ पावे नतरी ॥ कां नये० ॥ १ ॥

पद—( राग–कल्याण ताल-त्रिवट-चाल–अपनोगोविंदसेरु० )

॥ ४२ ॥ मै हरिगुन गावत नाचूंगी ॥ ध्रु० ॥ अपनो मंदिरमें बैठेकर ॥ गीता भागवत वाचूंगी ॥ १ ॥ ग्योनध्या-

नकी गठडी बांधकर ॥ हरिहर संगमें लागूंगी ॥ २ ॥ मीराके प्रभु गिरीधर नागर ॥ सदा प्रेमरस चाखेगी ॥ हरि गुन० ॥ ३ ॥

पद—( राग—कल्याण ताल—धुमाळी. )

॥ ४३ ॥ बाळकृष्ण चरणीं मन लागेरे ॥ कीर्तनरंगीं रंगांत देह वागेरे ॥ ध्रु० ॥ स्वरूपीं मन हें लावितां सौख्य आम्हा ॥ कामक्रोधादिक जाती निजधामा ॥ बाळ० ॥ १ ॥ सारासार वद-विता सद्गुरुराया ॥ मंगलधामा जीवन नरहरी पायारे ॥ बाळ० ॥ ॥ २ ॥ सद्रुप चिन्मय नारायणरूप गाऊंरे ॥ तन्मय होऊनि बळिवंत प्रेम गाऊंरे ॥ बाळ० ॥ ३ ॥

---

## ॥ आरती ॥

॥ १ ॥ गावों नाचों विठो करूं तुझा अनुवाद ॥ जिकडे पाहें तिकडे सर्वमय गोविंद ॥ १ ॥ आनंद रे विठोबा झाला माझे मनीं ॥ देखिली पाउलें विटेसहित लोचनीं ॥ २ ॥ नकरीं तपसाधनें मुक्तीचे सायास ॥ हाचि जन्मोजन्मीं गोड भक्तीचा रस ॥ ३ ॥ तुका ह्मणे आह्मां प्रेमा उणें तें कायीं ॥ पंढरीचा राणा सांठ-विला हृदयीं ॥ ४ ॥

आरती—( चाल भजनाची. )

॥ २ ॥ ओंवाळूंगे माये विठ्ठल सबाह्य साजिरा ॥ राई रखु-माबाई सत्यभामेच्या वरा ॥ ध्रु० ॥ कनकाच्या परियेळीं उज-ळूनी आरती ॥ रत्नदीप शोभा कैशा पाजळल्या ज्योती ॥ १ ॥

ओंवाळूं० ॥ मंडित चतुर्भुज दिव्य कानीं कुंडलें ॥ श्रीमुखाची शोभा पाहतां तेज फांकलें ॥ २ ॥ ओंवाळूं ॥ वैजयंती माळ गळां शोभे श्रीमंत ॥ शंख चक्र गदा पद्म आयुधें शोभत ॥ ३ ॥ ओंवाळूं॥ सांवळा सकुमार जैसा कर्दळीगाभा ॥ चरणींचीं नेपुरें वांकीं गर्जती नभा ॥ ४ ॥ ओंवाळूं ॥ ओंवाळितां मन हें उभें ठाकलें ठायीं ॥ समदृष्टि समाधि तुकया लागला पायीं ॥ ५ ॥

## ॥ आरती ॥

॥ ३ ॥ ओंवाळूं आरती पंढरी राया ॥ सर्व भावें शरण आलों तूझिया पायां ॥ १ ॥ सर्व व्यापुन कैसें रूप आकळ ॥ तोहा गौळ्यावरीं झाला श्रीकृष्ण बाळ ॥ २ ॥ स्वरूप गुणातीत झाला अवतार धारी ॥ तो हा पांडुरंग उभा विटेवरी ॥ ३ ॥ भक्तीचिया काजा कैसा रूपासी आला ॥ ब्रीदाचा तोडर चरणीं मिरविला ॥ ४ ॥ आरतें आरती कैसी ओवाळीली ॥ वाखाणितां कीर्ती वाचा परतली ॥ ५ ॥ भाव भक्तिबळें होसी कृपाळू देवा ॥ तुका ह्मणे पांडुरंगा तुझ्या नकळती मावा॥ ६ ॥

## ॥ आरती ॥

॥ ४ ॥ ओंवाळूं आरती मदन गोपाळा ॥ शाम सुंदर गळां वैजयंति माळा ॥ ध्रु० ॥ चरण कमळ ज्याचे अति सकुमार ॥ ध्वजवज्रांकुश ब्रिदाचे तोडर ॥ ओं० ॥ १ ॥ नाभी कमल ज्याचें ब्रह्मयाचें स्थान ॥ हृदयीं पदक शोभे श्रीवत्सलांछन ॥ ओं० ॥ २ ॥ मुख कमळ ज्याचें सुखचिया

पोटीं ॥ वेधलें मानस आनंद याद्दष्टी ॥ ओं० ॥ ३ ॥ जडीत मुकुट ज्याचा दैदीप्यमान ॥ तेणें तेजें कोंदलें अवघें त्रिभूवन ॥ ओं० ॥ ४ ॥ एका जनार्दनीं देखियलें रूप ॥ रूप पाहातां अवघें झालेंसे तद्रूप ॥ ओंवाळूं आरती मदन गोपाळा ॥ शामसुंदर गळां वैजयंति माळा ॥ ९ ॥

## आरती—( आरती ज्ञानराजा या चालीवर. )

॥ ९ ॥ आरती अनंत भूजा ॥ विठो पंढरी राजा ॥ नचलती उपचार ॥ मनें सारीली पुजा ॥ ध्रु० ॥ परेस पार नाहीं ॥ नपडे निगमा ठांईं ॥ भुलला भक्ति भावें ॥ लाहों घेतला देहीं ॥ १ ॥ आरती० ॥ अनिर्वाच्य शुद्ध बुद्ध ॥ उभा राहिला नीट ॥ रामा जनार्दनीं ॥ पांईं जडली वीट ॥२॥ आरती० ॥

## आरती—( चाल भजनाची. )

॥ ६ ॥ भक्तीचे पोटीं बोध कांकडा ज्योति ॥ पंचप्राणें जिवें भावें ओंवाळूं आरती ॥ १ ॥ ओंवाळूं आरती सद्गुरुनाथा ॥ माझ्या पंढरीनाथा ॥ दोनी कर जोडुनी चरणीं ठेविला माथा ॥ ध्रु० ॥ काय महिमा वर्णूं आतां सांगणें हें किती ॥ कोटी ब्रह्म-हत्या मुख पाहातां जाती ॥ ओंवाळूं० ॥ २ ॥ राई रखुमाबाई दोघी उभ्या दोंबाहीं ॥ मयुरपिच्छ चामरें झळकती ठांईंचे ठांईं ॥ ओंवाळूं० ॥ ३ ॥ इटे सहित पाऊलें मनभावें ओंवाळी कोटी रवि शशि दिव्य उगवले ठांईंचे ठांईं ॥ ओंवाळूं० ॥ ३ ॥

तुका ह्मणे दीप घेउनी उन्मनींत शोभा ॥ इटेवरी उभा दिसे लावण्य गाभा ॥ ओंवाळूं आरती सद्गुरुनाथा ॥ ५ ॥

## आरती—( चाल भजनाची. )

॥७॥ येईं हो विठ्ठले माझे माउलीये ॥ निढिळावरी कर ठेवुनी वाट मी पाहे ॥ ध्रु० ॥ आलिया गेलिया हातीं धाडी निरोप ॥ पंढरपुरीं आहे माझा मायबाप ॥ येईं० ॥ १ ॥ पिवळा पीतांबर कैसा गगनीं झळकला ॥ गरुडा वरि बैसोनि माझा कैवारी आला ॥ येईं० ॥ २ ॥ विठोबाचें राज्य आह्मां नित्य दिवाळी ॥ विष्णु दास नामा जिवें भावें ओंवाळी ॥ येईं हो० ॥ ३ ॥

## ॥ आरती ॥

॥ ८ ॥ ऐसीया पायांलागीं मंगल आरती करूं ॥ काया वाचा मनें जिवीं दृढ धरूं ॥ ध्रु० ॥ जपतप तीर्थें जया पांईं मिरविती ॥ संत मुनि वृंद तया सुखालागीं ध्याती ॥ ऐसी० ॥ १ ॥ शुभाशुभ उभे नमिती कर जोडोनी ॥ नारद तुंबर अखंड जयाचें ध्यानीं ॥ ऐसी० ॥ २ ॥ एकाएकिंच जडला जनार्दन पाईं ॥ आरती करितां देह भाव हा नाहीं ॥ ऐसीया पायां० ॥ ३ ॥

## ॥ आरती ॥

॥ ९ ॥ जगदीश जगदीश देवा तुज ह्मणती ॥ परिया जना माजी देशील मुक्ती ॥ पुण्य पाप विरहित सकळां अधिपती ॥ दृष्टहि नलिनी जैशी अलिप्तगती ॥ १ ॥ जयदेव जयदेव जयपंढरीनाथा ॥ नूरे पाप विठ्ठल ह्मणतां सर्वथा ॥ ध्रु० ॥

आगम निगम तुज नेणती कोणी ॥ परि तूं भाव भक्ति जवळीच दोन्ही ॥ नेणतां विधियुक्त हातें पूजूनी ॥ न माये ब्रंह्मांडीं तो संपुष्ट शयनीं ॥ जय० ॥ २ ॥ असुरां काळ भासे विक्राळ पुढें ॥ पसरी मुख एक चावीतो धूडें ॥ भक्ता शरणांगता चालतो पुढें ॥ दावी वाट जाऊं नेदी वांकुडें ॥ जय० ॥ ३ ॥ एकाएकीं बहु विस्तरला सूखें ॥ खेळे त्याची लीला तोचि कवतूकें ॥ तेथें नरनारी हीं कवण बाळकें ॥ काय पाप पुण्य कवण सुखदुःखें ॥ जय० ॥ ४ ॥ सकळां वर्मां तूंची जाणशी एक ॥ बंध मोक्ष प्राप्त आणिक सुखदुःख ॥ जाणों ह्मणतां तुज ठकलीं बहुतेक ॥ तुका ह्मणे शरण आलों मज राख ॥ जय० ॥ ५ ॥

## ॥ आरती ॥

॥ १० ॥ जयजय कटिकर विठ्ठल चिन्मय सुखराशी ॥ सर्वांहि व्यापक ब्रह्म तूं पंढरपुरवासी ॥ पुंडलीकं वरप्रद आपणा ह्मणवीसी ॥ निज भक्तास्तव नाना नटवेषा धरिसी ॥ १ ॥ जयदेव जयदेव जय विठ्ठलराया ॥ करुणामृत सुख सागर वंदित तवपायीं ॥ ध्रु० ॥ भीतातट निज निकटीं राहुनियां देवा ॥ विठ्ठल विठ्ठल स्मरणें तारिसि जडजीवां ॥ अखंड भजनानंदीं दृढ धरुनी भावा ॥ वैष्णव नाचती रंगणि कारिती तव सेवा ॥ जय० ॥ २ ॥ रत्नखचित मुकुटादी तुळसीच्या माळा ॥ आम्लाना कुसुमाच्या घालुनियां गळां ॥ कस्तूर्यादी तिलकें शोभविसी भाळा ॥ मौनी वंदित चरणा अभेद गोपाळा ॥ जय० ॥ ३ ॥

## आरती—( चाल साधी. )

॥ ११ ॥ यूगें अठ्ठावीस विटेवरी उभा ॥ वामांगें रखुमाई दिसे दिव्य शोभा ॥ पुंडलिकाचे भेटी परब्रह्म आलेंगा ॥ चरणीं वाहे भीमा उद्धरी जगा ॥ १ ॥ जयदेव जयदेव जय पांडुरंगा ॥ रखुमाई वल्लभा राईच्या वल्लभा पावें जिवलगा ॥ ध्रु० ॥ तुळसीमाळा गळां करठेवुनि कटीं ॥ कासें पीतांबर कस्तुरि लल्लाटीं ॥ देवसुरवर नित्य येती भेटी ॥ गरुड हनूमंत पुढें उभें राहाती ॥ जय० ॥ २ ॥ धन्य वेणूनाद अनुक्षेत्र पाळा ॥ सुवर्णाचीं कमळें पद्माळा गळां ॥ राई रखुमाबाई राणिया सकळा ॥ ओंवाळीती राजा विठोबा सांवळा ॥ जय० ॥ ३ ॥ ओंवाळूं आरत्या कुरवंड्या येती ॥ चंद्रभागे मध्यें सोडुनियां देती ॥ दिंडी पताका वैष्णव नाचती ॥ पंढरीचा महिमा वर्णावा किती ॥ जय० ॥ ४ ॥ आषाढी कार्तीकी भक्तजन येती ॥ चंद्रभागे माजी स्नान जे करिती ॥ दर्शन हेळा मात्रें तयां होय मुक्ती ॥ केशवासीं नामदेव भावें ओंवाळीती ॥ जय० ॥ ५ ॥

## आरती–( चाल भजनाची. )

॥ १२ ॥ संत सनकादीक भक्त मिळाले अनेक ॥ स्वानंदें गर्जती पाहूं आले कौतूक ॥ १ ॥ नवल होत आहे आरती देवाधिदेवा ॥ स्वर्गीहूनी सुरवर पाहूं येताती भावा ॥ ध्रु० ॥ नरनारी तटस्थ पडले नयना ॥ ओंवाळीतां श्रीमुख धनी न पुरे

मना ॥ २ ॥ एका जनार्दनीं मंगल कौतुकें गाती ॥ आरत्या गाती ॥ मिळाले वैष्णव जयजयकारें गर्जती ॥ नवल० ॥ ३ ॥

### आरती—( आरती ज्ञानराजा या चालीवर. )

॥ १३ ॥ विठ्ठला मायबापा ॥ वारीं त्रिविध तापा ॥ संसारीं त्रासलों मीं ॥ वय लागलें मापा ॥ ध्रु० ॥ बाळपणीं नाठवीलें ॥ व्यर्थ तारुण्य गेलें ॥ जरा हें दुःख मोठें ॥ पुढें टाकुनी आलें ॥ विठ्ठला० ॥ १ ॥ भक्तीचा लेश कांहीं ॥ सत्सन्मार्ग नाहीं ॥ परिणामीं काय आतां ॥ शरण आलों तुझे पाईं ॥ विठ्ठला० ॥ २ ॥ हरि हरी माझी भ्रांती ॥ ह्मणुनी आलों काकुळती ॥ कृपाळुवा जगन्नाथा ॥ तारीं गंगाधर सुता ॥ विठ्ठला माय० ॥ ३ ॥

### आरती—( चाल साधी. )

॥ १४ ॥ काय तुझा महिमा वर्णूं मी किती ॥ नाममात्रें भवपाश तूटती ॥ पाहातां पाऊलें ही विष्णुमूर्ती ॥ कोटी कुळां-सहीत जग उद्धरती ॥ १ ॥ जयदेव जयदेव जय पंढरिराया ॥ करोनियां कुर्वंडी सांडीन काया ॥ ध्रु० ॥ मंगळ आरतीचा थोर महीमा ॥ आणिक द्याया नाहीं तीस ऊपमा ॥ श्रीमुखा-सहित देखे जो कर्मा ॥ पासुनि सुटे जैसा रवि नाशी तमा ॥ जय० ॥ २ ॥ धन्य व्रतकाळ हे एकादशी ॥ जागर उपवास घडे जयासी ॥ विष्णूचें पूजन एक भावेंसी ॥ नित्य मुक्त पूज्य तींहीं लोकांसी ॥ जय० ॥ ३ ॥ नवजे वाया काळजे तूज ध्याती ॥ अखंड तूझा वास तयांच्या चित्तीं ॥ घाले सुखें

सदा प्रेमें डुल्लती ॥ तीर्थं मिळोणी वास तयाचा पाहती ॥ जय० ॥ ४ ॥ देव भक्त तूंची झालासी दोन्ही ॥ वाढावया सुख भक्ति हे जनी ॥ जडजीवां उद्धार व्हाया लागूनी ॥ शरण तुका वंदी पाऊलें दोन्ही ॥ जयदेव० ॥ ५ ॥

**आरती**—( अवतार गोकुळीं या चालीवर. )

॥ १९ ॥ पंढरि पुण्य भूमी ॥ दक्षण वाहीनी ॥ तीर्थ चंद्रभागा ॥ माहा पातक धुणी ॥ उतरलें वैकुंठ ॥ माहा सुख मेदिनी ॥ १ ॥ जयदेवा पांडुरंगा ॥ जय अनाथ नाथा ॥ आरति ओंवाळीन ॥ तुझा लक्ष्मीच्या कांता ॥ ध्रु० ॥ नित्य नवा सोहळाहो ॥ माहा वाद्यांचा गजर ॥ सन्मुख गरुड पारीं ॥ उभा जोडोनी कर ॥ मंडित चतुर्भुज ॥ कटि मिरविती कर ॥ जय० ॥ २ ॥ हरिनाम कीर्तनेंहो ॥ आनंद महा द्वारीं ॥ नाचती प्रेम सूखें ॥ नर तेथिंच्या नारी ॥ जीवन्मुक्त लोक ॥ नित्य पाहती हरी ॥ जय० ॥ ३ ॥ आषाढी कार्तिकीहो ॥ गरुड टक्याचें भार ॥ गर्जती नाम घोषें ॥ माहा वैष्णव वीर ॥ पापासी रीग नाहीं ॥ असुर कांपती शूर ॥ जय० ॥ ४ ॥ हें सुख पुंडलीकें ॥ कैसें आणिलें बापें ॥ निर्गुण साकारिलें ॥ आह्मा लागि हें सोपें ॥ म्हणोनि चरण धरोनी ॥ तुका राहिला सूखें ॥ जयदेवा पांडुरंगा ॥ जय आनाथ नाथा ॥ आरति ओंवाळीन ॥ तुम्हा लक्ष्मीच्या कांता ॥ ५ ॥

## आरती—( राग कल्याणी—ताल एका. )

( "आरती ज्ञानराजा" या चालीवर. )

॥ १६ ॥ शरण मी जगन्नाथा ॥ चरणीं ठेवियेला माथा ॥ पदर पसरोनी ॥ नाहीं मज अन्य त्राता ॥ शर० ॥ ध्रु० ॥ पीडिलों पापतापें । चित्त थरथरा कांपे ॥ सत्वरी धांवोनीया । बाळा रक्षावें बापें ॥ शर० ॥ १ ॥ ऐहिकाचा लोभ सारा । व्यर्थ व्यर्थ हा पसारा ॥ येई ना कांहीं कामा । नाहीं आतां अन्य थारा ॥ शर० ॥ २ ॥ धन द्रव्य घरदार । सर्व एथेंचि राहाणार ॥ न येती संगें कोणी । तुझे पाय खरें घर ॥ शर० ॥ ३ ॥ सर्व सुख तुझ्या पायीं । म्हणोनि टेकिली डोई ॥ त्यजूं नको मज आतां । दीन दासा पदरीं घेई ॥ शर० ॥ ४ ॥

## आरती—( राग यमनी बिलावल-ताल एका. )

॥ १७ ॥ जयदेव जयदेव जय मंगलधामा । दर्शन दीना दासा दे हृदयारामा ॥ ध्रु० ॥ शोभे सुंदर तव कृति आनंदपि नयना । घ्राणा सुवास सुस्वर तोषविती काना ॥ तुझियें स्वादु रसांची घेई रुचि रसना । दुर्बळ इंद्रियगण परि वर्तुं शके तुजना ॥ जय० ॥ १ ॥ त्यागुनि सर्वहि ऋषिमुनि तव ध्यानीं रतले । तेही पूर्णपणें नच तुज जाणु शकले ॥ ऐशा अतींद्रियातें संसारीं गढले । विषयीं हे जन अबुद्ध आकाळितां श्रमले ॥ जय० ॥ २ ॥ परि भेटीची तुझिये इच्छा बहु जाहली । लडिवाळ पणाची आस पूर्ण किजे वहिली ॥ अनंत जरि अप-

राध तूं पोटीं घालीं । देई दर्शन बापा हृदयें तान्हेलीं ॥ जय० ॥ ३ ॥

## आरती—( राग यमनी विलावल-ताल एका )

॥ १८ ॥ जयदेव जयदेव जय करुणागारा । धांवुनियां भक्तांच्या येई उद्धारा ॥ ध्रु० ॥ संसाराच्या पाशां तोडुनि तुज भजणें । सुखदात्या तुझिया पदकमलीं रमणें ॥ अखंड प्रभु तव् गौरव नत होऊनि करणें । घडवीं आह्मां कडुनी हीं विहिता-चरणें ॥ जय० ॥ १ ॥ कवि गणही शिणले प्रभु तव गुण गातां । संत मुनीही थकले रूप तुझें ध्यातां ॥ पामरजन गाऊं काय विभो आतां । दीन तुझ्या चरणीं प्रभु ठेवूं माथा ॥ जय० ॥ ॥ २ ॥ संकटिं पडतां आह्मां दासांतें तारीं । ज्या तूं तारिशि त्यातें कोण प्रभो मारी ॥ त्यागिशि तूं अमुतें तरि संकट होई भारी । तुज ऐसा तारक यान दिसे संसारीं ॥ जय० ॥ ३ ॥

## दिंड्या.

॥ १ ॥ नमन करुनी तुज प्रार्थि देवराया । देई दर्शन बा दीन तूं नरा या ॥ कोण तुजविण मज अन्य पाळिताहे । कृपा-दृष्टीनें पूर्ण मला पाहे ॥ १ ॥ प्रभो तुजला मी भक्तिबळें साधीं । नसे त्याविण मज अन्य ते उपाधी ॥ तरी दासा या भेट दे अनंता । सख्या पावें मज पूर्ण कृपावंता ॥ २ ॥ येइं हृदयीं मम येई मायबापा । हारिं माझ्या तूं हारिं सकल पापा ॥ छेदिं कामादिक षडरि हे तु तापा । गांजलों मी बहु धांव शांतिरूपा ॥ ३ ॥

॥ २ ॥ सख्या भगवंता सृष्टिच्या सुमित्रा ॥ परम पुरुषा हे चिन्मया पवित्रा ॥ आमुच्या तूं आधार शिथिल गात्रां ॥ तुझी भक्ती बा पाप हारि मात्रा ॥ १ ॥ अखिल ब्रम्हांड प्रभो तूज गातें । तूंचि आश्रय बा एकला जगातें ॥ तुझें आमुचें मी काय वदूं नातें । कोण मानव तो वर्णु शके तूतें ॥ २ ॥ नाम तूझें बा पापराशि जाळी । मुक्त झाले ते गात पिटुनि टाळी ॥ संत योगी कवि साधु सर्वकाळीं । भेटलाशी त्यां दिसे आम्हां डोळीं ॥ ३ ॥

॥ ३ ॥ असों देवा तव चरणिं आम्ही लीन । शरण आलों लेंकरें तुझीं दीन॥ करूं तूझें प्रेमळ नामगान। ओंवरी या देहांत पंचप्राण ॥ १ ॥ थोर आम्ही अपराधि दीनबंधू । घेई पदरीं आम्हांसि कृपासिंधू ॥ नित्यभावें तूजला दास वंदूं । सेवुं आनंदें नामसुधा बिंदु ॥ २ ॥ येऊं आनंदें दिवस उत्सवाचा । सतत पुरवीं हा हेतु तूं आमचा ॥ तुझ्या चरणाची भक्ति अम्हा लागो॥ तुझी प्रीती हृदयांत नित्य वागो ॥ ३ ॥

॥ ४ ॥ सर्व सृष्टी ही तुझाची पसारा । तुझ्या इच्छेनें चलित निराकारा ॥ बुद्धि देईं गा मजला उदारा ॥ आठवूनीयां क्रमूं वेळ सारा ॥ १ ॥ असो सतत मन तव प्रीतिकामी । ध्याउं तुजलाची नित्य सर्व कामिं ॥ राहु आत्मा हा तूझिया लगामीं ॥ हाचि जायासी उपाय सुखधामीं ॥ २ ॥

॥ ५ ॥ अहर्निशि हे प्रभु घोष कीर्तनाचा ॥ करो आनंदें दीन हीच वाचा ॥ असत्कार्यीं कल नसो मानसाचा । संग व्हावा

परी संतसज्जनाचा ॥ १ ॥ विश्वपाला हा विनवी दीन पायां । न हें जाऊं दे जन्म अखिल वायां ॥ झटो क्षणभर तरी नाशवंत काया । दया दृष्टीनें स्वजनहित कराया ॥ २ ॥ मागणें हें तुजपाशिं जगत्पाळा । कोटि अपराधां विसरुनी दयाळा ॥ द्यावि उत्तम गति दीन बाळकाला । अर्पि सेवक सप्रेम गीतमाला ॥ ३ ॥

॥ ६ ॥ जगन्नाथा हे विभो सर्वसाक्षी । सदा कारुण्यें दीन दास रक्षीं ॥ तुझ्या पायांविण अन्य मी न लक्षीं । म्हणुनि मजलागीं ना कदा उपेक्षीं ॥ १ ॥ वेष्टुनी जो या सर्व जगा-राहे । सृष्टि भारातें अखिल सदा वाहे ॥ अंतरीचें गुज पूर्ण जाणताहे । तोचि चिन्मय मज तेथ दीसताहे ॥ २ ॥

## साक्या

॥ १ ॥ देवा असशी सर्वकाळ तूं माझा चित्तविसांवा । वांछितसें मी निशिदिनि हें कीं तव मुखचंद्र दिसावा ॥ १ ॥ तव करुणेनें देवा माझा बुद्धिभ्रम निरसावा । प्रभु तुजवांचुनि मज इतरांचा छंद कधीं हि नसावा ॥ २ ॥ देवा आहें मंदमती मी नकळे मजला कांहीं । अज्ञानतमीं भ्रमतों श्रमतों बहुविध मी शंकांहीं ॥ ३ ॥ निर्दोष करीं चक्षू माझे सुज्ञानशलाकांहीं । करिशिल करुणा तर मग उरतिल संशय पटले कांहीं ॥ ४ ॥ चुकलों बहु तरि देवा माझा नच अव्हेर करावा । क्षमा करावी दीन वत्सला दासीं लोभ धरावा ॥ ५ ॥ अज्ञानोत्थित माझ्या

मतिचा प्रभु अंधार हरावा । दया करावी ऐशी स्वामी कीं हा पतित तरावा ॥ ६ ॥

॥ २ ॥ काया वाचा मनहीं चरणीं म्यां तुझिये ठेवीलीं । त्यागुनि अवघ्या ऐहिक वांछा भक्तिसुधा सेवीली ॥ १ ॥ नाहीं नाहीं आप्त इतर मज प्रभुराया तुजवीणें । करिशी माझा त्याग जरी तूं व्यर्थ तरी हें जीणें ॥ २ ॥ मिळल्या घडिला होवो देवा सार्थक या देहाचें । मंगलधामा आळाविं तुजला नामा गाउनि वाचे ॥ ३ ॥ धांव धांव बा भक्तवत्सला त्रैलोक्याच्या नाथा । भवभयभंगचि निश्चित् होईल ठेवियल्या पदिं माथा ॥ ४ ॥ करुणार्णव तूं असशी देवा त्वद्गुण मी किति वानूं । कोण असारे थोर असे कीं त्या तुजसम मी मानूं ॥ ५ ॥ स्मरणीं तुझिये शांति जिवा या होई हे जगजेठी । आस मनींची आहे ही कीं व्हावी त्वत्पद भेटी ॥ ६ ॥

॥ ३ ॥ भक्तवत्सला करुणागारा प्रार्थितसें मी भावें । शुद्ध करुनियां अंतर माझें सतत तेथ वसावें ॥ १ ॥ कृतार्थ व्हावें तव दासानें सज्जन संग घडावा ॥ प्रभु अविचारें दुर्जन पंथीं पाय कधीं न पडावा ॥ २ ॥ देवा अनुदिन परोपकारीं माझा देह झिजावा । विनय होउनी सुस्थिर हृदयीं सकलहि दुर्मद जावा ॥ ३ ॥

॥ ४ ॥ दीनदयाळा पतितपावना धांवत ये लवलाहीं । बुडतों आह्मी दीन बालकें तुजविण या भवडोहीं ॥ १ ॥ इह सुख शाश्वत समजुनि परवश झालों देवा ऐसे । पळहि न अमुचें

जीवन आधिन नेणों आह्मीं कैसे ॥ २ ॥ करिसी सकल जिवांचें पालन तूं आमुचा यजमान । प्रार्थू तुजला अंतरिं आमुच्या होईं विराजमान ॥ ३ ॥ सुफलित करिसी भक्त काज तूं पुरवीं अमुची आस । भक्तिरूप नावेंत घेउनी नेईं पैलतिरास ॥ ४ ॥

॥ ५ ॥ ब्रम्हदेवता सत्यस्वरुप तूं ह्मणती ऋषिजन तुजला ॥ कृपा करावी दीनदयाळा पाव मला दीनाला ॥ नमितों मी तुजला । देइं सदा सन्मतिला ॥ १ ॥ हितकारक कर भवनदकीं हा केवळ तारिल मजला । वत्सल तूं मज भक्तिनाव दे लंघुन जाया याला ॥ नमितों मी तुजला । देइं सदा सन्मतिला ॥ २ ॥

॥ ६ ॥ धांव धांव तूं दीन दयाळा दे दासां या भेटी । आतुर झालों धरुनी वांछा तव भेटीची पोटीं ॥ विलंब लाविसि कां । मारुं किती तुज हांका ॥ १ ॥ कन्या पुत्र तुझे हे मिळुनी आलों प्रभु तव द्वारीं । कृपा कटाक्षें बघुनि त्यांकडे भवनदितुनि त्यां तारी ॥ ऐकें विनती ही । तुजविण अन्य सखा नाहीं ॥ २ ॥ प्रपंच साधुनि परमार्थाचा लाभ करावा ऐसा । भक्त तुझे उपदेश करिती परि धरावा कैसा ॥ नुमजे हें बालां । लावी मार्गासी त्यांला ॥ ३ ॥

## श्लोक—( शिखरिणी. )

दयासिंधो देवा अनुपम तुझी होय करणी । न साधे कोणाही रुचिर असली सृष्टि सरणी ॥ कशी केली नेणों अमित सुख भांडार धरणी । दिली वाटे आह्मां प्रभु तदुप-

भोगास वरणी ॥ १ ॥ तुझ्या सामर्थ्याचें मनन करितां मान सरतीं । कळे गर्विष्ठातें स्वधन बलसीमा न सरती ॥ तुझे पायीं देवा अनुदिन असो मानस रती । जशी कीं हंसातें कविमत असे मानस रती ॥ २ ॥

( मालिनी )

॥ २ ॥ अनुदिन तुज देवा शुद्ध भावें नमावें । रत तव गुणगानीं होउनीयां रमावें ॥ न कधि विषय सौख्या सेवुनी गुंग व्हावें । परि चिर सुखशांती यां सदा मेळवावें ॥ १ ॥ त्यजुनि सकळ लज्जा संतसंगें दयाळा । निशिदिनिं तंव कंठीं घालुं बा प्रेम माळा ॥ घडविं तनय हस्तें मागुं हें तूजपाशीं । तुजविण घडवीता नाहिं कारुण्यराशी ॥ २ ॥ दृढतर मन लागो पायिं तूझ्या उदारा ॥ क्षणभरि विसरोनी सर्व संसार भारा ॥ घडिभरितरि होऊं मंगला भेट तुझी ॥ हृदयिं तुज धरोंदे आवडी हेचि माझी ॥ ३ ॥ प्रभु तव यश गातां चित्त संतोष पावे । प्रियतम विभु वाटे नाम जेंवी जपावें ॥ विनविं मज घडोंदें सर्वदा पायिं सेवा । तव पदरजि मोठें मानि मी सौख्य देवा ॥ ४ ॥

॥ ३ ॥ जय जय जगदीशा सच्चिदानंदकंदा । चरणि शरण आलों आपुल्या लावि छंदा ॥ स्तवन तव कराया जाणुं ना ताल छंदा । परि तुज विनवूं दे बुद्धि आह्मांस मंदा ॥ १ ॥ अपरिमित दयेनें पाळिसी तूं जगाला ॥ पतित जनसमूहां तारिसी तूं दयाळा ॥ सकल गुण विधाना पाव तूं बालकांतें ॥

नमुं नमुं तुजलागीं देइंगा दर्शनातें ॥ २ ॥ असुनिहि दिससीना सर्व ठाईं अनंता ॥ नवल बहुत वाटे भेटसी साधु संतां ॥ अधम जरि निघालें आवडे बाल ताता ॥ तुजविण प्रभु आज्ञां सांगवा कोण पाता ॥ ३ ॥ अशुभ शुभ असत्या सत्य मानूं मनांत ॥ असुख सुखचि भासे पाहतां ह्या जगांत ॥ अनुचित उचिताचा भास दे अंतरांत ॥ जरि न मनिं रहासी सर्व हें अन्य होत ॥ ४ ॥ भय मनिं बहु वाटे पाहतां दुष्कृतीतें ॥ षडरि सतत नेती देउनी आवडीतें ॥ उमजुनि भुललों मीं सौख्यदा त्वत्पदांतें ॥ नमुं नमुं तुजलागीं देइंगा दर्शनातें ॥ ५ ॥

॥ ४ ॥ आला धन्य सुदीन आजि करितों देवा अम्हीं उत्सवा ॥ देई दर्शन दीनबंधु सकलां जेणें तरूं या भवा ॥ ठेवूं चित्त करूनि निर्मळ सदा त्वत्पादपद्मीं प्रभो । राहों तें भ्रमरापरी निशिदिनीं गुंगोनि तेथें विभो ॥ १ ॥ त्राता अन्य नसे तुझ्याविण अम्हां दीनां अनाथां जनां । कामादी रिपुवर्ग नित्य छळितो शांती मिळेना मना ॥ तेणें होउनि त्रस्त चित्त करितों त्वद्भक्तिचा आसरा । धांवें उद्धारिं वत्सला अगतिका माता जशी लेंकरा ॥ २ ॥ गाऊं नाम तुझें सदा गुणनिधे सप्रेम भावें मुखीं । ध्याऊं मंगलरूप नित्य हृदयीं जेणें वसूं बा सुखी ॥ वेंचूं सर्व शरीर हें प्रभु तुझ्या कार्यीं बहु आदरें । अर्पूं जीवन हें तुला विसरतां मोहाब्धि केवीं तरे ॥ ३ ॥

॥ ५ ॥ नामाचा जयघोष होउं सदया देवा तुझ्या सर्वदा । राहें दीन दयाळ नित्य हृदयीं दासांचिया बा सदा ॥ चित्तीं

ठाव मिळो न एक पळही दुर्वासनेला कदा ॥ बंधुप्रीति महीवरी जनमनीं वाढो टळो आपदा ॥ १ ॥

॥ ६ ॥ गाऊं विश्वपते दयागुणनिधे दीना जना तारिता । जो पाता जगता नियामक धनी जो नाथ माता पिता ॥ भावें त्या विनवूं सबंधु भगिनी होईं प्रसन्न प्रभो । राहो चित्त सदा निमग्न चरणीं दे या प्रसादा विभो ॥ १ ॥

## भूपाळी विठ्ठलाची.

॥ १ ॥ उठा उठा हो मुरारी ॥ बोले रखुमाई सुंदरी ॥ भक्तगर्जति महाद्वारीं ॥ त्यांसी द्यावें दर्शन ॥ १ ॥ ध्रु० ॥ राउळीं जागे झाले हरी ॥ भक्त गर्जति जयजयकारी ॥ नारद तुंबर कीर्तन करी ॥ प्रेमानंदें डुल्लतसे ॥ २ ॥ सर्व पूजा तुळशी पान ॥ घेउनि आले भक्तजन ॥ द्यावें तयांसीं दर्शन ॥ विलंब कांहीं न करावा ॥ ३ ॥ ऐसा उगवला दिनकर ॥ भक्त गर्जती जयजयकार ॥ तेथें गणेशनाथ किंकर ॥ हरी चरणांवर लोळतसे ॥ ४ ॥

## भूपाळी

॥ २ ॥ उठाउठा प्रभात जाहली ॥ चिंता श्रीविठ्ठल माउली ॥ दीन जनाची सांउली ॥ येई धांउनी स्मरतांची ॥ १ ॥ पंढरपुरिं जे भीमातटीं ॥ सुंदर मनोहर गोमटी ॥ करद्वय ठेउनी कटीं ॥ भेटी साठीं तिष्ठतसे ॥ २ ॥ किरीट कुंडलें मंडित ॥ श्रीमुख-अति सुंदर शोभत ॥ गळा वैजयंती डोलत ॥ हार मिरवत तुळशीचा ॥ ३ ॥ सुरेख मूर्ती सगुण सांवळी ॥ कंठीं कौस्तुभ

एकावळी ॥ केंशर उटीं परीमळा गळी ॥ बुकाभाळीं विलसतसे ॥ ४ ॥ पिंवळा पीतांबर कसिला कटीं ॥ अक्षय वीट चरण तळवटीं ॥ सकळ सौंदर्य सुखाची पेटी ॥ हृदय संपुटी आठवा ते ॥ ५ ॥ अती प्रिय आवडे तुळसी बुका ॥ प्रीती करी भोळ्या भाविकां ॥ नामा पद पंकज पादुका ॥ शिरीं मस्तकीं वंदितसे ॥ ६ ॥

## श्लोक—( शिखरिणी. )

॥ ६ ॥ नसे ठावा ब्रम्हा न शिव अथवा श्रीपती हरी। हरी जो तापातें उचलुनी कृपासिंधु लहरी ॥ हरी वाटे काळा कारिस विपती मृत्यु भुजंगा ॥ जगाचा तूं ऐसा धनी कवण तो पाव मजगा ॥ १ ॥

## कामदा.

॥ ७ ॥ विश्व निर्मित्या विश्व पालका । भेट देइं या दीन बालका ॥ क्रोध काम हे गांजिती अरी । भेट देउनी संकटा हरीं ॥ १ ॥ दीन वत्सला तुझियाविणें । व्यर्थ व्यर्थ हें व्यर्थ रे जिणें ॥ सत्य रूप तूं हे परात्परा । शुद्ध शांत तूं यातना हरा ॥ २ ॥ असाशि जो सदा व्यापुनी जगा । त्या तुला विभो केंवि गाउंगा ॥ ज्ञान खाणि तूं हे जगत्पति । प्रार्थितों तुला मूढ मी अती ॥ ३ ॥ विषय सौख्य हें याचितों न मी । चरणिं दीन मी तूझिये नमीं ॥ ह्मणुनि शीघ्र बा देइं दर्शना । तदनु होतसे शांति या मना ॥ ४ ॥ दीन मी तुझें दीन लेंकरूं । तूझिया-

विणें काय बा करूं ॥ नाणि मी कधीं कांहीं अंतरीं । मानसीं प्रभो तूजला धरीं ॥ ५ ॥

## मालनी.

॥ ८ ॥ हरिपण हरि-नामें धातु-मूर्तीस आलें ॥ हरिमय हरि-नामें विश्व संतांसि झालें ॥ भव-भय हरि-नामें साधकाचें पळालें ॥ वद वद वद जिव्हे राम-नामें रसालें ॥ १ ॥

## अभंग

॥ ९ ॥ अगा ए सांवळ्या सगुणा ॥ गुणनिधि नाम नारायणा ॥ आमची परिसा विज्ञापना ॥ सांभाळी दीना आपुलिया ॥ १ ॥ ध्रु० ॥ बहुया उदराचे कष्ट ॥ आम्हांसीं केलें कर्मभ्रष्ट ॥ तुमची चुकविली वाट ॥ करी वटवट या निमित्तें ॥ २ ॥ झालो पांगिला जनासी ॥ संसाराची आंदणी दासी ॥ नकळे कधीं सोडविशी ॥ दृढपाशीं बहु बांधलों ॥ २ ॥ येथें तों नये आठव कांहीं ॥ विसावा तो क्षण एक नाहीं ॥ पडिलों आणिके प्रवाहीं ॥ हित तो कांहीं दिसेचिना ॥ ३ ॥ जीवित्व वेंचिलें वियोगें । हिंडतां प्रवास वाउगे ॥ कांहीं व्याधी पीडा रोगें ॥ केलीया भोगें ताडातोडी ॥ ४ ॥ माझा मीच झालों शत्रू ॥ कैचा पुत्र दारा कैचा मित्रू ॥ कासया घातला पसारू ॥ अहो जगद्गुरु तुका म्हणे ॥ ५ ॥

## उत्तरभजन.

जाहलें भजन आह्मीं नमितों तवचरणा ॥ वारूनीयां विघ्नें देवा रक्षावें दीना ॥ ध्रु० ॥ दास तुझे आह्मीं देवा तुजलाची

ध्यातों ॥ प्रेमें करूनी देवा तुझे गुण गातों ॥ १ ॥ तरी न्यावी सिद्धी देवा हेची वासना ॥ रक्षूनियां सर्वां द्यावी आह्मांसी आज्ञा ॥ २ ॥ मागणें तें देवा आतां एकचि आहे ॥ तारूनियां सकळा आह्मां कृपा दृष्टीं पाहे ॥ ३ ॥ जेव्हां आह्मीं मिळूं ऐशाया ठायां ॥ प्रेमानंदें लागूं तुझी कीर्ती वर्णाया ॥ ४ ॥ सदा ऐशी भक्ती राहो आमुच्या मनीं ॥ हेचि देवा तुह्मां असे नित्य विनवणी ॥ ५ ॥ निर्दाळुनी अरिष्टें आतां आमुची सारीं ॥ कृपेचि साउली देवा दीना वरी करी ॥ ६ ॥ निरंतर आमुची चींता तुह्मां असावी ॥ आह्मां सर्वांची लज्जा देवा तुम्ही रक्षावी ॥ ७ ॥ जाहालें भजन०

## श्लोक—( शार्दूल विक्रिडित. )

प्रारंभीं करुनी प्रणाम शिरसा राजाधिराजा तुला । आम्हीं बंधु मिळोनि उत्सव करूं सप्रेम हे निर्मला ॥ व्हावें साह्य म्हणोनियां सुसमयीं आरंभिली प्रार्थना ॥ यावें होउनि सुप्रसन्न सकलां द्यावें प्रभो दर्शना ॥ १ ॥ जो तूं मोक्षपदासी नेसि अवघ्या रक्षूनियां सज्जनां । त्या त्वां बा प्रतिपालना अमुचिया यावें जगज्जीवना ॥ सद्भावें मन हें तुलाचि विनवी नामा तुझ्या गाउनी । आह्मों दुर्बल लेंकरें तरि विभो येईं झणी धांवुनी ॥ २ ॥

॥ २ ॥ आनंदें तुजला प्रभो गुणनिधे वंदोनि मांडूं स्तवा ॥ आह्मों बा मति मंद दे विमळधी जेणें तरूं या भवा ॥ प्रेमें

नाम तुझें अखंड स्मरतां विघ्नें लया पावती । भक्तांतें जगदीश देशि तुझिया आनंदधामीं स्थिती ॥ १ ॥

## अभंग नमन.

घालिन लोटांगण वंदीन चरण ॥ डोळ्यांनिं पाहिन रूप तुझें ॥ १ ॥ प्रेमें आलिंगिन आनंदें पूजिन ॥ भावें ओंवाळीन ह्मणे नामा ॥ २ ॥

## श्लोक.

त्वमेव माता च पिता त्वमेव त्वमेव बंधुः सखा त्वमेव ॥ त्वमेव विद्या द्रविणं त्वमेव ॥ त्वमेव सर्वं मम देवदेव ॥ १ ॥ कायेन वाचा मनसेंद्रियैर्वा बुध्यात्मनावा प्रकृतिस्वभावात् ॥ करोमि यद्यत्सकलंपरस्मै नारायणायेति समर्पयामि ॥ २ ॥ अच्युतं केशवं रामनारायणं कृष्णदामोदरं वासुदेवं हरिं ॥ श्रीधरं माधवं गोपिकावल्लभं जानकी नायकं रामचंद्रं भजे ॥ ३ ॥

## भजन.

हरेराम हरेरामा हरेरामाहो ॥ तारि तारि तारी आम्हाहो ॥ १ ॥ तोडी तोडी तोडी भवपाश ॥ आनंन्य शरण आम्हि रामदास ॥ २ ॥ रामाहो जय रामाहो ॥ पतितपावन मेघशामाहो ॥ ३ ॥ नाथाहो दिन नाथाहो ॥ तुमचे चरणिं मम माथाहो ॥ ४ ॥ बंधूहो दिन बंधुहो ॥ रामदास म्हणे कृपासिंधूहो ॥ ५ ॥ विठ्ठल विठ्ठल विठ्ठल ॥

## श्लोक.

॥ १ ॥ नामाचा जयघोष होउं सदया देवा तुझ्या

सर्वदां ॥ आम्हां तूं त्यजसी निराश्रित जनां ऐसें घडेना कदां ॥ कायाही अवघी दयेविण तुझ्या प्राणा न दे आसरा ॥ ज्ञानी तूं असती समर्थ सखया प्राण स्वरूपी खरा ॥ १ ॥

॥ १ ॥ सदां सर्वदा योग तुझा घडावा ॥ तुझे कारणे देह माझा पडावा ॥ उपेक्षुं नको गुणवंता अनंता ॥ रघुनायका मागणें हेंचि आतां ॥ १ ॥

समाप्त.

BOMBAY:—PRINTED AT THE "TATVA-VIVECHAKA" PRESS

# BOOKS.

| | Rs. | a. |
|---|---|---|
| A guide to English History very useful to students preparing for the Marticulation Examination... | 0 | 8 |
| Solutions of Numerical Exercises in Larden's School Course on heat by Naegamwala...... | 0 | 12 |
| Webster's Condensed Dictionary.................... | 2 | 0 |
| Chamber's Etymological Dictionary .............. | 2 | 0 |
| Nuttall's Standard Dictionary.................... | 2 | 0 |
| Rama Vijaya................ | 0 | 12 |
| Webster's Pocket Pro. Dictionary .............. | 0 | 9 |
| Walker's " " | 0 | 9 |
| Ranjit's English-Marathi Dictionary with other words and roots......... | 1 | 0 |
| Pocket Marathi English Dictionary .............. | 2 | 0 |
| Cassell's Latin Dictionary | 2 | 0 |
| Routledges Latin Dic...... | 0 | 14 |
| Webster's Pocket Pronouncing Dictionary... | 0 | 5 |

N. B. In addition to the above the undersigned sell at their shop and supply to order all school and College Books, Novels, Biographies, Law books, &c., and also all kinds of Patent Medicines.

L. P. NAGWEKER & Co.

---

# विक्रीस तयार.

| | रु. | आ. | पै. |
|---|---|---|---|
| आरबी भाषेतील सु[illegible] व चमत्कारिक गोष्टी...... | ६ | ० | ० |
| ुकाराम बुवांच्या अभगांची ाथा भाग १।२ ......... | ४ | ८ | ० |
| तुकारामाची गाथा मांडगांवकर कृत ......... | २ | ८ | ० |
| ुंबईचें वर्णन ......... | ३ | ८ | ० |
| ामदास स्वामींचे समग्र ग्रंथ | २ | ८ | ० |
| द्गुणी सून ............ | ० | १४ | ० |
| वधूदर्पण माला ३,४,५ एकत्र बांधलेली............ | १ | १२ | ० |
| आनंदीबाई ............ | ० | १२ | ० |
| स्त्रीधर्म ................ | ० | ४ | ० |
| स्त्रीधर्म नीति पंडिता रमाबाई कृत ................ | १ | ४ | ० |
| युनायटेड स्टेट्सची लोकस्थिति ........ | १ | ८ | ० |

| | रु. | आ. | पै |
|---|---|---|---|
| विंचुरकर घराण्याचा इति. | १ | ८ | ० |
| तीर्थयात्रा प्रबंध ......... | १ | ८ | ० |
| गोमंतकाचा इतिहास... | १ | ४ | ० |
| तुर्क व रशियन लोकांचा इति. | १ | ४ | ० |
| ज्ञानेश्वर महाराजांचें चरित्र | ० | १२ | ० |
| एकनाथाचें चरित्र... .. | ० | १२ | ० |
| सद्वर्तन ............... | ० | १२ | ० |
| गद्यरत्नमाला..... ...... | ० | १० | ० |
| नौकानयनाचा इतिहास... | ० | ६ | ० |
| ऋण विमोचन........ | ० | ४ | ० |
| पुणेंशहर भाग १ ला. .. | ० | १४ | ० |
| चिद्बोध रामायण...... | ० | ८ | ० |
| आजारी मनुष्याची शुश्रूषा | १ | ० | ० |
| वागोबहार भाग १।२... | २ | ८ | ० |
| त्रिवेणी प्रमाथ......... | २ | ० | ० |
| निहाल कुंवर............ | १ | १२ | ० |
| सुमनविकास... . ... | १ | ८ | ० |
| अन्नपूर्णा आणि वामनराव | १ | ८ | ० |
| नारायणराव आणि गोदावरी | १ | ८ | ० |
| धाणाक्षपणाचा कळस... | १ | ४ | ० |
| मौनयौवना........ ...... | १ | ४ | ० |
| श्री विक्रमादित्य भाग १. . | १ | ४ | ० |

| | रु. | आ. | पै. |
|---|---|---|---|
| पुतळाबाई............... | ० | १२ | ० |
| सुभटवीर्य व कीर्ति मालिनी | ० | १२ | ० |
| कर्पूर मंजरी ..... . ... | ० | १२ | |
| विश्वसेन कादंबरी भाग १।२ | १ | ४ | ० |
| विनोदात्मक चुटके...... | ० | ३ | ० |
| विजापुरांतील देखावे...... | ० | २ | ६ |
| व्यवहारोपयोगी नाटक... | ० | २ | ० |
| श्रीदत्तमहाराजांचे भजन | ० | १ | ० |
| गुंडोजी महाराजांचे भजन | ० | १ | ० |
| जेजुरीचें वर्णन...... .. | ० | ० | ९ |
| गजकरणाचें मलम लावतांना न झोंबणारें........... | ० | ३ | ० |
| डेव्हीड लोरेन्सचें कॉडलिव्हर आईलचें दूध........ | १ | ० | [illegible] |
| डोळ्यांचें औषध......... | १ | ० | [illegible] |
| काळ्या शाईची पूड (एका पुडींत २ दौती काळी शाई होते) | ० | ० | [illegible] |
| विजेची आंगठी........ | १ | [illegible] | |
| „ पुतळी...... . | १ | [illegible] | [illegible] |
| तान्ह्या मुलांकरितां आरारूट पावडर........... ... | ० | ६ | |

वरिल पुस्तकांखेरीज सर्व प्रकारचीं इंग्रजी, मराठी, गुजराथी, संस्कृत इतर शालोपयोगी व कालेजांत लागणारीं पुस्तकें, कादंबऱ्या, नाटकें, अ[illegible] वगैरे खालील पत्त्यावर मिळतील.

**एल पी. नागवेकर आणि कं०,**

बुक सेलर्स, पालवाचा रस्ता, मार्केट पोस्ट, मुंब[illegible]

REFBK-0002155
REFBK-0002155